ज्ञाप

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ ५३९३
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई- ४०००००८
दिनांक :१४ .०९.२०१८

महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/
(समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
मुंबई/पालघर/रत्नागिरी/ठाणे/नाशिक/धुळे/अहमदनगर/कोल्हापूर/सातारा/ औरंगाबाद/बीड/
लातूर/नांदेड/उस्मानाबाद/नागपूर/भंडारा/वर्धा/अमरावती/अकोला /यवतमाळ/गडचिरोली.

विषय : शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा १०० % वापर करणेबाबत.
संदर्भ : १.परिपत्रक क्र.१०/२०१७ राप/आस्था/४०८-ई(१)/१५४१ दिनांक २०.३.२०१७
२. क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/२२२९ दिनांक २१.३.२०१७
३. क्र.राप/आस्था/४०८-ई (१)/४०५१ दि.२५ .०७.२०१७.
४. क्र.राप/आस्था/४०८-ई (१)/१२५९ दि.२३.०२.२०१८
५. क्र.राप/आस्था/४०८-ई (१)/२४०८ दि. १९.०४.२०१८
६. क्र.राप/आस्था/४०८-ई (१)/४८३३ दि. १३.०८.२०१८

-------

संदर्भित पत्र क्र.१ नुसार शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा १०० % वापर करण्याबाबत सविस्तर सुचना देण्यात आल्या असून सुचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे होत आहे किंवा कसे? याचा पुर्तता अहवाल दर तीन महिन्यांनी विभाग नियंत्रक/घटक प्रमुखांनी वेळापत्रकानुसार मध्यवर्ती कार्यालयास पाठविण्याबाबतच्या सुचना प्रसारित केलेल्या आहेत.

माहिती अधिकार अधिनियम,२००५ नुसार,तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले असून त्यावरुन घटक कार्यालयात टिपण्या, अहवाल व इतर अनुषंगिक कामे ही राजभाषा मराठीमध्ये होत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

परिपत्रकातील सुचनांनुसार पुर्तता अहवाल दर तीन महिन्यांनी पाठविण्यासंबंधी सुचित केले आहे. संदर्भ क्र.१नुसार, दिनांक ०१.०४.२०१८ ते ३०.०६.२०१८ या कालावधीचा अहवाल दिनांक ०७.०७.२०१८ पर्यंत सादर करण्याच्या सुचना देऊन केवळ १० विभागांमार्फत पुर्तता अहवाल प्राप्त झाला असून उर्वरित २१ विभागांमार्फत त्याची दखल घेतलेली दिसुन आलेली नाही, याबाबत आपणास संदर्भ क्र.६ नुसार स्मरणपत्राद्वारे कळवून देखील आपणाकडून पुर्तता अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. ही बाब अत्यंत गंभीर असुन, याबाबत शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये? याचा खुलासा दिनांक **१८.०९.२०१८** पुर्वी सादर करावा अन्यथा सदर बाब मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तसेच मा.अध्यक्ष,म.रा.मा.प.महामंडळ यांच्या निदर्शनास आणून शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार कारवाई करण्याबाबत आपला अहवाल सादर करण्यात येईल.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :</u>**
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी /महाव्यवस्थापक (वाहतूक) /
महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (संगणित्र)/मुख्य विधि अधिकारी/ मुख्य स्थापत्य अभियंता /
मुख्य कामगार अधिकारी/ जनसंपर्क अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी

Scanned by CamScanner

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ ८८७३
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई- ४००००८
दिनांक १८.०८.२०१८

- महाव्यवस्थापक (आवेदन),रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण),रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/ (समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र. ३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प.दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय : गोपनीय अहवाल मराठीत सादर करणेबाबत.
संदर्भ : १.परिपत्रक क्र.१०/२०१७ राप/आस्था/४०८-ई(१)/१५४१ दिनांक २०.३.२०१७
२.क्र.राप/सेमं/आस्था/वागोअ/१०१७ दिनांक ०१.०७.२०१७

--------

संदर्भित पत्र क्र.१ नुसार शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा १०० % वापर करण्याबाबत सविस्तर सुचना देण्यात आल्या असून सुचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याबाबत सुचना प्रसारित केलेल्या आहेत

संदर्भित पत्र क्र.२ नुसार रा.प.महामंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे वार्षिक गोपनीय अहवाल व स्थायी करणाचे विशेष गोपनीय अहवाल मराठी भाषेत सादर करणेबाबत आदेश देण्यात आलेले आहेत.

तरी सन २०१७-१८ चे वार्षिक गोपनीय अहवाल व स्थायीकरणाचे अहवाल आपणाकडून १०० टक्के मराठी भाषेत सादर केल्याचे प्रमाणपत्र (प्रमाणपत्राचा नमुना-सहपत्र १ प्रमाणे राहील) सर्व खाते प्रमुख व विभाग प्रमुख यांनी ३० ऑगस्ट २०१८ पर्यंत या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे, त्याची एक प्रत नियंत्रण समिती, मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(सेवामंडळ) व सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) यांना देण्यात यावी. विहित मुदतीत प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल. याची नोंद घेण्यात यावी.

सोबत- सहपत्र १

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.,

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) /उपमहाव्यवस्थापक (बांधकाम)/मुख्य विधि अधिकारी /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प.महामंडळ/जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/मा.अध्यक्षांचे वैयक्तिकसचिव/उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/(प्रशासन)/(राज्यसंवर्ग)/(मागासवर्ग)/(मनुष्यबळ/नियोजन/समन्वय)/(पटकसंवर्ग) /(मुख्यालय)

Scanned by CamScanner

सहपत्र - १

**अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल मराठी भाषेमध्ये सादर केल्याचे प्रमाणपत्र**
(१.परिपत्रक क्र.१०/२०१७ राप/आस्था/४०८-ई(१)/१५४१ दिनांक २०.३.२०१७
२.क्र.राप/सेमं/आस्था/वागोअ/१०१७ दिनांक ०१.०७.२०१७ च्या सुचनांनुसार)

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते कि, रा.प. विभाग / खाते मधील सर्व कर्मचा-यांचे सन च्या कालावधीतील गोपनीय अहवाल मराठी भाषेमध्ये सादर करण्यात आले आहेत.

दिनांक -
ठिकाण -

संस्करण अधिका-यांची सही,
नाव व पदनाम

Scanned by CamScanner

क्र. राप/मुकाअ/१९०७
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई-४०००० ८.
दिनांक : ०१ डिसेंबर, २०१८

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,
दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.

उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण),
रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.

विभाग नियंत्रक,
रा.प.महामंडळ,
मुंबई/ठाणे/रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/
पुणे/सोलापूर/सातारा/सांगली/कोल्हापूर/
नाशिक/धुळे/जळगाव/अहमदनगर/
औरंगाबाद/बीड/नांदेड/परभणी/लातूर/उस्मानाबाद/जालना/
अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/
नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/गडचिरोली.

**विषय : राप सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या मोफत प्रवास पासची मुदत दोन महिन्यावरुन सहा महिने करण्याबाबत.**

**संदर्भ : १.परिपत्रकक्र.राप/१४२/मुकाअ/४३९, दि.१३.०२.१९९६.**
**२.परिपत्रकक्र.राप/१४२/मुकाअ/१८२०, दि.२६.०७.१९९६.**
**३.परिपत्रकक्र.राप/मुकाअ/१४२/२७७१, दि.२८.०९.२०००.**
**४.परिपत्रकक्र.राप/मुकाअ/९८०, दि.२६.०५.२००९.**

------

मा.मंत्री, परिवहन तथा अध्यक्ष म.रा.मा.प. महामंडळ यांनी दि. ०१/०६/२०१८ रोजी कामगारांना वेतनवाढ जाहिर करताना वेतनवाढी सोबतच रा.प. महामंडळातील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या मोफत प्रवास पासची मुदत दोन महिन्यावरुन वाढवून सहा महिने करण्यात येत असल्याबाबत जाहिर केले त्यानुसार या विषयासंदर्भातील सर्व परिपत्रके अधिक्रमित करुन खालील सुचना देण्यात येत आहेत.

१. रा.प. सेवेतून निवृत्त झालेल्या,ऐच्छिक सेवानिवृत्ती घेतलेल्या,वैद्यकीयदृष्ट्या अपात्र असलेल्या, अधिकारी/कर्मचा-यांना मोफत प्रवास पास प्रतिवर्षी अखंड सहा महिन्याकरिता अनुज्ञेय असेल

२. सदर मोफत प्रवासाचा पास जुलै ते फेब्रुवारी या कालावधीमध्ये अनुज्ञेय राहील.

३. मोफत प्रवास पास साध्या गाडयांसाठी उपयोगात आणता येईल. मात्र जर पासधारकाने साधी गाडी व निमआराम गाडी यातील प्रवास भाड्याचा फरक भरून दिल्यास त्यास निमआराम गाडीमधुन प्रवास करता येईल.

४. सध्या प्रचलीत पध्दतीनुसार मोफत प्रवास पास विहीत नमुन्यात देण्यात यावा. मात्र भविष्यात संगणकीकरण पुर्ण होताच हा पास स्मार्ट कार्ड स्वरुपात देण्यात यावा.

५ .एका बसमध्ये २ प्रवास पासधारक व्यक्तींना प्रवास करता येईल.

६. रा.प अधिकारी/कर्मचारी कामाच्या ठिकाणापासून त्यांच्या मुळ गावी किंवा इतरत्र स्थायिक झालेले असतील अशा प्रकरणी त्यांना मोफत प्रवास पास, ते जेथे स्थायिक झाले असतील त्या रा.प.कार्यालयाकडून घेता येईल. परंतू त्यापुर्वी संबधित अधिकारी/कर्मचाऱ्यांने तो ज्या कार्यालयात नोकरीत होता व तेथून तो सेवानिवृत्त झाला अशा अर्थाचा निवृत्तीची तारीख दर्शविणारा दाखला प्राप्त करुन पास देणाऱ्या कार्यालयात तो सादर



Scanned by CamScanner

करावा लागेल. तसेच त्याने त्याचा व त्याच्या पत्नीचा/पतीचा अगदी अलीकडे काढलेला पासपोर्ट आकाराचा फोटो पास देणाऱ्या व जेथून तो सेवानिवृत्त झाला असेल त्या कार्यालयास सादर करावा लागेल.

७. वरील प्रमाणे काढलेल्या फोटोची एक प्रत त्याला देण्यात येणाऱ्या मोफत प्रवास पासावर चिटकवून पास देण्याऱ्या अधिकाऱ्याने स्वाक्षांकीत करावी.

८. ज्या कार्यालयाकडून अधिकारी/कर्मचाऱ्यांने मोफत प्रवास पास घेतला असेल त्या कार्यालयास तो पास त्याने मुदत संपताच त्वरीत परत करणे बंधनकारक राहील. तो परत न केल्यास पुढील वर्षाचा पास देण्यात येणार नाही.

९. दिलेल्या मोफत प्रवास पासावर पासधारक अधिकारी/कर्मचारी किंवा त्याच्या पत्नी / पती यांचे व्यतिरिक्त इतर व्यक्ती प्रवास करीत असल्याचे आढळून आल्यास पास जप्त करण्यात येईल व त्याची सुविधा नेहमीकरीता काढून घेण्यात येईल.

१०. अपघात प्रसंगी मोफत प्रवास पासधारक आणि / किंवा त्याची पत्नी / पती यांना दुखापत झाल्यास अन्य रा.प.प्रवाशांप्रमाणे नियमानुसार सवलती मिळतील.

११. एकदा दिलेला मोफत प्रवास पास गहाळ झाल्यास किंवा खराब झाल्यास त्या वर्षाच्या उर्वरित काळाकरीता त्या वर्षात दुसरा पास दिला जाणार नाही.

१२. रा.प.सेवेत असतांना मृत्यु पावलेल्या,सेवानिवृत्तीनंतर मृत्यु पावलेल्या, वैद्यकीयदृष्या अपात्र ठरलेल्या व स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या अधिकारी/कर्मचा-यांच्या विधवा/विधुर यांना १ महिन्याचा मोफत प्रवास पास त्यांच्या वयाच्या ६५ वर्षापर्यंत मिळेल.

१३.मृत कर्मचारी / अधिकारी यांचा मुलगा / मुलगी वर्ग ३ व वर्ग ४ या प्रवर्गात रा.प. नोकरीत असतील आणि त्यांनी आई / वडील, सासू / सासरे यांच्या नावाचा पर्याय दिला असल्यास, त्या सेवानिवृत्त मृत कर्मचारी / अधिका-यांच्या पत्नीस / पतीस ही सुविधा उपलब्ध असणार नाही.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत रवाना :**मुख्यसुरक्षा व दक्षता अधिकारी/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (स्थापत्य) / महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (यं.अ) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ उप महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/उपमहाव्यवस्थापक संनियंत्रण समिती-(१,२,३)/ मुख्य विधी अधिकारी/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/कर्मचारीवर्ग अधिकारी/कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/सचिव, रा.प.महामंडळ / जनसंपर्क अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परिक्षक / मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव यांस.



Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. 20/२०१८.

क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./ 3092
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक : 29 मे, २०१८.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उप महाव्यवस्थापक(समिती क्र.१ मुंबई व पुणे )/(समिती क्र.२नाशिक व औरंगाबाद)/(समिती क्र.३नागपूर व अमरावती).
- कार्यकारी अभियंता, रा.प.मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ.

विषय :-पर्यवेक्षकीय कर्मचा-यांच्या पदांचे वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या पदात रुपांतर करण्याबाबत.

संदर्भ :-१) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.४७-अ/२०१७ दिनांक २६.१२.२०१७.
२) नियोजन व पणन खात्याचे परिपत्रक क्र.६/२०१७ दिनांक २७.१२.२०१७.

***

संदर्भित परिपत्रक क्र.१ अन्वये कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३२/२०१७ दिनांक २९.९.२०१७ हे रद्द करण्यात आलेले आहे.

नियोजन व पणन खात्याचे संदर्भित परिपत्रक क्र.२ अन्वये वर्ग-३ राज्यसंवर्ग पदातील पर्यवेक्षकीय कर्मचा-यांना वर्ग-२ (कनिष्ठ) पदाचा (वेतनश्रेणी उन्नत करुन) दर्जा दिल्यानंतर त्यांच्या जबाबदा-या व कर्तव्य निश्चित करण्यात आलेली आहेत.

मा.संचालक मंडळाच्या बैठकीत महामंडळ ठराव क्र.२०१७:११:१८ दिनांक ८.११.२०१७ पारित करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना प्रसारीत करण्यात येत आहेत.

१. रा.प.महामंडळाची उत्पादकता वाढविण्यासाठी वर्ग-३ राज्यसंवर्गातील एकूण ९ प्रवर्गातील पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांच्या पदांची वेतनश्रेणी उन्नत करुन, त्यांना अधिकारी वर्ग -२ (कनिष्ठ) पदाचा दर्जा देण्यात येत आहे.

२. रा.प.महामंडळातील वर्ग-३ राज्यसंवर्ग प्रवर्गातील पुढील तक्त्यात नमूद केलेल्या ९ प्रवर्गातील पर्यवेक्षकीय कर्मचा-यांची एकूण १०४९ (५२२ पदे सरळसेवेने व ५२७ पदे खात्यांतर्गत बढतीने) पदांची मंजुरी राज्यसंवर्ग या प्रवर्गातून कमी करुन सदरची पदे नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या अधिकारी वर्ग -२ (कनिष्ठ) या प्रवर्गात वर्ग करण्याबाबत मा.संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. याबाबतची कार्यवाही राज्यसंवर्ग कक्षामार्फत करण्यात येईल.

४. अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ) या प्रवर्गाची नियमीत वेतनश्रेणी रु.७७५०-२५९०७ अशी राहील.



Scanned by CamScanner

## तक्ता

वर्ग-३ (राज्यसंवर्ग) प्रवर्गातून वर्ग-२ (कनिष्ठ) या प्रवर्गामध्ये उन्नत करावयाचे ९ प्रवर्ग

| अ. क्र. | प्रवर्ग | पदांच्या आढाव्यानुसार मंजूर पदे | सध्याची वेतनश्रेणी (रु.) |
|---|---|---|---|
| १ | सहा.वाह.अधिक्षक | २९३ | ७६६०-२५०२० |
| २ | सहा.कार्य.अधि./ कनिष्ठ कार्यदेशक | ३५४ | ७६६०-२५०२० |
| ३ | वरिष्ठ कार्यादेशक | ४६ | ७८३०-२५५८१ |
| ४ | भांडार पर्य./ वरि. संग्रह पडताळक | ४१ | ७६६०-२५०२० |
| ५ | विभागीय लेखाकार | ४९ | ७६६०-२५०२० |
| ६ | कनि.अभियंता(स्था) | १३० | ७६६०-२५०२० |
| ७ | कनि.अभियंता(वि) | २४ | ७६६०-२५०२० |
| ८ | कार्या.अधिक्षक<br>आस्थापना/वाहतूक पर्यवेक्षक | १०७ | ७६६०-२५०२०<br>६७९०-२२१९१ |
| ९ | वरिष्ठ संगणित्र चालक | ५ | ६७९०-२२१९१ |
| | एकूण महामंडळ | १०४९ | |

५. महामंडळाच्या प्रचलित वेतननिश्चितीच्या कार्यपध्दतीनुसार वर्ग -२ (कनिष्ठ) या प्रवर्गामध्ये उन्नतीकरणानंतर नियुक्ती दिलेल्या कर्मचा-यांची वेतननिश्चिती करतांना सध्याचे मूळ वेतन संरक्षित करुन सदर वेतनावर ३% प्रमाणे वेतन वाढ देऊन वेतननिश्चिती करण्यात यावी.

६. वर्ग-३ (राज्यसंवर्ग) प्रवर्गातून वर्ग-२ (कनिष्ठ) या प्रवर्गामध्ये उन्नतीकरण करण्यात येणा-या ९ प्रवर्गातील कर्मचा-यांची जात वैधता असणे आवश्यक आहे.

७. वरील तक्त्यात नमूद केलेल्या वर्ग-३ (राज्यसंवर्ग) ९ प्रवर्गामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना, अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ) या प्रवर्गात सामावून घेण्याबाबतचे आदेश तसेच सेवाज्येष्ठता, वेतननिश्चिती व इतर भत्ते, याबाबत स्वतंत्र आदेश सेवामंडळ शाखेमार्फत यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सदर आदेश निर्गमित केल्यानंतर संबंधित कर्मचा-याने वर्ग-२ (कनिष्ठ) पदाचा प्रत्यक्ष कार्यभार स्विकारला ती तारीख संबंधिताची पदोन्नतीची तारीख राहिल.

८. अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ) पदात बढतीने नेमणूक देण्यात येणारी एकूण १०४९ पदे १००% खातेअंतर्गत पदोन्नतीने भरण्यात येतील.

९. सन २०१७ मध्ये वर्ग -३ (राज्यसंवर्ग) या प्रवर्गातील ९प्रवर्गांपैकी ६ प्रवर्गांच्या एकूण १८७ जागा वर्ग-३ (राज्यसंवर्ग) कनिष्ठ वेतनश्रेणीत सरळ सेवेने भरण्यासाठी जाहिरात दिली असल्याने त्याद्वारे निवड होणा-या उमेदवारांना एक वेळचा पर्याय म्हणून नव्याने निर्माण केलेल्या अधिकारी वर्ग -२(कनिष्ठ) या प्रवर्गात (वेतनश्रेणी रु.७७५०-२५९०७) सामावून घेण्यात येईल.

१०. वर्ग -३ राज्यसंवर्ग मधील ९ प्रवर्गातील सध्या कार्यरत असलेले जे कर्मचारी, अधिकारी वर्ग -२ (नियमीत) या पदाची खाते बढती परीक्षा उत्तीर्ण होवून प्रतीक्षा यादीवर आहेत, त्यांना त्यांच्या सेवाजेष्ठतेनुसार वर्ग -२ (नियमित) (नवीन पदनाम वर्ग -२ वरीष्ठ) पदातील रिक्त जागा व आरक्षणा संबंधीच्या शासनाच्या धोरणानुसार रु.१२९७०- ३१५०३ या वेतनश्रेणीवर प्रचलित कार्यपध्दतीनुसार सामावून घेण्यात येईल.



Scanned by CamScanner

तद्नंतर नव्याने निर्माण केलेल्या अधिकारी वर्ग -२ (कनिष्ठ) या पदात ३ वर्ष समाधानकारक सेवा पूर्ण झाल्यानंतर प्रचलीत कार्यपध्दतीनुसार खातेबढती परीक्षेचे आयोजन करुन त्यामध्ये उत्तीर्ण होणा-या वर्ग-२ (कनिष्ठ) अधिका-यांना रा.प.महामंडळाच्या प्रचलित नियमानुसार वर्ग-२ वरीष्ठ (नवीन पदनाम वर्ग -२ वरीष्ठ) या प्रवर्गात सामावून घेण्यात येईल.

११. वरीलप्रमाणे झालेल्या बदलांची नोंद घेऊन सामान्य स्थायी आदेश ५०३ मध्ये जरुर त्या सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

१२. जे पर्यवेक्षकीय कर्मचारी बढती नाकारतील त्यांचेबाबत यथोचित निर्णय घेण्याचा अधिकार मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना आहे.

सदर परिपत्रक मा.संचालक मंडळाच्या कार्योत्तर मंजुरीनुसार प्रसारीत करण्यात येत आहे.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक(वाहतूक)/ महाव्यवस्थापक(भांवख)/महाव्यवस्थापक(यं.अ.)/महाव्यवस्थापक(निवप)/उपमहाव्यवस्थापक(मावत)/ मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामागर अधिकारी/ मुख्य लेखा परीक्षण अधिकारी/ विधि सल्लागार / जनसंपर्क अधिकारी/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ.

२) मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक/मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव.

३) कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय/राज्यसंवर्ग/ सा.प्रशासन/प्रशासन)/ कर्मचारीवर्ग अधिकारी (म.ब./समन्वय)/घटकसंवर्ग/मागासवर्ग कक्ष) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

४) सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ (राज्यसंवर्ग) / (मागासवर्गकक्ष)/ (घटकसंवर्ग)(प्रशासन/ सामान्य प्रशासन)(म.ब./समन्वय) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

F:\MPP २०१८\Circular.docx

Scanned by CamScanner

परिपत्रक क्र. १२/२०१८

क्रमांक : राप/आस्था/४०८-ई (१)/१८३६
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४०० ००८.
दिनांक : २३.०३.२०१८

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प. प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/नांदेड/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/ भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/ अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय:- रा.प.महिला वाहक कर्मचा-यांना त्यांच्या प्रसुती रजेला जोडून ३ महिन्यांची अतिरिक्त प्रसुती रजा मंजूर करणेबाबत.

संदर्भ:- १. कर्मचारीवर्ग परिपत्रक क्र.८/२०१० जा.क्र.आस्था/२१७-ए/ ४८२० दिनांक २४.११.२०१०
२. महामंडळ ठराव क्र.२०१८:०१:१२ दिनांक १२.०१.२०१८

***

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ८/२०१० जा.क्र.आस्था/२१७-ए/ ४८२० दिनांक २४ नोव्हेंबर २०१०नुसार राज्य परिवहन महामंडळातील महिला कर्मचा-यांना १८० दिवस खास प्रसुती रजा मंजूर करण्याबाबत सुचना प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रकातील तरतुदीमध्ये सुधारणा करण्यात येत असून <u>केवळ महिला वाहक कर्मचा-यांसाठीच्या खास प्रसुती रजा</u> व कामगिरीबाबतच्या सुधारीत तरतुदी पुढील प्रमाणे आहेत:-

रा.प.महामंडळातील महिला वाहक कर्मचा-यांची कामगीरी विचारात घेऊन महामंडळाने ठराव क्र. २०१८:०१:१२ दिनांक १२.०१.२०१८ अन्वये केवळ महिला वाहक कर्मचा-यांसाठी ३ महिन्यांची अतिरिक्त प्रसुती रजा मंजूर करण्यास मंजुरी दिलेली आहे.

१. रा.प.महामंडळातील महिला वाहक कर्मचा-यांना (ज्यांची १ वर्षापेक्षा कमी सेवा झाली आहे अशा महिला वाहक कर्मचा-यांनासुध्दा ) दोन हयात अपत्यांपर्यंत १८० दिवसांची खास प्रसुती रजा अनुज्ञेय राहील.
२. त्यानंतर सदर महिला वाहकांना ३ महिन्यांची अतिरिक्त प्रसुती रजा अनुज्ञेय राहिल.
३. वरील प्रसुती रजा संपल्यानंतर आवश्यकता भासल्यास महिला वाहकांच्या खाती जमा असणारी सरासरी वेतनावरील रजा वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न करता उपभोगता येईल.
४. मानसेवी वैद्यकीय अधिका-यांच्या सल्ल्यानुसार प्रसुती रजेपैकी किती व कोणत्या कालावधीत रजा घ्यावी हे ठरविण्याचे अधिकार संबधित महिला वाहक कर्मचा-यास असतील.
५. उपरोक्त सवलत दिल्याबाबतची नोंद संबधित महिला वाहक कर्मचा-याच्या सेवा पुस्तकात संबधित घटक/ विभाग प्रमुख यांनी करावी.
६. महिला वाहक कर्मचा-यास गरोदरपणाच्या कालावधीत पहिल्या चार महिन्यांपर्यंत मानसेवी वैद्यकीय अधिकारी व स्त्री-रोग तज्ञ यांच्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे महिला वाहकाच्या शैक्षणिक अर्हतेच्या अधिन राहून बैठे काम देण्याचा निर्णय विभागीय पातळीवर घेण्यात यावा.
७. महिला वाहक कर्मचा-यास गरोदरपणाच्या कालावधीत काही ठराविक महिन्यांपर्यंत सुरक्षित, सुस्थितीत असलेल्या मार्गावर कामगिरी देण्याबाबत संबंधित आगार व्यवस्थापकांनी निर्णय घ्यावा.

उपरोक्त सुचनांची अंमलबजावणी महामंडळ ठराव पारित झाल्याच्या तारखेपासून म्हणजेच दिनांक १२.०१.२०१८ पासून करण्यात यावी.

सदर परिपत्रकाची पोहोच देण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

..२..

Scanned by CamScanner

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (नियोजन)/महाव्यवस्थापक (भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (संगणित्र)/मुख्य विधि अधिकारी/ मुख्य स्थापत्य अभियंता /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक /मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी /कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव /उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे सचिव /मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (घटकसंवर्ग) /(मुख्यालय)/ (प्रशासन/सा.प्रशासन) / (राज्यसंवर्ग)(मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/ समन्वय).

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. २३ /२०१८

क्र.राप/कर्मवर्ग/म.व/ ९८६९
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक : २६ मार्च, २०१८.

विभाग नियंत्रक,
रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/
पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ.

विषय :- राज्यस्तरीय परिवहन महामंडळातील जिल्हास्तरीय बसस्थानकांवर सुरक्षा रक्षकांच्या वापराबावत.

संदर्भ:- १) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.२५/२००६ क्र.राप/कर्मवर्ग/मनुष्यबळ/ सुरक्षा रक्षक/४६६८ दि.१०.१०.२००६.
२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१३/२०११ क्र.राप/कर्मवर्ग/मनुष्यबळ/५५०२ दि.१८.११.२०११.
३) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१२/२०१३ क्र.राप/कर्मवर्ग/मनुष्यबळ/४८८३ दि.२५.१०.२०१३.
४) क्र.राप/सचि/महा-५३१/२७४/१०५१दि.१५.७.२०१६.
५) क्र.एसटीसी/०८१६/प्र.क्र.४३०/परि-१ गृह (परिवहन) विभाग दि.१९.९.२०१६.
६) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३४/२०१६ क्र.राप/कर्मवर्ग/म.व./६४३३ दि.२९.१२.२०१६.
७) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३७/२०१७ क्र.राप/कर्मवर्ग/म.व./५७३८ दि.३०.१०.२०१७.

***

वरील संदर्भित परिपत्रक क्र.३४/२०१६ अन्वये रा.प.महामंडळातील ४८ जिल्हास्तरीय बसस्थानकांवर सदर परिपत्रकात नमूद केलेल्या संख्येच्या मर्यादेपर्यंत अतिरिक्त माजी सैनिक सुरक्षा रक्षकांचा वापर कंत्राटी पध्दतीने १ वर्ष कालावधीसाठी प्रायोगिक तत्वावर करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. सदर कंत्राटी सुरक्षा रक्षकांचा वापर १ वर्ष कालावधीनंतर सुरु ठेवण्याबाबत आढावा घेतला असता सदर कंत्राटी सैनिक सुरक्षा रक्षकांची आवश्यकता यापुढेही असल्याबाबत विभागांकडून कळविण्यात आले आहे.

२) तरी या परिपत्रकान्वये सूचित करण्यात येते की, परिपत्रक क्र.३४/२०१६ अन्वये ४८ जिल्हास्तरीय बसस्थानकांवर माजी सैनिक सुरक्षा रक्षकांच्या वापराबाबत दिलेल्या सूचनांप्रमाणे व परिपत्रकात नमूद केलेल्या संख्येच्या मर्यादेपर्यंत कंत्राटी सुरक्षा रक्षकांचा वापर यापुढेही पुढील सूचना प्रसारीत होईपर्यंत सुरु ठेवण्याबाबत मा.मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी तसेच मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यता दिली आहे, त्यानुसार सदर परिपत्रक प्रसारीत करण्यात येत आहे.

परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

-२-

Scanned by CamScanner

<u>प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेपित.</u>

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक(वाहतूक)/ महाव्यवस्थापक(भांवख)/महाव्यवस्थापक(यं.अ.)/महाव्यवस्थापक(निवप)/उपमहाव्यवस्थापक(मावतं)/ मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामागर अधिकारी/ मुख्य लेखा परीक्षण अधिकारी/ विधि सल्लागार /जनसंपर्क अधिकारी/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ.

२) मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक/मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव.

३) कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय/राज्यसंवर्ग/ सा.प्रशासन/प्रशासन)/ कर्मचारीवर्ग अधिकारी (म.व./समन्वय)/घटकसंवर्ग/मागासवर्ग कक्ष) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

४) सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ (राज्यसंवर्ग) / (मागासवर्गकक्ष)/ (घटकसंवर्ग)(प्रशासन/ सामान्य प्रशासन)(म.व./समन्वय) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

F:\MPP २०१८\Circular.docx

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ९२/२०१८.

क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./ E2609
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८.
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०१८.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उप महाव्यवस्थापक(समिती,क्र.१ मुंबई व पुणे )/(समिती क्र.२नाशिक व औरंगाबाद)/ (समिती क्र.३नागपूर व अमरावती).
- कार्यकारी अभियंता, रा.प.मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ.

विषय :- ' सहाय्यक कारागिर' या पदाच्या खात्यांतर्गत बढती परीक्षेस बसणा-या कर्मचा-यांच्या अर्हतेमध्ये बदल करणेबाबत.

संदर्भ :- क्राप/कर्मवर्ग/म.ब./५१३३ दिनांक ३.९.२०१८.

***

संदर्भित परिपत्रकाद्वारे सहाय्यक कारागिर या पदी खात्यांतर्गत बढतीसाठी घेण्यात येणा-या व्यवसाय चाचणीसाठी (परीक्षेसाठी) 'सहाय्यक' या प्रवर्गात ३ वर्षे सेवा पूर्ण केली आहे, त्या समयवेतनश्रेणीवरील सर्व कर्मचा-यांना इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधिन राहून पात्र ठरविण्याबाबत सूचना प्रसारित करण्यात आल्या आहेत.

सहाय्यक कारागिर या प्रवर्गाच्या बढती परीक्षेस बसणा-या कर्मचा-यांकडे अवजड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक असल्याबाबत यंत्र अभियांत्रिकी खात्यामार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली असून महामंडळ ठराव क्र.२०१८:०७:०७ दिनांक २.७.२०१८ पारित करण्यात आला आहे. सदर ठरावानुसार 'सहाय्यक कारागिर' या पदाच्या खात्यांतर्गत बढती परीक्षेस बसू इच्छिणा-या कर्मचा-यांना खालील निकष पूर्ण करणे आवश्यक आहेत.

१. १ जानेवारी २०२० पासुन सहाय्यक कारागिर या पदी खात्यांतर्गत बढतीसाठी घेण्यात येणा-या व्यवसाय चाचणीकरीता (परीक्षेस) बसू इच्छिणा-या कर्मचा-यांकडे अवजड वाहन चालविण्याचा परवाना (HMV)असणे आवश्यक आहे.

२. १ जानेवारी २०२० पूर्वी घेण्यात येणा-या सहाय्यक कारागिर या पदाच्या खात्यांतर्गत बढती परीक्षेमध्ये उत्तीर्ण होणा-या कर्मचा-यांना १ जानेवारी २०२० पर्यंत अवजड वाहन चालविण्याचा परवाना (HMV) महामंडळाकडे सादर करणे बंधनकारक आहे, अन्यथा सदर पदात नियमीत बढती दिली जाणार नाही. कर्मचा-यास तद्नंतर परवाना प्राप्त झाल्यास त्यांनी महामंडळास परवाना सादर केल्याच्या तारखेपासून सदर पदात त्यांची नियमीत बढती ग्राहय धरली जाईल.

३. सहाय्यक कारागिर या प्रवर्गात खात्यांतर्गत बढती परीक्षेबाबत इतर अर्हता व अटींच्या पूर्ततेस अधिन राहून सहाय्यक प्रवर्गातील कर्मचा-यांना वर नमूद केलेल्या तरतूदी लागू राहतील.

परिपत्रकाची पोच द्यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक(वाहतूक)/ महाव्यवस्थापक(भांवख)/महाव्यवस्थापक(यं.अ.)/महाव्यवस्थापक(निवप)/उपमहाव्यवस्थापक(मावत)/ मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामागर अधिकारी/ मुख्य लेखा परीक्षण अधिकारी/ विधि सल्लागार/ जनसंपर्क अधिकारी/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ.

२) मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक/मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव.

३) कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ कर्मचारीवर्ग अधिकारी /राज्यसंवर्ग/ सा.प्रशासन/प्रशासन)/ कर्मचारीवर्ग अधिकारी ((मुख्यालय /मनुष्यबळ/घटकसंवर्ग/मागासवर्ग कक्ष) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

४) सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ (राज्यसंवर्ग) / (मागासवर्गकक्ष)/ (घटकसंवर्ग)(प्रशासन)/ (सामान्य प्रशासन)(मनुष्यबळ/समन्वय) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

F:\MPP२०१७\Circular.docx

तात्काळ व महत्वाचे

क्रमांक : राप/ आस्था/ प्रशा /३३२-ए/ ६२५९
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४०० ००८.
दिनांक : २६.१०.२०१८

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ.

**विषय :- दिवाळी सणाच्या प्रवासी हंगामामध्ये कोणत्याही प्रकारची रजा मंजूर न करणेबाबत.**

सन २०१८ चा दिवाळी प्रवासी वाहतूक हंगाम दि.१.११.२०१८ रोजी पासून सुरु होत असून सदर कालावधीमध्ये प्रवासी वाहतूक व्यवस्था सुरळीत पार पाडण्याच्या व प्रवाशांची गैरसोय न होण्याच्या दृष्टीने उपाययोजना म्हणून दि. २९.१०.२०१८ रोजी पासून, सदर हंगाम संपेपर्यंत विभाग / घटक प्रमुख यांनी त्यांच्या अखत्यारीतील अधिकारी / कर्मचारी यांची कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये. दिवाळी हंगामामध्ये प्रवासी वाहतूकीची निकड विचारात घेता रजेवर असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांच्या बाबतीत रजा रद्द करणे / कर्तव्यावर बोलावणेबाबत आपल्या स्तरावर योग्य निर्णय घेण्यात यावा.

सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

(सही)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं) करिता

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :-</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (यं.अ)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (बांधकाम)/मुख्य विधि अधिकारी /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/ मा.अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/ (प्रशासन)/ (राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/ (मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/ (घटकसंवर्ग) / (मुख्यालय)

D:\GAD\Strike\Circular

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ४०/२०१८

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ ६०७८
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८.
दिनांक: १८ ऑक्टोबर, २०१८.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय,पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी / नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषयः रा.प.महामंडळाच्या नामिकेवर असलेल्या रुग्णालयांना CGHS च्या दराने उपचार करण्याच्या अटीवर तयार असल्यास नामिकेवरील मान्यता पुढे सुरु ठेवणेबाबत.**

**संदर्भः १)परिपत्रक क्र.९/८७ जावक क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/२२५८ दिनांक २३.०४.१९८७..**
**२)परिपत्रक क्र.२६/२००६ दि.०१.१०.२००६.**

---------

संदर्भाधिन परिपत्रकांन्वये शासन निर्णय दि.१९.०३.२००५ अन्वये शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या २७ आकस्मीक व ५ गंभीर आजारांकरिता करण्यात आलेल्या रुग्णालयीन खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये २७ आकस्मीक व ५ गंभीर आजारांची यादी जोडण्यात आली असून, ५ गंभीर आजारांकरिता रा.प.महामंडळाने नामिकेवर घेतलेल्या हृदय विकार व कर्करोगावर उपचार करणा-या व मुत्रपिंड प्रतिरोपण करणा-या / उपचार करणा-या रुग्णालयांची यादी उक्त परिपत्रकासोबत परिशिष्ट 'ब' म्हणून जोडण्यात आली आहे.

२. रा.प.महामंडळाच्या नामिकेवर असलेल्या एकूण ९२ रुग्णालयांपैकी काही रुग्णालयांना सन २००७ पासून विशिष्ट मुदतीचे पॅकेज देण्यात आले होते. या रुग्णालयांपैकी ०९ रुग्णालयांची मुदत C.G.H.S. च्या दराने उपचार करण्याच्या अटीवर या कार्यालयाचे परिपत्रक क्र.०५/२०१८ दिनांक २१.०२.२०१८ अन्वये पुढे वाढविण्यात आली आहे.

३. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३९/२०१७ अन्वये दि.२२.११.२०१७ अन्वये ०८ नवीन रुग्णालयांना मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्या शिफारशीनुसार C.G.H.S. च्या दराने उपचाराच्या अधिन रा.प.महामंडळाच्या पॅनेलवर घेण्यात आले आहे.

सध्या रा.प.महामंडळाच्या नामिकेवर एकूण ९२ रुग्णालयांपैकी १७ रुग्णालयांना C.G.H.S. चे दर लागू आहेत.

४. ५ गंभीर आजारांकरिता रा.प.नामिकेवर असलेल्या अनु.क्र.२ व ३ व्यतिरीक्त अन्य रुग्णालयांमधून उपचार घेतलेल्या कर्मचा-यांच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.२६/२००६ मधील तरतूदीनुसार करण्यात येते. त्यानुसार रुग्णालयनिहाय येणा-या खर्चामध्ये एक समानता येण्याच्या दृष्टीने रा.प.महामंडळाच्या नामिकेवरील सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ"१ नुसार सर्व रुग्णालयांना CGHS च्या दरात सामावून घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येत असून, त्या अनुषंगाने पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

कृ.मा.प. ...२..

Scanned by CamScanner

अ) सोबतच्या परिशिष्ट 'अ', मध्ये नमुद केल्यानुसार संबंधित रा.प. विभागांच्या हद्दीमध्ये येणा-या रुग्णालयांस संबंधित विभागाचे कामगार अधिकारी व मानसेवी वैद्यकीय अधिकारी भेट देतील व संबंधित रुग्णालयांकडून C.G.H.S. च्या दराने सदर रुग्णालय उपचार करण्यास तयार आहे किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन सदर प्रस्ताव त्यावरील स्वयंस्पष्ट अभिप्रायासह मध्यवर्ती कार्यालयास सादर करतील.

ब) रा.प.नामिकेवर असलेल्या ज्या रुग्णालयामधून गेल्या ५ वर्षांमध्ये एकाही रा.प.कर्मचा-याने उपचार करुन घेतले नसतील, अशा रुग्णालयांस संबंधित विभागाचे कामगार अधिकारी व मानसेवी वैद्यकीय अधिकारी भेट देऊन सदर रुग्णालयाची शासन मान्यता अद्यापही सुरु आहे किंवा कसे, याची तसेच उक्त शासन निर्णय मधील तरतूदीनुसार सदर रुग्णालय सर्व निकष पूर्ण करीत आहे किंवा कसे, याबाबत पडताळणी करुन याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल मध्यवर्ती कार्यालयास सादर करतील.

क) प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव एकत्रितरित्या मध्यवर्ती कार्यालयातील स्तरावर सक्षम प्राधिका-यांच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येतील.

वरील प्रमाणे कार्यवाही करुन मुद्देनिहाय अनुपालन अहवाल मध्यवर्ती कार्यालयास या परिपत्रकाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत निश्चितपणे सादर करण्याची दक्षता घ्यावी.

सदर परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

सोबत: १) शासन निर्दिष्ठ आजारांची यादी परिशिष्ठ 'अ'

२) परिशिष्ठ 'ब', रा.प. नामिकेवरील रुग्णालयांची यादी.

३) रा.प. नामिकेवर घेण्यासाठी शासन निर्णयानुसार रुग्णालयांना बंधनकारक अ

प्रत: माहितीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

..३..

Scanned by CamScanner

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आ.३, दि.१९ मार्च, २००५ चे सहपत्र

**परिशिष्ट 'अ'**

शासन विर्निदिष्ट २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांची यादी.

१) हृदयविकाराचा झटका (Cardiac emergency) प्रमस्तिक संहनी (cerabral vascular) फुफ्फुसाच्या विकाराचा झटका (Pulmonary emergency)/ ॲन्जिओग्राफी चाचणी
२) अति रक्तदाब (Hypertension)
~~३) धनुर्वात (Titanus)~~
४) घटसर्प (Diphtheria)
५) अपघात (Accident) आघात संलक्षण (Shock Syndrome) हृदयाशी आणि रक्तवाहिनीशी संबंधीत (Cardiological and Vascular)
६) गर्भपात (Abortions)
७) तीव्र उदर वेदना/आंत्र अवरोध (Acute abdominal pains/Intestinal obstruction)
८) जोरदार रक्तस्त्राव (Severe haemorrhage)
९) गॅस्ट्रो--एन्ट्रायटिस (Gastro--Entrietis)
१०) विषमज्वर (Typhoid)
११) निश्चतेनावस्था (Coma)
१२) मनोविकृतीची सुरुवात (Onset of psychiatric disorder)
१३) डोळ्यातील दृष्टीपटल सरकणे (Retinal detachment in the eye)
१४) स्त्रीरोगशास्त्र आणि प्रसुतीशास्त्र संबंधित यांच्याशी आकस्मिक आजार (Gynaecological and obstetric emergency)
१५) जननमुत्र आकस्मिक आजार (Genito - urinary emergency)
१६) वायू कोथ (Gas Gangrine)
१७) कान, नाक किंवा घसा यामध्ये विजातीय पदार्थ गेल्यामुळे निर्माण झालेले आकस्मिक आजार (foreign body in ear, nose or throat emergency)
१८) ज्यामध्ये तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते अशा जन्मजात असंगती (Cogenital Anamolies requiring urgent surgical intervention)
१९) ब्रेन ट्युमर (Brain Tumour)
२०) भाजणे (Burns)
२१) इपिलेप्सी (Epilepsy)
२२) ॲक्यूट ग्लॅकोमा (Acute Glaucoma)
२३) स्पायपनस स्कॉड (मज्जारज्जू) संबंधात आकस्मिक आजार
२४) उष्माघात
२५) रक्तासंबंधातील आजार
२६) प्राणी चावल्यामुळे होणारी विषबाधा
२७) रसायनामुळे होणारी विषबाधा

गंभीर आजार- भाग २

१) हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे (Heart Surgery)
२) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया (Bye pass Surgery)
३) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया
४) मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया (Kidney Transplantation)
५) रक्ताचा कर्करोग (Blood Cancer) व इतर कर्करोग.

*******

..४..

Scanned by CamScanner

| अ. क्र. | विभाग | विभागांतील रुग्णालयाचे नाव | आजाराचे नाव | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हृदयविकार | मुत्रपिंड | कर्करो |
| ३१ | औरंगाबाद | शेठ नंदलाल धुत रुग्णालय, औरंगाबाद | ----- | ----- | कर्करो |
| ३२ | औरंगाबाद | डॉ. रविंद्र कोडलीकर हॉस्पीटल, औरंगाबाद | ----- | ----- | कर्करो |
| ३३ | औरंगाबाद | दौलत मेमोरियल हॉस्पीटल, औरंगाबाद | ----- | ----- | कर्करो |
| ३४ | नागपूर | डॉ. के.जी. देशपांडे मेमोरीयल सेंटर, नागपूर | हृदयविकार | ----- | ----- |
| ३५ | नागपूर | सेंट्रल इंडिया इन्स्टीटयूट ऑफ मेडिकल सायन्स, नागपूर | हृदयविकार | ----- | ----- |
| ३६ | नागपूर | सीम्स हॉस्पीटल, नागपूर | हृदयविकार | ----- | ----- |
| ३७ | नागपूर | अवंती इन्स्टिटयूट ऑफ कॉर्डिऑलॉजी, नागपूर | हृदयविकार | ----- | ----- |
| ३८ | नागपूर | ऑरेंज सिटी हॉस्पीटल ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नागपूर | हृदयविकार | ----- | ----- |
| ३९ | नागपूर | स्पंदन हार्ट इन्स्टिटयूट ॲण्ड रिसर्च सेंटर , नागपूर | हृदयविकार | ----- | ----- |
| ४० | नागपूर | अर्नेजा हार्ट इन्स्टिटयूट, नागपूर | हृदयविकार | ----- | ----- |
| ४१ | नागपूर | क्रिसेंड नर्सिंग होम ॲण्ड इंटेन्सिव्ह कार्डियाक केअर युनिट,नागपूर | हृदयविकार | मुत्रपिंड | ----- |
| ४२ | नागपूर | एकविरा हार्ट इन्स्टि.नागपूर आताचे व्होकार्ट हार्ट हॉस्पीटल,नागपूर. | हृदयविकार | ----- | ----- |
| ४३ | नागपूर | शुअरटेक अपोलो मेडिकल सेंटर, नागपूर | ----- | मुत्रपिंड | ----- |
| ४४ | नागपूर | हेमोटॉलॉजी क्लिनिक, प्रयोगशाळा व रुग्णालय, नागपूर | ----- | ----- | कर्करो |
| ४५ | नागपूर | कॅन्सर रिलिफ सोसायटी, नागपूर | ----- | ----- | कर्करो |
| ४६ | अकोला | संत तुकाराम मेडिकल रिसर्च सेंटर, महर्षी दयानंद मार्ग, अकोला. | ----- | ----- | कर्करो |
| ४७ | अकोला | बगाडीया हॉस्पीटल, अकोला | ----- | ----- | कर्करो |
| ४८ | वर्धा | राधिकाबाई मेघे मेमोरियल मेडिकल ट्रस्ट जवाहरलाल नेहरु वैद्यकीय महाविद्यालय व आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय,वर्धा | ----- | मुत्रपिंड | कर्करो |

<u>टिप</u>:

१) परिपत्रक क्र.३९/२०१७ क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/६२३६ दिनांक २२.११.२०१७ व परिपत्रक क्र.५/२०१८ क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/११६४ दिनांक २१.०२.२०१८ अन्वये १७ रुग्णालयांना C.G.H.S. दराने रा.प.महामंडळाच्या नामिकेवर घेण्यात आले असल्याने या रुग्नालयांचा उपरोक्त यादीत समावेश करण्यात आलेला नाही.

२) १. के.ई.एम.हॉस्पीटल,पुणे २. गजानन हार्ट हॉस्पीटल,जळगाव ३. चिमोटे हार्ट हॉस्पीटल,अमरावती या रुग्णालयांची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे.

३) परिपत्रक क्र.९/८७ व २६/२००६ मधील महाराष्ट्राबाहेरील ११ रुग्णालयांच्या नावाचा उपरोक्त यादीत समावेश करण्यात आलेला नाही.

Scanned by CamScanner

शासन निर्णय दि.११.०३.२००५ नुसार मान्यता दिलेल्या रुग्णालयांच्या नावे प्रसारीत केलेल्या शासन निर्णयामध्ये विहित केल्यानुसार ०५ गंभीर आजारांवरील उपचार व शस्त्रक्रिया करण्याकरिता व त्याप्रित्यर्थ होणा-या वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती अनुज्ञेय ठरविण्यास मान्यता देण्यापूर्वी सदर रुग्णालयाने खालील अटींचे प्रकर्षाने पालन करणे बंधनकारक आहे.

१)मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० मधील कलम ४१ अे नुसार १०% रुग्णांवर मोफत व १०% रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करणे.

२) मुंबई शुश्रुषा गृहे अधिनियम १९४९ अन्वये विहित केलेल्या निकषानुसार प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग उपलब्ध करणे.

३)ज्या आजारावर उपचार करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. त्या आजाराचे संशोधन करण्यासाठी तसेच चाचण्यांअंती झालेल्या निदानानुसार शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक ती यंत्रसामुग्री रुग्णालयामध्ये उपलब्ध असणे.

४) केंद्र शासन, राज्य शासनामार्फत कार्यान्वित केलेल्या राष्ट्रीय कार्यक्रमांच्या मोहिमेमध्ये सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.

५) सदर रुग्णालयाने मुंबई नर्सिंग होम अॅक्टनुसार नोंदणीचे वेळोवेळी नुतनीकरण करणे आवश्यक राहील.

..७..

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.४४ /२०१८

जावक:राप/आस्था/४०८-ई (१)/ E6094
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८.
दिनांक -१९.११.२०१८

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प.दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम २००५...माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे नियुक्तीबाबत.

संदर्भ: १.कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.२५/२००५जा.क्र.राप/आस्था/४०८-ई (१)/४४३२ दिनांक ०१.१०.२००५

२. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.२६/२००५जा.क्र.राप/आस्था/४०८-ई (१)/४७५९ दिनांक २१.१०.२००५

३. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.०६/२००६जा.क्र.राप/आस्था/४०८-ई (१)/९०८ दिनांक २३.०२.२००६

****

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील खंड ५ येथे विहित केलेल्या तरतुदीनुसार म.रा.रा.प.महामंडळासाठी माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या सुधारित मंजुरी नुसार नियुक्त्या मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या आदेशानुसार करण्यात आलेल्या होत्या.

दि.०१.१२.२०१६ पासून प्रादेशिक कार्यालये बंद करण्यात आल्यानंतर नियंत्रण समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. नियंत्रण समिती स्तरावर माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती माहिती अधिकारांतर्गत करण्यास मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापक संचालक यांनी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे नियुक्ती करण्यात यावी.

| नियंत्रण समिती | माहिती अधिकारी | सहाय्यक माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|
| नियंत्रण समिती क्र.१- मुंबई व पुणे | वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी | उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ नेमणूक करतील तो अधिकारी | उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ |
| नियंत्रण समिती क्र.२ - औरंगाबाद व नाशिक | वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी | उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समितीक्र.२ नेमणूक करतील तो अधिकारी | उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.२ |
| नियंत्रण समिती क्र.३ - नागपूर व व अमरावती | वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी | उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.३ नेमणूक करतील तो अधिकारी | उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.३ |

..२..

Scanned by CamScanner

वरिल तवत्यात दर्शविल्याप्रमाणे माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करुन खालील नमुन्यात या कार्यालयास तसेच संबंधित जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात कळविण्यात यावी. तसेच नियुक्ती केलेल्या जन माहिती अधिकारी व अपिलिय प्राधिका-याचे पदनिर्देशनाचे फलक सुस्पष्टपणे दिसतील अशा ठळक ठिकाणी प्रदर्शित करावेत.

| अ.क्र. | नाव (पुर्ण) | हुद्दा | कार्यालयाचा पत्ता | दुरध्वनी क्रमांक | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कार्यालय | घर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

सदर परिपत्रक सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून त्याची नोंद कार्यालयीन दप्तरी ठेवण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औं.सं)

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u> मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/महाव्यवस्थापक (यं. अ)/ महाव्यवस्थापक (स्थापत्य)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य विधि अधिकारी /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी / कर्मचारी वर्ग अधिकारी (सेवा मंडळ)/ कर्मचारी वर्ग अधिकारी (राज्य संवर्ग)/ कर्मचारी वर्ग अधिकारी (घटक संवर्ग)/ अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/ (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.४६/२०१८

क्र.राप/कर्मवर्ग/मावक/ ७१८६
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई - ४०० ००८
दिनांक : १५ डिसेंबर,२०१८.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे
- उपमहाव्यवस्थापक,
  नियंत्रण समिती क्र.१ (मुंबई/पुणे)
  नियंत्रण समिती क्र.२ (नाशिक/औरंगाबाद)
  नियंत्रण समिती क.३ (अमरावती/नागपूर)
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
- विभाग नियंत्रक,
  म.रा.मा.प.महामंडळ, मुंबई/ ठाणे/ रत्नागिरी/ रायगड/ सिंधुदूर्ग/ पालघर/ पुणे/ सातारा/ सांगली/ सोलापूर/ कोल्हापूर/ नाशिक/ धुळे/ जळगांव/ अहमदनगर /औरंगाबाद/ बीड/ जालना/ नांदेड/ उस्मानाबाद/ लातूर/ परभणी/ नागपूर/ चंद्रपूर/ भंडारा/ वर्धा/ गडचिरोली/ अमरावती/ बुलडाणा/ अकोला/ यवतमाळ.

**विषयः-** सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करणेबाबत.

**संदर्भः-** कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१५/१९९७
क्र.राप/आस्था/माजा-२/२८०४ दि.२०.०५.१९९७

*****

उपरोक्त विषयाबाबतचा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः बीसीसी २०१८/प्र.क्र.५८१ ए/ २०१८ /१६-ब, दिनांक ०५ डिसेंबर,२०१८ ची प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे. तरी, सदर शासन निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करुन अनुपालन अहवाल विनाविलंब सादर करावा.

सदर परिपत्रक मिळाल्याची पोच द्यावी.

सोबत :वरीलप्रमाणे

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत :**

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ महाव्यवस्थापक (स्था.अ.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य विधि अधिकारी/ सचिव, म. रा. मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सहायक / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव यांचे माहितीसाठी.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ सहायक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/ (घटकसंवर्ग)/ (मनुष्यबळ/समन्वय)/(सामान्य प्रशासन)/ (प्रशासन)/(मुख्यालय) यांचे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

..२..

सोबत :वरीलप्रमाणे

Scanned by CamScanner

सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०१८/प्र.क्र.५८१ ए/२०१८ /१६-ब
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : ०५ डिसेंबर, २०१८.

वाचा:-

१. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८. महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८.
२. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, दिनांक २२ जानेवारी, २००४, महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती , विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी१०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम २०१८ (सन २०१८ चा **महाराष्ट्र अधिनियम क्र. ६२)** अन्वये **"सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग"** निर्माण करण्यात आला आहे.

उक्त अधिनियमातील कलम ४ (१) (ख) नुसार **सामाजिक आणि शैक्षणिक मागास** वर्गासाठी १६ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. त्यास अनुसरून, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी १०९७/ प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीमध्ये सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात उक्त अधिनियमातील कलम ७ (१) नुसार सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

शासन निर्णय :-

राज्यात **सामाजिक आणि शैक्षणिक मागास** वर्गासाठी भारतीय राज्य घटनेच्या कलम १५(४), १५(५), १६(४) व ४६ नुसार **सामाजिक आणि शैक्षणिक मागास** वर्ग (एसईबीसी) (Socially and Educationally Backward Classes) (SEBC) असा नवीन वर्ग तयार करण्यात आला असून या वर्गात मराठा समाजाचा समावेश करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने **सामाजिक आणि शैक्षणिक मागास** वर्ग (एसईबीसी.) (Socially and Educationally Backward Classes) (SEBC) वर्गासाठी, राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय /



Scanned by CamScanner

निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १६ टक्के आरक्षण विहित करण्यात येत आहे. त्यानुसार शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब दि.२९.३.१९९७ अन्वये विहित करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारित करण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन क्रमांक १ येथील, अधिनियम प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून, म्हणजेच दि. ३० नोव्हेंबर २०१८ या दिनांकापासून शासकीय / निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीसंदर्भात सोबतच्या परिशिष्ट-अ नुसार विहित करण्यात येत असलेल्या सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करण्यात यावा.

३. सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गासाठी (एसईबीसी) संदर्भाधीन क्रमांक १ येथील अधिनियमातील कलम ५ अनुसार गुणवत्तेवर नियुक्त झालेल्या सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांची संबंधित वर्गाच्या आरक्षित पदावर गणना करण्यात येऊ नये. त्यांची नियुक्ती संबंधित आरक्षण बिंदुवर दर्शवू नये. त्यांची नोंद खुल्या प्रवर्गातील बिंदुवर दर्शविण्यात यावी.

४. सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गासाठी (एसईबीसी) सरळसेवेने भरण्यात येणारी १६ टक्के आरक्षणाची पदे दिनांक ३० नोव्हेंबर २०१८ पासून भरणे आवश्यक आहे. त्यामुळे संवर्गामध्ये दिनांक ३० नोव्हेंबर २०१८ रोजी रिक्त असणारी पदे व त्यानंतर सरळसेवेच्या कोटयातील संभाव्य रिक्त होणारी पदे विचारात घेऊन चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षांकरिता सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) या वर्गाकरीता आरक्षणाची गणना करतांना, सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब व क मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

५. संदर्भ क्र. १ येथील सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२ मधील कलम १६ (१) नुसार, या अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी म्हणजेच दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ पूर्वीच सरळसेवा भरतीमधील निवड प्रक्रिया सुरू झाली असेल, अशा प्रकरणांना या अध्यादेशाच्या तरतुदी लागू होणार नाहीत. अशा प्रकरणांच्या बाबतीत, सदर अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी जे शासकीय आदेश लागू होते आणि आरक्षण अधिनियम,२००१ मधील ज्या तरतुदी लागू होत्या, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६. यापुढे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सरळसेवा भरतीसाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करावा. पूर्वीपासून आरक्षण लागू असलेल्या मागासप्रवर्गांचा अनुशेष असल्यास तो सरळसेवा भरतीच्यावेळी विचारात घेण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे,



Scanned by CamScanner

शासकीय अनुदान प्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

८. सरळसेवेद्वारे करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत, वरील प्रमाणे बिंदुनामावलीचा अवलंब करताना, सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब व क** मध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

९. हे आदेश दिनांक ३० नोव्हेंबर २०१८ पासून अंमलात येतील.

१०. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८१२०५१६५५१७०९०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHIVAJI RAGHUNATH DAUND

Digitally signed by SHIVAJI RAGHUNATH DAUND
DN: CN = SHIVAJI RAGHUNATH DAUND, C = IN, S = MAHARASHTRA, O = Personal
Date: 2018.12.05 16:22:04 +05'30'

( शिवाजी दौंड )
सचिव (साविस), महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) राज्यपाल यांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
५) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा
६) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
७) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
८) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१६) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद,
१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,



Scanned by CamScanner

१९) सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२०) सचिव,राज्य माहिती आयोग,
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२२) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२३) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२४) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२५) संचालक, समाजकल्याण, पुणे,
२६) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२७) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२८) संचालक, सेवायोजन, मुंबई,
२९) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३०) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३३) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३४) सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३५) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३६) सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३७) निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

************



Scanned by CamScanner

## परिशिष्ट – अ
## सरळसेवा १०० बिंदूनामावली

| बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र | प्रवर्ग | बिंदु क्र | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ३५ | इतर मागास वर्ग | ६९ | इतर मागास वर्ग |
| २ | अनुसूचित जमाती | ३६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ७० | खुला |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३७ | अनुसूचित जाती | ७१ | अनुसूचित जमाती |
| ४ | भटक्या जमाती (ब) | ३८ | खुला | ७२ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग |
| ५ | इतर मागास वर्ग | ३९ | इतर मागास वर्ग | ७३ | अनुसूचित जाती |
| ६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ४० | खुला | ७४ | खुला |
| ७ | भटक्या जमाती (क) | ४१ | विमुक्त जाती (अ) | ७५ | इतर मागास वर्ग |
| ८ | खुला | ४२ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ७६ | खुला |
| ९ | इतर मागास वर्ग | ४३ | अनुसूचित जाती | ७७ | भटक्या जमाती (ड) |
| १० | खुला | ४४ | खुला | ७८ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग |
| ११ | भटक्या जमाती (ड) | ४५ | इतर मागास वर्ग | ७९ | इतर मागास वर्ग |
| १२ | अनुसूचित जाती | ४६ | खुला | ८० | खुला |
| १३ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ४७ | भटक्या जमाती (ब) | ८१ | अनुसूचित जाती |
| १४ | खुला | ४८ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ८२ | खुला |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग | ४९ | इतर मागास वर्ग | ८३ | विमुक्त जाती (अ) |
| १६ | खुला | ५० | खुला | ८४ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग |
| १७ | इतर मागास वर्ग | ५१ | अनुसूचित जाती | ८५ | इतर मागास वर्ग |
| १८ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ५२ | खुला | ८६ | खुला |
| १९ | इतर मागास वर्ग | ५३ | अनुसूचित जमाती | ८७ | विशेष मागास प्रवर्ग |
| २० | खुला | ५४ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ८८ | खुला |
| २१ | अनुसूचित जाती | ५५ | इतर मागास वर्ग | ८९ | इतर मागास वर्ग |
| २२ | खुला | ५६ | खुला | ९० | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग |
| २३ | अनुसूचित जमाती | ५७ | भटक्या जमाती (क) | ९१ | अनुसूचित जाती |

..८..



Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २४ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ५८ | खुला | ९२ | खुला |
| २५ | इतर मागास वर्ग | ५९ | इतर मागास वर्ग | ९३ | अनुसूचित जमाती |
| २६ | खुला | ६० | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ९४ | खुला |
| २७ | अनुसूचित जाती | ६१ | अनुसूचित जाती | ९५ | इतर मागास वर्ग |
| २८ | खुला | ६२ | खुला | ९६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग |
| २९ | इतर मागास वर्ग | ६३ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| ३० | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ६४ | खुला | ९८ | खुला |
| ३१ | भटक्या जमाती (क) | ६५ | इतर मागास वर्ग | ९९ | भटक्या जमाती (ब)/(क) |
| ३२ | खुला | ६६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | १०० | खुला |
| ३३ | अनुसूचित जमाती | ६७ | अनुसूचित जाती | | |
| ३४ | खुला | ६८ | खुला | | |

## प्रवर्गनिहाय आरक्षित बिंदु

| अनुक्रमांक | प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी | बिंदु क्रमांक | |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १३ % | १, १२, २१, २७, ३७, ४३, ५१, ६१, ६७, ७३, ८१, ९१, ९७ | |
| २ | अनुसूचित जमाती | ७ % | २, २३, ३३, ५३, ६३, ७१, ९३ | |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३% | ३, ४१, ८३, | |
| ४ | भटक्या जमाती (ब) | २.५% | ४, ४७ | ९९(ब/क) |
| ५ | भटक्या जमाती (क) | ३.५% | ७, ३१, ५७, | |
| ६ | भटक्या जमाती (ड) | २% | ११, ७७ | |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | २% | १५, ८७ | |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | १९% | ५, ९, १७, १९, २५, २९, ३५, ३९, ४५, ४९, ५५, ५९, ६५, ६९, ७५, ७९, ८५, ८९, ९५ | |
| ९ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | १६% | ६, १३, १८, २४, ३०, ३६, ४२, ४८, ५४, ६०, ६६, ७२, ७८, ८४, ९०, ९६ | |
| ११ | खुला | ३२% | ८,१०, १४, १६,२०, २२, २६, २८, ३२, ३४, ३८,४०, ४४, ४६, ५०, ५२, ५६,५८, ६२, ६४, ६८, ७०, ७४, ७६,८०, ८२, ८६, ८८,९२, ९४,९८, १०० | |

..८..



Scanned by CamScanner

## परिशिष्ट - ब

### बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सूचना.

१) सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात सन २०१८चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२ मधील तरतुदींस अनुसरुन सुधारित बिंदुनामावली तयार करताना या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार विहित केलेली १०० बिंदुनामावली वापरण्यात यावी.

२) बिंदुनामावलीचा वापर करताना सेवा प्रवेश नियमातील तरतुदींनुसार संवर्गाच्या एकूण मंजूर पदसंख्येपैकी सरळसेवा कोट्यातील पदांची संख्या निश्चित करण्यात यावी.

३) दिनांक ३० नोव्हेंबर,२०१८ रोजी भरती प्रक्रिया सुरु न झालेल्या संवर्ग निहाय सरळसेवेच्या रिक्त पदांची संख्या निश्चित करावी.

४) भरती वर्ष-१ (दि. ०१ डिसेंबर, २०१८ ते दि. ३१ डिसेंबर,२०१९ ) या भरतीवर्षातील सरळसेवेच्या संभाव्य रिक्त पदांची संख्या निश्चित करावी.

अ) वरील प्रमाणे अ.क्र.२,३,४ नुसार एकूण प्रवर्ग निहाय सरळसेवेच्या रिक्त होणा-या पदांची खालील प्रमाणे आरक्षण निश्चिती करावी. ही आरक्षण निश्चित करताना दि. ३० नोव्हेंबर ,२०१८ रोजी संवर्गातील सरळसेवा कोट्यातील एकूण मंजूर पदसंख्येला (अ.जा.-१३ %, अ.ज.७%, विजा-अ ३%, भ.ज.(ब)-२.५%, भ.ज.(क)-३.५%, भ.ज.(ड)-२%, विमाप्र-२% व इमाव-१९%) एकूण ५२ टक्के आरक्षण विचारात घेऊन आरक्षित पदांची गणना करावी.

| अ क्र | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | खुला ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | | | | | | | | | | |
| २ | भरलेली पदे | | | | | | | | | | |
| ३ | दि.३०.११.२०१८ रोजीची रिक्त पदे | | | | | | | | | | |
| ४. | दि.०१.१२.२०१८ ते ३१.१२.२०१९ या कालावधीतील संभाव्य रिक्त पदे | | | | | | | | | | |
| ५. | एकूण रिक्त पदे | | | | | | | | | | |

आ) दि.३० नोव्हेंबर ,२०१८ रोजी वरील आरक्षणानुसार प्रवर्ग निहाय मागास प्रवर्गाची व खुल्या प्रवर्गाची किती पदे कार्यरत आहेत, याची गणना करावी.

इ) दि. ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत संभाव्य रिक्त होणा-या पदांची संख्या विचारात घेऊन त्यावर नव्याने आरक्षण लागू केलेल्या सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गासाठी १६% आरक्षणाची गणना करावी.

..९..



Scanned by CamScanner

## परिशिष्ट-क

उदा. एखाद्या संवर्गात मंजूर पदसंख्या १०० आहे. दि.३० नोव्हेंबर, २०१८ पर्यंत या संवर्गात ६७ पदे कार्यरत असुन ३३ पदे रिक्त आहेत, असे गृहित धरल्यास त्या संवर्गाचा प्रवर्गनिहाय तपशील खालील प्रमाणे राहील-

| अ.क्र | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | खुला ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | १३ | ७ | ३ | ३ | ३ | २ | २ | १९ | ४८ | १०० |
| २ | भरलेली पदे | १० | ५ | २ | १ | २ | १ | १ | १५ | ३० | ६७ |
| ३ | दि.३०.११.२०१८ रोजी रिक्त पदे | ३ | २ | १ | २ | १ | १ | १ | ४ | १८ | ३३ |
| ४ | दि.०१.१२.२०१८ ते दि. ३१.१२.२०१८ या कालावधीतील संभाव्य रिक्त पदे | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ | ७ |
| ५ | दि.०१.०१.२०१९ ते ३१.१२.२०१९ या कालावधीतील संभाव्य रिक्त पदे | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ५ | ८ |
| ६ | एकूण रिक्त पदे | ४ | ४ | २ | २ | १ | १ | १ | ७ | २६ | ४८ |

वरिल उदाहरणात खुल्या प्रवर्गात २६ पदे रिक्त आहेत.त्यावरून एसईबीसी वर्गाकरीता १६ टक्के आरक्षणानुसार पदे निश्चित करताना खाली दिलेल्या उदाहरणानुसार कार्यवाही करावी.

भरती वर्ष-१

(दि.१.१२.२०१८ ते दि.३१.१२.२०१९)

| खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे | एसईबीसी करिता खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांच्या १६ टक्केनुसार येणारी पदे | भरती प्रक्रियेअंती एसईबीसी वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|
| २६ | ४.१६<br>पुर्णांकात ४ पदे | ३ |

पहिल्या भरती वर्षात एसईबीसी करिता ४ पदे उपलब्ध होतील.



Scanned by CamScanner

भरती वर्ष-२

(दि.१.०१.२०२० ते दि.३१.१२.२०२०)

| खुल्या प्रवर्गातील मागील वर्षातील रिक्त पदे + चालू भरती वर्षातील रिक्त पदे | एसईबीसी करिता खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांच्या १६ टक्केनुसार येणारी पदे | चालू भरती वर्षात एसईबीसी वर्गासाठी उपलब्ध पदे | भरती प्रक्रियेअंती एसईबीसी वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २६ +२०= ४६ | ४६ पदांच्या १६ टक्के= ७.३६<br>पुर्णांकात ७ पदे | स्तंभ २ प्रमाणे उपलब्ध पदे - मागील वर्षातील एसईबीसी ची कार्यरत पदे<br>७-३=४ | ३ |

दुस-या भरती वर्षात एसईबीसी करिता ४ पदे उपलब्ध होतील.

भरती वर्ष-३

(दि.१.१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१)

| खुल्या प्रवर्गातील मागील दोन वर्षातील रिक्त पदे + चालू भरती वर्षातील रिक्त पदे | एसईबीसी करिता खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांच्या १६ टक्केनुसार येणारी पदे | चालू भरती वर्षात एसईबीसी वर्गासाठी उपलब्ध पदे | भरती प्रक्रियेअंती एसईबीसी वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २६ +२०+३२= ७८ | ७८ पदांच्या १६ टक्के= १२.४८<br>पुर्णांकात १२ पदे | स्तंभ २ प्रमाणे उपलब्ध पदे - मागील दोन वर्षातील एसईबीसी ची कार्यरत पदे ( १ ल्या भरती वर्षातील + २ -या भरती वर्षातील कार्यरत पदे) १२-६ =६ | ६ |

तिस-या भरती वर्षात एसईबीसी करिता ६ पदे उपलब्ध होतील.



Scanned by CamScanner

भरती वर्ष-४

(दि.१.१.२०२२ ते दि.३१.१२.२०२२)

| खुल्या प्रवर्गातील मागील तीन वर्षातील रिक्त पदे + चालू भरती वर्षातील रिक्त पदे | एसईबीसी करिता खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांच्या १६ टक्केनुसार येणारी पदे | चालू भरती वर्षात एसईबीसी वर्गासाठी उपलब्ध पदे | भरती प्रक्रियेअंती एसईबीसी वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २६ +२०+३२+२२=१०० | १०० पदांच्या १६ टक्के= १६ | स्तंभ २ प्रमाणे उपलब्ध पदे - मागील तीन वर्षातील एसईबीसीची कार्यरत पदे ( १ ल्या + २ -या + ३ -या भरती वर्षातील कार्यरत पदे) १६-१२= ४ | |

**चौथ्या भरती वर्षात एसईबीसी करिता ४ पदे उपलब्ध होतील.**

वरिलप्रमाणे आरक्षण गणनेची कार्यवाही जोपर्यंत सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाकरीता (एसईबीसी) अनुज्ञेय १६ टक्के आरक्षणानुसार पर्याप्त आरक्षित पदे उपलब्ध होत नाहीत,तोपर्यंत चालू ठेवावी.

५) वरीलप्रमाणे आरक्षण गणनेची कार्यवाही जोपर्यंत सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गासाठी अनुज्ञेय १६ टक्के आरक्षणानुसार पर्याप्त आरक्षित पदे उपलब्ध होत नाहीत, तोपर्यंत चालू ठेवावीत. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गासाठी १६ टक्के आरक्षणानुसार पर्याप्त आरक्षित पदे उपलब्ध झाल्यानंतर मात्र प्रत्येक प्रवर्गनिहाय अनुज्ञेय टक्केवारीनुसार त्या-त्या प्रवर्गाची पदे भरण्यात यावीत.

६) पद भरती केलेल्या सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांची बिंदुनामावलीत बिंदु क्रमांक ६ पासून नोंद प्रारंभ करून यानुसार त्यापुढे सदर वर्गासाठीच्या बिंदुंवर नोंद करावी.

७) सुधारित बिंदुनामावली तयार करताना सध्या असलेली संवर्गातील सरळसेवा कोटयातील पदसंख्या लक्षात घेऊन आरक्षण बिंदु निश्चित करण्यात यावेत. भविष्यात संवर्ग संख्येत वाढ झाल्यास, अथवा घट झाल्यास, संबंधित वर्षाची बिंदुनामावली तयार करताना सरळसेवा कोट्यातील पदसंख्येनुसार आरक्षित बिंदुंची संख्या त्या प्रमाणात जास्त अथवा कमी करण्यात यावी.

८) सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी, त्यांच्या अधिनस्त सर्व आस्थापनांना वरील विविध संवर्गाच्या बाबतीत यानुसार योग्य ती कार्यवाही तातडीने करण्याच्या सुचना द्याव्यात. प्रत्येक संवर्गाबाबत वरील मार्गदर्शक सूचनांनुसार केलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व योग्य त्या प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली आहे याची खातरजमा करण्यात यावी.

९) सध्या आरक्षणासंदर्भात अस्तित्वात असलेले विविध शासन आदेश वरीलप्रमाणे सुधारण्यात आले असल्याचे गृहित धरण्यात यावे.

............



Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ८७/२०१८ ८७/१८

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/ ७२६०
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४०००८.
दिनांक - १९.१२.२०१८

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/ (समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र. ३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प.दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय - नियमित बढती नाकारल्यास निवडश्रेणी/श्रेणीकरण काढून घेण्याबाबत.

महामंडळाच्या प्रचलित सेवा विनियमानुसार वर्ग-३ व वर्ग-४ या प्रवर्गातील सर्वच कर्मचा-यांना बढतीची संधी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यासाठी खात्यामार्फत बढती परिक्षा घेण्यात येते. बढती परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना बढतीपदी नेमणूक देण्यात येते. परंतु निवडश्रेणी / श्रेणीकरणाचा लाभ दिल्याने कर्मचारी बढतीच्या ठिकाणी जाण्यास उत्सुक नसतात. असे निदर्शनास येत आहे.

२. काही विशिष्ट प्रवर्गातील कर्मचा-यांना ठराविक सेवा कालावधी पूर्ण केल्यानंतर निवडश्रेणी दिली जाते. ज्यामध्ये लगतच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी देऊन वेतननिश्चिती केली जाते. निवडश्रेणी दिल्यानंतर त्या कर्मचा-याची अन्यत्र बदली केली जात नाही. निवडश्रेणी/ श्रेणीकरण मिळालेल्या कर्मचा-यास अन्यत्र बदली न होता बढतीचे पद वगळता बढतीबाबतचे सर्व आर्थिक फायदे मिळतात. त्यामुळे बरेच कर्मचारी बढतीवर बदलीच्या ठिकाणी हजर होत नाहीत. परिणामस्वरुप महामंडळाच्या दैनंदिन कामकाजावर त्याचा विपरित परिणाम होत असल्याने खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

३. "यापुढे जे कर्मचारी बढतीवर बदलीच्या ठिकाणी हजर होणार नाहीत, अशा कर्मचा-यांची पदग्रहण अवधी संपल्याच्या दुस-या दिवसापासून संबधित कर्मचा-याची नियमित बढती रद्द करुन त्यांच्या सध्याच्या लगतच्या पदात देण्यात आलेली निवडश्रेणी / श्रेणीकरण काढून घेऊन, धारण केलेल्या पदावर वेतनश्रेणीमध्ये नव्याने वेतननिश्चिती करण्यात यावी."

४. सदरचे परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रक सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून द्यावे व तशी नोंद दप्तरी ठेवण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.सं)

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/महाव्यवस्थापक (यं. अ)/ महाव्यवस्थापक (स्थापत्य)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य विधि अधिकारी /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी / कर्मचारी वर्ग अधिकारी (सेवा मंडळ)/ कर्मचारी वर्ग अधिकारी (राज्य संवर्ग)/ कर्मचारी वर्ग अधिकारी (घटक संवर्ग)/ अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव/उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/ (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/ (मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/ घटकसंवर्ग

Scanned by CamScanner

<u>कर्मचारीवर्ग खाते</u>

दिनांक : ०४.१२.२०१८

सादर :

**<u>विषय-</u> नियमित बढती नाकारल्यास निवडश्रेणी/श्रेणीकरण काढून घेण्याबाबत.**

***

मुख्य कामगार अधिकारी यांनी पत्र क्र.साप/मुकाअ/१८५१ दिनांक २० नोव्हेंबर २०१८ अन्वये राप कर्मचा-यांनी बढतीसाठी लेखी परिक्षा व व्यावसायिक चाचणी उत्तीर्ण झाल्यानंतर नियमित बढती नाकारल्यास त्यांना मिळालेली निवडश्रेणी / श्रेणीकरण काढून घेण्यात यावेत. असा निर्णय सन २०१६-२०२० च्या वाटाघाटी समितीच्या बैठकीमध्ये झाला होता. त्यासंदर्भात परिपत्रक कर्मचारीवर्ग खात्याकडून निर्गमित करण्याबाबत कामगार शाखेकडून सक्षम प्राधिका-यांस टिपणी सादर करण्यात आली होती. त्या टिपणीस सक्षम प्राधिका-यांनी मंजूरी दिली आहे.

टिपणीच्या अनुषंगाने परिपत्रकाचा मसुदा मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. कृपया त्यास मान्यता मिळावी. मसुदा मान्य असल्यास त्यानुसार परिपत्रकीय सुचना निर्गमित करण्यात येतील.

कृपया आदेशार्थ सादर.

१२ सप्टेंबर, २०१८

(गं.वि.चंद्रमोरे)

सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी (साप्र)

(अ.भा. गायकवाड)

कर्मचारीवर्ग अधिकारी

(प्र.ब.पवार)

मुख्य कामगार अधिकारी

(माधव काळे)

महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

[illegible] खाते

[illegible] मुंबई-

(अ.आ.फळणीकर)

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी

(रणजितसिंह देओल)

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

[illegible]UNIT DEPT.

[illegible] No.

[illegible]

ACCOUNTS DEPT.

OUTWARD No. 2236

DATE: 12/12/2018

उपा. व. व्य. संचालक

[illegible]

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८
आवक क्र. ....२२८३....
दिनांक. २०.११.१८

**कामगार शाखा**
जा.क्र.राप/मुकाअ/ १८८३१
दिनांक : २०नोव्हेंबर, २०१८

प्रति,
**मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी......यांस**

**विषय : नियमित बढती नाकारल्यास निवडश्रेणी/श्रेणीकरण काढून घेण्याबाबत.**

------

वरील संदर्भित विषयानुसार रा.प.कर्मचाऱ्यांनी बढतीसाठी लेखी परिक्षा व व्यवसायिक चाचणी उत्तीर्ण झाल्यावर नियमित बढती नाकारल्यास त्यांना मिळालेली निवडश्रेणी / श्रेणीकरण काढून घेण्यात यावे, असा निर्णय २०१६-२०२० च्या वाटाघाटसमितीच्या बैठकीत झालेला आहे. या संबधात परिपत्रक कर्मचारीवर्ग खात्याकडून निर्गमित करण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांकडे कार्यालयीन टिप्पणी सादर करण्यात आली होती. सदर टिप्पणीस सक्षम प्राधिकाऱ्यांनी मंजूरी दिलेली आहे. या मंजूरी संबधातील मूळ कागदपत्रे, याबाबतचे परिपत्रक निर्गमित करण्याबाबत आपणाकडे पाठविण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

८१५११२
मुख्य-कामगार अधिकारी

D:\Parab\Deptt. Letter.docx(६४)

Scanned by CamScanner

कामगार शाखा
राप/मुकाअ/१७१०
दि. १८ ऑक्टोबर, २०१८

सादरः

विषय : नियमित वढती नाकारल्यास निवडश्रेणी/श्रेणीकरण काढून घेण्यावावत.

दि. १५.१०.२०१८ रोजी नाशिक येथे झालेल्या तिमाही आढावा समितीच्या बैठकीमध्ये, अनेक कर्मचारी वढती दिल्यानंतर नेमणूकीच्या टिकाणी हजर होत नाही व वढती नाकारतात, त्यामुळे मनुष्यबळाची कमतरता निर्माण होते, तसेच वढती परिक्षा घेण्यासाठी केलेले सर्व प्रयत्न निष्फळ टरतात, त्यामुळे त्यावर काही मार्ग काढावा, असे उपस्थित विभाग नियंत्रक व यंत्र अभियंता (चा.) यांनी मत मांडले त्यावेळी झालेल्या चर्चेनुसार खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

महामंडळाच्या प्रचलित सेवा विनियमानुसार वर्ग ३ व ४ प्रवर्गातील सर्वच कर्मचाऱ्यांना वढतीची संधी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यासाठी लेखी परिक्षा तसेच कार्यशाळा कर्मचाऱ्यांसाठी व्यवसायिक चाचणी घेतली जाते त्यामध्ये उत्तीर्ण होणाऱ्या कर्मचा-यांना जागेच्या उपलब्धतेनुसार नियमित वढती दिली जाते. नियमित वढती देताना जागा उपलब्ध नसल्यास वदली अपरिहार्य असते. परंतू वदली झाल्यास कर्मचारी नियमित वढती नाकारतात असे दिसून येते.

काही विशिष्ट प्रवर्गातील कर्मचाऱ्यांच्या टराविक सेवा कालावधी पुर्ण केल्यानंतर निवडश्रेणी दिली जाते. ज्यामध्ये वरिष्ट पदाची वेतनश्रेणी देऊन वेतननिश्चिती केली जाते. यामध्ये वदलीचा प्रसंग उद्‌भवत नाही. निवडश्रेणी मिळालेल्या कर्मचारी वढतीचे पद वगळता वढतीचे फायदे मिळतात. त्यामुळे वढतीवर वदलीच्या टिकाणी जाण्यास कर्मचारी उत्सूक राहत नाही.

सन २०१६-२०२० या कामगार करारातील मान्यताप्राप्त संघटनेवरोवर दि.०८.०३.२०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये यावावत चर्चा होऊन "वढती परिक्षेमध्ये सूट देता येणार नाही. नियमित वढती नाकारल्यास निवडश्रेणी / श्रेणीकरण काढून घेण्यात यावे," असा निर्णय झालेला आहे. कामगार करार अद्याप अस्तित्वात आलेला नाही. कामगार करार करतेवेळी या तरतूदीचा त्यावेळी समावेश करता येईल. तथापि तोपर्यंत वरील प्रमाणे निर्णय झाल्यानुसार तशा स्वरुपाच्या परिपत्रकीय सुचना देता येतील. आपली मान्यता असल्यास कर्मचारीवर्ग खात्याकडून परिपत्रक निर्गमित करण्याचे आदेश व्हावेत, ही विनंती.

आपल्या मान्यतेस्तव सविनय सादर.

मुख्य कामगार अधिकारी
(प्र.व.पवार)

कामगार शाखा
आवक क्र. ६०४८
दि. १४/११/२०१८

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)
(माधव काळे)

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
(रणजित सिंह देओल)

Scanned by CamScanner

परिपत्रक

क्रमांक:रापआस्था/४०८-ई(१)/ ६२९८
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८
दिनांक:३० .१०.२०१८

- महाव्यवस्थापक (आवेदन),रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण),रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प.दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय- विभाग/घटक प्रमुखांची स्वाक्षरीनेच मध्यवर्ती कार्यालयास पत्रव्यवहार करणेबाबत.

----

मध्यवर्ती कार्यालयाच्या असे निदर्शनास येते की,विभाग/घटकांकडून मध्यवर्ती कार्यालयाशी पत्र व्यवहार करताना त्यावर विभाग / घटक प्रमुखांची स्वाक्षरी न घेता कनिष्ठ अधिका-यांची विभाग / घटक प्रमुख करीता स्वाक्षरी करुन मध्यवर्ती कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्यात येतो.ही बाब कार्यालयीन शिस्तीस धरुन नाही.

२. मध्यवर्ती कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना विभाग /घटक प्रमुखांच्याच सहीने पत्रव्यवहार करण्यात यावा,कनिष्ठ अधिका-यांच्या सहीने पत्रव्यवहार केल्यास अशा पत्रांची दखल घेतली जाणार नाही.

३. तसेच रजा,बदल्या,बढत्या,अपराध कारवाई,वेतनवाढी,वेतनश्रेणी,निवृत्ती वेतन,भविष्य निर्वाह निधी, उपदान,विकलांग रजा इ. बाबत दैनंदिन प्रशासकीय कामकाजासंबधी परिपत्रकीय सुचना स्वयंस्पष्ट आहेत. याबावत विभाग / घटक कार्यालयाने नियमाधीन कार्यवाही करावी. धोरणात्मक बाबीशिवाय मध्यवर्ती कार्यालयाकडे मार्गदर्शन न मागविता आपले स्तरावर नियमाधीन पद्वतीने कामकाज हाताळावे,रा.प. कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या तक्रारींचे विभाग / घटक पातळीवर तात्काळ निवारण करण्यात यावे.तसेच प्रशासन व कामगार यांच्यातील संबधात कटुता निर्माण होणार नाही व औद्योगिक शांततेस बाधा उत्पन्न होणार नाही,याची काळजी घ्यावी.

उपरोक्त सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/महाव्यवस्थापक (यं. अ)/ महाव्यवस्थापक (स्थापत्य)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य विधि अधिकारी /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी / कर्मचारी वर्ग अधिकारी(सेवा मंडळ)/ कर्मचारी वर्ग अधिकारी (राज्य संवर्ग)/ कर्मचारी वर्ग अधिकारी (घटक संवर्ग)/ अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/ (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/ समन्वय)/ (घटकसंवर्ग).

Scanned by CamScanner

अत्यंत महत्त्वाचे/तातडीचे.

क्र.राप/कर्मवर्ग/म.व./ ६४५०
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक :०५ नोव्हेंबर, २०१८.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उप महाव्यवस्थापक(समिती क्र.१ मुंबई व पुणे )/(समिती क्र.२नाशिक व औरंगाबाद)/ (समिती क्र.३नागपूर व अमरावती).
- कार्यकारी अभियंता, रा.प.मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ.

विषय :- खात्यांतर्गत वढतीसाठी लेखी परीक्षा व व्यवसाय चाचणी घेण्याकरीता कार्यवाही करण्यावावत.

संदर्भ :- क्र.राप/कर्मवर्ग/म.व./६३२१ दिनांक ३१.१०.२०१८.

***

वरील संदर्भित पत्रान्वये दिनांक २५.११.२०१८ रोजी खात्यांतर्गत वढतीसाठी लेखी परीक्षा व व्यवसाय चाचणीचे आयोजन करण्यावावत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्यामध्ये यांत्रिक पदांची व्यवसाय चाचणी दिनांक २५.११.२०१८ पासुन आयोजित करण्यात यावी. असा अंशत: वदल करण्यात येत आहे. बाकी संदर्भित पत्रात दिलेल्या सूचनांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व आ.स.)

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक(वाहतूक)/ महाव्यवस्थापक(भांवख)/महाव्यवस्थापक(यं.अ.)/ महाव्यवस्थापक(नियप)/उपमहाव्यवस्थापक(मावतं)/ मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामागर अधिकारी/ मुख्य लेखा परीक्षण अधिकारी/ विधि सल्लागार/ जनसंपर्क अधिकारी/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ.

२) मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक/मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव.

३) कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ कर्मचारीवर्ग अधिकारी /राज्यसंवर्ग/ सा.प्रशासन/प्रशासन)/ कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय /मनुष्यबळ/घटकसंवर्ग/मागासवर्ग कक्ष) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

४) सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ (राज्यसंवर्ग) / (मागासवर्गकक्ष)/ (घटकसंवर्ग)(प्रशासन)/(सामान्य प्रशासन)(मनुष्यबळ/समन्वय) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

E:\BPP २०१८\Examination\JA ATI TC November २०१८.docx

Scanned by CamScanner

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४८६-ई/ ६५४५
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : १२/११/२०१८.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, मुंबई.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१ - मुंबई व पुणे) / (समिती क्र.२ - औरंगाबाद - नाशिक) / (समिती क्र.३ - नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/ पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ ठाणे/ नाशिक/ जळगांव/ धुळे/ अहमदनगर/ पुणे/ कोल्हापूर/ सांगली/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ नांदेड/ उस्मानाबाद/ परभणी/ नागपूर/ भंडारा/ चंद्रपूर/ गडचिरोली/ वर्धा/ अमरावती/ अकोला/ बुलडाणा/ यवतमाळ.

....

**विषय : अनुकंपा तत्त्वावर रा.प.कर्मचा-यांच्या एका अवलंबितास वर्ग-३ राज्यसंवर्ग पदामध्ये नेमणूक देण्याबाबत.**

संदर्भ : १) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१६/२०१६
क्र.राप/कर्मवर्ग/आस्था /४८६-ई/२५०१, दिनांक २५.०५.२०१६.
२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३९/२०१८
क्र.राप/कर्मवर्ग/आस्था /४०८-ई (१)/५८९२, दिनांक १०.१०.२०१८.

***

रा.प.महामंडळाद्वारे अनुकंपा तत्त्वावर कर्मचा-यांच्या एका अवलंबितास वर्ग - ३ (राज्यसंवर्ग) मधील (१) वाहतुक निरिक्षक (कनिष्ठ) (२) सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक (कनिष्ठ), (३) लेखाकार (कनिष्ठ), (४) भांडारपाल (कनिष्ठ), (५) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (कनिष्ठ) या संवर्गामध्ये विहीत केलेली शैक्षणिक अर्हता व शारिरीक पात्रतेच्या अधीन, तसेच बिंदु नामावली व इतर सर्व तरतूदींचे पालन करुन अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्याबाबत कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१६/२०१६, दिनांक २५.०५.२०१६ नुसार सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३९/२०१८, दिनांक १०.१०.२०१८ नुसार रा.प.महामंडळातील सर्व कर्मचा-यांना दिनांक २५.०४.२०१८ पासून नियमित वेतनश्रेणी लागू करण्यात आली असून कनिष्ठ वेतनश्रेणी रद्द करण्यात आली आहे.

३. तथापि, कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक २०/२०१८, जा.क्र.राप / कर्मवर्ग / म.व./ ३०१२, दिनांक २१.०५.२०१८ नुसार वर्ग - ३ (राज्यसंवर्ग) मधील ९ प्रवर्गांची वेतनश्रेणी उन्नत करुन त्यांना वर्ग - २ (कनिष्ठ) अधिकारी या पदाचा दर्जा देण्यात आलेला आहे. सदर ९ प्रवर्गांमध्ये उपरोक्त परिच्छेद १ मध्ये नमुद केलेल्या सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक व कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या दोन संवर्गांचा समावेश आहे. त्यामुळे हे दोन संवर्ग सोडून वर्ग - ३ (राज्यसंवर्ग) मधील (१) वाहतुक निरिक्षक (२) लेखाकार, (३) भांडारपाल या ३ प्रवर्गामध्ये अनुकंपा तत्त्वावर नेमणूक देण्याबाबत कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १६/२०१६, दिनांक २५.०५.२०१६ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १६/२०१६ मधील इतर सुचनांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

श्री. जाधव
१७.११.२०१८

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.सं.)

**प्रत माहितीसाठी अग्रेषित**

- मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्य विधी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / प्रादेशिक व्यवस्थापक-उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१, २ व ३) मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यस्तरीय मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

H:\२०१८-Anukampa\A-Circular २०१८.docx

Scanned by CamScanner

अत्यंत महत्वाचे/तातडीचे.

जा.क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./ ६५९७
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उप महाव्यवस्थापक(समिती क्र.१ मुंबई व पुणे )/(समिती क्र.२ नाशिक व औरंगाबाद)/ (समिती क्र.३ नागपूर व अमरावती).
- कार्यकारी अभियंता, रा.प.मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ.

विषय :- दिनांक २५.११.२०१८ रोजी वरिष्ठ लिपिक, सहाय्यक वाहतूक निरीक्षक व वाहतूक नियंत्रक या पदी खात्यांतर्गत बढतीसाठी घेण्यात येणा-या लेखी परीक्षेबाबत.

संदर्भ :- १) क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./६३२९ दि.३१.१०.२०१८.
२) क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./६४५० दि.५.११.२०१८.

****

या कार्यालयाचे संदर्भित पत्र क्र.१ अन्वये वरिष्ठ लिपिक, सहाय्यक वाहतूक निरिक्षक व वाहतूक नियंत्रक या पदाच्या खात्यांतर्गत बढतीसाठी लेखी परीक्षा दिनांक २५.११.२०१८ रोजी सकाळी ११.०० ते १४.०० एकाच वेळी घेण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) सदर परिक्षेसाठी केंद्र ठरविणे व संनियंत्रण अधिका-यांची नेमणूक करणे इत्यादी सर्व कार्यवाही संबंधित विभाग नियंत्रक यांनी करावयाची आहे. रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा दापोडी-पुणे ,औरंगाबाद व नागपूर येथील सदर परीक्षेसाठी केंद्र ठरविणे व संनियंत्रण अधिका-यांची नेमणूक करणे इत्यादी सर्व कार्यवाही संबंधित कार्यशाळा व्यवस्थापक यांनी करावयाची आहे.

२) सदर लेखी परीक्षेसाठी तयार करावयाच्या उत्तरपत्रिकेच्या पहिल्या पानाचा नमुना सोबत जोडण्यात येत आहे. सदर नमुन्यानुसार उत्तरपत्रिकांचे पहिले पान तयार करण्यात यावे.

३) वरील तीनही पदांच्या बढती परीक्षेसाठी सर्व विभाग/ घटकातील सहाय्यक/ विभागिय कर्मचारीवर्ग अधिकारी किंवा आस्थापना पर्यवेक्षक किंवा संबंधित प्रतिनिधी यांना अधिकार पत्र देऊन रा.प.मध्यवर्ती कार्यालय मुंबई येथे **दिनांक २०.११.२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता** आपल्या विभागासाठीचा प्रश्नपत्रिका संच ताब्यात घेण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

-२-

Scanned by CamScanner

४) दिनांक २५.११.२०१८ रोजी परीक्षा झाल्यानंतर दि.२६.११.२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत संबंधित सहाय्यक /विभागिय कर्मचारीवर्ग अधिकारी यांनी सर्व उत्तरपत्रिका रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी येथे मध्यवर्ती कार्यालयाच्या प्रतिनिधींकडे सुपुर्द करण्याबाबत सहाय्यक/ विभागिय कर्मचारीवर्ग अधिकारी यांना सूचना देण्यात याव्यात. उत्तरपत्रिकांसोबत परीक्षेकरिता पात्र ठरलेल्या कर्मचा-यांची संख्या, उपस्थित व अनुपस्थित कर्मचा-यांची संख्या (फक्त आसन क्रमांकासह) असा पदनिहाय गोषवारा देण्यात यावा. हजेरीपत्रक पाठविण्यात येऊ नये.

५) तसेच वरिष्ठ लिपिक, सहाय्यक वाहतूक निरिक्षक व वाहतूक नियंत्रक या प्रवर्गातील खात्यांतर्गत बढती परीक्षेस बसण्यास विभाग / घटकांकडून परवानगी दिलेल्या कर्मचा-यांचे परीक्षा पूर्व प्रशिक्षण वर्ग घेण्याची व्यवस्था विभाग/ घटक स्तरावर रा.प.महामंडळाच्या प्रचलित नियमानुसार घेण्याबाबत सबंधित कार्यशाळा व्यवस्थापक/विभाग नियंत्रक यांनी दक्षता घ्यावी. **सदर परीक्षा प्रक्रियेसंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार उद्भवणार नाही, याची सर्व संबंधितांनी व्यक्तिशः दक्षता घ्यावी.**

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक(वाहतूक)/ महाव्यवस्थापक(भांवख)/महाव्यवस्थापक(यं.अ.)/ महाव्यवस्थापक(निवप)/उपमहाव्यवस्थापक(मावतं)/ मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामागर अधिकारी/ मुख्य लेखा परीक्षण अधिकारी/ विधि सल्लागार/ जनसंपर्क अधिकारी/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ.

२) मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक.

३) मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव.

४) कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ कर्मचारीवर्ग अधिकारी /राज्यसंवर्ग/ सा.प्रशासन/प्रशासन)/ कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय /मनुष्यबळ/घटकसंवर्ग/मागासवर्ग कक्ष)रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

५) सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ (राज्यसंवर्ग) / (मागासवर्गकक्ष)/ (घटकसंवर्ग)(प्रशासन)/(सामान्य प्रशासन)(मनुष्यबळ/समन्वय) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

Scanned by CamScanner

परिपत्रक.

क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./ ६६२८
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक :१५ नोव्हेंबर, २०१८.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उप महाव्यवस्थापक(समिती क्र.१ मुंबई व पुणे )/(समिती क्र.२नाशिक व औरंगाबाद)/ (समिती क्र.३नागपूर व अमरावती).
- कार्यकारी अभियंता, रा.प.मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ.

विषय :- ई.टी.आय.एम.प्रणालीच्या वापरामुळे गोठविण्यात आलेल्या लिपिक-टंकलेखक, वाहतूक नियंत्रक व सहाय्यक/शिपाई प्रवर्गांच्या मंजुरीबाबत.

संदर्भ :- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/१५५७ दि.९.४.२०१३.
२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.०५/२०१३ दि.१६.२.२०१६.

***

उपरोक्त संदर्भित परिपत्रकान्वये लिपिक-टंकलेखक, वाहतूक नियंत्रक व सहाय्यक/शिपाई प्रवर्गातील काही मंजुरी ई.टी.आय.एम.प्रणालीच्या वापरामुळे गोठविण्यात आली आहेत. परंतु कर्मचारीवर्गाच्या त्रैमासिक स्थितीचे अवलोकन केले असता विभागांकडून गोठविण्यात आलेली मंजुरी ही मूळ मंजुरीमधून कमी केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे रा.प.मध्यवर्ती कार्यालयात त्रैमासिक कर्मचारी रिक्त स्थितीबाबत विवरणपत्र तयार करण्यास अडचणी येत आहेत.

तरी या परिपत्रकान्वये सूचना देण्यात येत आहेत की, वरील संदर्भित परिपत्रकान्वये तसेच वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार वर नमूद केलेल्या प्रवर्गांची गोठविण्यात आलेली मंजुरी ही मूळ मंजुरीमधून कमी करुन संबंधित प्रवर्गांची सुधारीत मंजुरी तात्काळ पाठविण्यात यावी. अशाप्रकारे मंजुरीत सुधारणा केल्यानंतर प्रत्येक त्रैमासिक कर्मचारी रिक्त स्थितीबाबत माहिती कळवितांना सुधारीत मंजुरी कळवावी.

सोबत :- नमुना

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक(वाहतूक)/ महाव्यवस्थापक(भांवख)/महाव्यवस्थापक(यं.अ.)/महाव्यवस्थापक(निवप)/उपमहाव्यवस्थापक(मावतं)/ मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामागर अधिकारी/ मुख्य लेखा परीक्षण अधिकारी/ विधि सल्लागार/ जनसंपर्क अधिकारी/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ.
२) मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक/मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव.
३) कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ कर्मचारीवर्ग अधिकारी /राज्यसंवर्ग/ सा.प्रशासन/प्रशासन)/ कर्मचारीवर्ग अधिकारी ((मुख्यालय /मनुष्यबळ/घटकसंवर्ग/मागासवर्ग कक्ष) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.
४) सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ (राज्यसंवर्ग) / (मागासवर्गकक्ष)/ (घटकसंवर्ग)(प्रशासन)/ (सामान्य प्रशासन)(मनुष्यबळ/समन्वय) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

F:\MPP२०१७\Circular.docx

Scanned by CamScanner

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई विभाग मुंबई प्रदेश

विभागीय पातळीवरील कर्मचारीवृंद

अ) राज्य संवर्ग वर्ग ३ पदांची स्थिती (एकाकी पदे वगळून) २००४ रोजीची नियते = ४२३

| अ. क्र. | पद | सन २००४ नुसार मंजूरी | सद्याच्या नियतानुसार मंजूरी | नियुक्त | शेरा ( मध्यवर्ती कार्यालयाच्या सुचनानुसार गोठविलेल्या पदांबावत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | वाहतूक निरीक्षक | २१ | | | |
| २ | प्रभारक | ६ | | | |
| ३ | लेखाकार/कनिष्ठ संग्रह पडताळक | १२ | | | |
| ४ | भांडारपाल | ३ | | | |
| ५ | सहाय्यक सुरक्षा निरीक्षक | २ | | | |
| | एकुण | | | | |

ब) घटक संवर्ग - ३ व - ४ वर्ग पदांची स्थिती (एकाकी पदे वगळून)

| अ.क्र. | पद | सन २००४ नुसार मंजूरी | सद्याच्या नियतानुसार मंजूरी | नियुक्त | शेरा ( मध्यवर्ती कार्यालयाच्या सुचनानुसार गोठविलेल्या पदांबावत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ संगणित्र चालक | ४ | | | |
| २ | कनि.सहा/वरि.लिपीक | ३३ | | | |
| ३ | प्रमुख कारागिर | २१ | | | |
| ४ | कारागिर - क | १५८ | | | |
| ५ | सहा.वाहतूक निरीक्षक | १८ | | | |
| ६ | लिपीक टंकलेखक | ७+३=१० | | | |
| ७ | कनिष्ठ लिपीक | १५४ | | | |
| ८ | वाहतूक नियंत्रक | १३८ | | | |
| ९ | सहा.कारागिर | १४५ | | | |
| १० | सहाय्यक | २४३ | | | |
| ११ | मजदूर | ०४ | | | |
| १२ | सफाईगार/हमाल | २७ | | | |
| १३ | शिपाई/ऑर्डली | १६ | | | |
| १४ | सुरक्षा रक्षक | २१ | | | |
| १५ | स्वच्छक | ४० | | | |
| १६ | चालक | १०४० | | | |
| १७ | वाहक | १०१९ | | | |
| | एकुण | | | | |

Scanned by CamScanner

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ६६१८
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८.
दिनांक: ~~नोव्हेंबर, २०१८.~~ 07/12/18

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: अ) लैंगिक अत्याचार तक्रार निवारण समिती**
**ब) चालक, वाहक यांची आरोग्य तपासणी**
**क) चालक, वाहक यांचे करिता समुपदेशक नेमणेबाबत**

---

विषयांकीत कामकाज हे रा.प.मध्यवर्ती कार्यालयीन आदेश क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ४९२६ दि.२०.०८.२०१८ अन्वये दि.२०.०८.२०१८ पासून कामगार शाखा, रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई येथे वर्ग करण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त विषयाबाबत यापुढील पत्रव्यवहार मुख्य कल्याण अधिकारी, कामगार शाखा रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांचेशी करण्यात यावा.

(मुख्य कामगार अधिकारी)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) करिता

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना:
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ महाव्यवस्थापक (स्थाअ)/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार वर्ग-१ / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन) सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/ (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग)/ (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मादक)

फाईल
06/12/2018

(मुख्य कामगार अधिकारी)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) करिता

Scanned by CamScanner

**प्रत माहितीसाठी अग्रेषित:**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्य विधी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.



Scanned by CamScanner

# "शपथपत्र"

## [रु.१००/- मुद्रांक शुल्क (स्टॅम्प पेपर)]

मी खाली सही करणार श्री / श्रीमती ---------------------------------------- रा. ----------------------

शपथेवर लिहून देतो की, माझी सरळसेवा भरती सन २०१६-१७ अंतर्गत ------------------- या पदावर रा.प.--------------------------------विभागामध्ये निवड झालेली आहे.

मी आज दिनांक / / २०१८ रोजी रा.प. ----------------------------- विभागात रुजू होत असून, रा.प.च्या नियमानुसार, माझी रा.प.-----------------------------या विभागातून कोणत्याही दुस-या विभागात बदली होणार नाही हे मला मान्य आहे.

त्यानुसार, मी कोणत्याही कारणास्तव माझ्या कार्यरत विभागातून अन्य विभागात बदलीसाठी अर्ज सादर करणार नाही, तसेच कोणत्याही अशासकीय व्यक्तींकडून किंवा कोणत्याही श्रमिक संघटनेमार्फत अथवा इतर कोणाही मार्फत बदलीसाठी शिफारसपत्र वा दबाव आणणार नाही. भविष्यात, मी माझ्या बदलीसाठी दबाव आणल्यास रा.प.च्या नियमानुसार सदर विनंती बदली अर्ज हा माझा राजीनामा समजून प्रशासनाने तो मान्य करण्यास माझी हरकत राहणार नाही.

सही,

[श्री / श्रीमती ------------------------]

सदर शपथपत्र माझ्यासमोर लिहून सही केलेली आहे.

सही,

साक्षीदार श्री / श्रीमती-----------------------------

Scanned by CamScanner

परिपत्रक

क्र.राप/ कार्यवर्ग/आस्था/घरां/ 6322
म.रा.मा.प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक 26 डिसेंबर, २०१८.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ - मुंबई-पुणे, नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर
- विभाग नियंत्रक, रा.प. मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/ धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/ नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ

...

<u>विषय</u> :- सरळसेवा भरती सन २०१६-१७ अंतर्गत भरती झालेल्या कर्मचा-यांच्या विनंती बदलीबाबत.

<u>संदर्भ</u> :- सरळसेवा भरती जाहीरात क्र.२/२०१७.

...

याव्दारे अशा सुचना देण्यात येत आहेत की, सरळसेवा भरती सन २०१६-१७ अंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांकडून, ते संबंधित विभागात रुजू होणेपुर्वी त्यांचेकडून <u>"ते कोणत्याही कारणास्तव त्यांचे विभागातुन अन्य विभागात बदलीसाठी अर्ज सादर करणार नाहीत, तसेच कोणत्याही अशासकीय व्यक्तीकडून किंवा कोणत्याही श्रमिक संघटनेमार्फत अथवा इतर कोणाही मार्फत बदलीसाठी शिफारसपत्र वा दबाव आणणार नाहीत. तसेच भविष्यात बदलीसाठी दबाव आणल्यास रा.प.च्या नियमानुसार शिस्त व अपिल कार्यपध्दतीनुसार बडतर्फीसह अन्य कठोर कारवाईस पात्र राहीन"</u>, याबाबतचे शपथपत्र संबंधित उमेदवारांकडून घेणेबाबत विभागांना सुचना देण्यात आल्या होत्या.

२. तथापी सरळसेवा भरती सन २०१६-१७ अंतर्गत निवड झालेले बरेच कर्मचारी संबंधित विभागात रुजू झाल्यानंतर विनंती बदलीकरीता अर्ज करीत असल्याचे व शिफारस पत्र सादर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी सर्व विभाग / घटकांना पुन्हा एकवार अशा सुचना देण्यात येत आहेत की, सरळसेवा भरती सन २०१६-१७ अंतर्गत निवड झालेल्या कर्मचा-यांकडून उपरोक्तप्रमाणे शपथपत्र लिहून घेतल्यानंतरही विनंती बदलीकरीता संबंधित विभाग / घटकास अर्ज सादर करीत असतील अथवा शिफारस पत्र देत असतील किंवा अन्य मार्गाने दबाव आणण्याचा प्रयत्न करीत असतील, तर अशा कर्मचा-यांनी बदलीकरीता सादर केलेला अर्ज हा त्यांचा राजीनामा समजून त्यानुसार त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. सरळसेवा भरती सन २०१६-१७ अंतर्गत नेमणूक दिलेल्या कर्मचा-यांकडून रु १००/- मुद्रांक कागदावर [स्टॅम्प पेपर] दिलेल्या विहित नमुन्यानुसार या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांत पुनःश्च शपथपत्र लिहून घेण्यात यावे .

३. तरी, उपरोक्त सुचनांची विभाग / घटक पातळीवर अंमलबजावणी करण्यासाठी प्रस्तुत आदेश विभाग / घटक / आगार पातळीवर सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास येतील याप्रमाणे ठळकपणे प्रदर्शित करावेत. सदर सुचनांची कार्यवाही विहीत कालावधीत काटेकोरपणे पुर्ण करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास या आदेशाच्या दिनांकापासून जास्तीत जास्त एक महिन्यात सादर करावा.

<u>सोबत</u>:-शपथपत्राचा नमुना

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

..२..

Scanned by CamScanner

परिपत्रक :

क्र.राप/ कर्मवर्ग/आस्था/युआर/ ५२५९
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक ११ सप्टेंबर, २०१८.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ - मुंबई-पुणे, नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर
- विभाग नियंत्रक, रा.प. मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/ धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/ नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ

...

१८.प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद,
१९.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२०.सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२१.सचिव,राज्य माहिती आयोग,
२२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२३.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२४.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६.संचालक, समाजकल्याण, पुणे,



५ → ४

Scanned by CamScanner

२७.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२८.संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२९.संचालक, सेवायोजन, मुंबई,
३०.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३१.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३४.सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
३५.सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३६.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३७.सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३८.निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

*********** ५ -> ५

Scanned by CamScanner

शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार दिलेल्या तदर्थ नियुक्त्यांना मा. उच्च न्यायालयाच्या दि.१० नोव्हेंबर, २०१७ च्या अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने मुदतवाढ देण्याबाबत

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन शुद्धिपत्रक क्रमांक: बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३ /१६-ब

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दिनांक : ०२ डिसेंबर, २०१७.

वाचा:-

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धिपत्रक क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब,दि.२ डिसेंबर,२०१५

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३ / १६-ब,दि.१७ मे,२०१७

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३ / १६-ब,दि. ९ नोव्हेंबर,२०१७

शासन शुद्धिपत्रक :-

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असलेल्या जनहित याचिका क्रमांक १४९/२०१४ यामध्ये श्री.कैलास किसन गाढवे व इतर यांनी दाखल केलेल्या दिवाणी अर्ज क्र.१०३/२०१७ वर मा.उच्च न्यायालयाने दि.१०.११.२०१७ रोजी खालीलप्रमाणे अंतरिम आदेश दिले आहेत :-

In our order dated 8th November,2017,the words "three months" be corrected as "six months", and the order be corrected accordingly.

२. मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त दि.१०.११.२०१७ च्या आदेशास अनुसरून संदर्भ क्र.३ येथिल शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ खालिलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या दि.७.४.२०१५ रोजीच्या अंतरिम आदेशानुसार देण्यात आलेल्या व दि. ४.५.२०१७ च्या अंतरिम आदेशानुसार दि.३.११.२०१७ पर्यंत चालू ठेवण्यात आलेल्या तदर्थ स्वरूपातील नेमणुका, मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त दि.१०.११.२०१७ च्या अंतरिम आदेशानुसार दि.३.११.२०१७ पासून पुढील सहा महिने म्हणजेच दि.३ मे, २०१८ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन शुद्धिपत्रक राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था,स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे,शासकीय अनुदान प्राप्त संस्था,विद्यापीठे,सहकारी संस्था , शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनरस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/ आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत व सदर आदेशाची संबंधित प्रशासकिय विभागाने तातडीने अंमलबजावणी करावी.

५ → ६

Scanned by CamScanner

४. सदर शासन शुद्धिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१७१२०२१५२४१९१९०७ असा आहे. हे शासन शुद्धिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131f af7d6c0a149c3a4cf1436, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2017.12.02 15:28:09 +05'30'

(टि.वा.करपते)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१.राज्यपाल यांचे सचिव,
२.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४.मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
५.मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
६.सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
७.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)
१३.सर्व जिल्हाधिकारी,
१४.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१६.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१७.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१८.प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१९.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२०.सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२१.सचिव,राज्य माहिती आयोग,
२२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२३.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२४.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६.संचालक, समाजकल्याण, पुणे,
२७.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,

५ — ८



Scanned by CamScanner

२८.संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२९.संचालक, सेवायोजन, मुंबई,
३०.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३१.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३४.सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३५.सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३६.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३७.सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३८.निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

०५ → ०८

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ०६/२०१८

(५)

क्र.राप/ कर्मवर्ग/ राज्यसंवर्ग/वि.गो.अ./ ७३८
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई-४००००८.
दिनांक - ०२ फेब्रुवारी, २०१८.

- महाव्यवस्थापक (आवेदन ), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक, (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प.दापोडी,पुणे / औरंगाबाद / नागपूर.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण),रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, मुंबई / ठाणे/ रत्नागिरी/ रायगड / सिंधुदुर्ग / पालघर/ जळगांव/ धुळे / अहमदनगर / नाशिक/ पुणे/ सातारा/ सोलापूर/ कोल्हापूर / सांगली/ औरंगाबाद / बीड/ लातूर/ नांदेड / उस्मानाबाद / परभणी/ जालना/ भंडारा / चंद्रपूर/ वर्धा/ नागपूर/ अमरावती / अकोला/ बुलडाणा/ यवतमाळ/गडचिरोली.

**विषय :-** वर्ग-३ राज्यसंवर्गीय कर्मचा-यांच्या स्थायीकरणासाठीचे विशेष गोपनीय अहवाल मराठीत लिहिण्याबाबत.

---

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे १००टक्के कामकाज मराठी भाषेतुन करण्याच्या धोरणानुसार, वर्ग-३ राज्यसंवर्गीय प्रवर्गात सरळसेवा भरती व खाते बढतीद्वारे नेमणूक देण्यात आलेल्या कर्मचा-यांचे स्थायीकरणाचे विशेष गोपनीय अहवाल मराठीमध्ये लिहिण्यात यावेत. यासाठी सदर अहवालाचा मराठी नमुना सोबत जोडण्यात येत आहे.

२. **विशेष गोपनीय अहवाल लिहिण्यासंबंधात पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.**

१) पर्यवेक्षकीय कर्मचा-याची विशेष गोपनीय अहवालाची प्रतवारी "साधारण" किंवा "साधारणपेक्षा कमी" असल्याचे नमुद केल्यानंतरही संबंधित कर्मचा-याच्या स्थायीकरणाची शिफारस प्रतिवेदन अधिकारी करतात. सबब, पर्यवेक्षकीय कर्मचा-यांच्या विशेष गोपनीय अहवालाची प्रतवारी साधारण किंवा साधारणपेक्षा कमी दर्जाची असल्यास स्थायीकरणाची शिफारस केली जाणार नाही, याची काटेकोरपणे दक्षता घेण्यात यावी. सदरची बाब सर्व संबंधित अधिकारी यांचे निदर्शनास आणावी.

२) पर्यवेक्षकीय कर्मचा-याच्या नियुक्ती आदेशामध्ये संबंधित कर्मचा-याचा परिविक्षाकालावधी संपण्यापुर्वी १५ दिवस अगोदर विशेष गोपनीय अहवाल मध्यवर्ती कार्यालयास पाठविण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या असतात. मात्र,कर्मचा-याचा परिविक्षा कालावधी संपला तरी मध्यवर्ती कार्यालयाकडुन विशेष गोपनीय अहवालाची मागणी झाल्याशिवाय संबंधित कर्मचा-याचा स्थायीकरणाचा विशेष गोपनीय अहवाल पाठविता येणार नाही,असे विभाग/घटकांकडुन कर्मचा-यास सांगितले जाते, ही बाब कार्यालयीन शिस्तीचा भंग करणारी आहे. तरी, याद्वारे सुचित करण्यात येते की, पर्यवेक्षकीय कर्मचा-यांचे विशेष गोपनीय अहवाल त्यांच्या नेमणुकीच्या आदेशात नमुद करण्यात आलेल्या कालावधीत मध्यवर्ती कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी संबंधित विभाग/घटकांची राहील.

...२/-



Scanned by CamScanner

३) पर्यवेक्षकीय कर्मचा-याच्या परिविक्षा कालावधीची नोंदवही विभागीय कार्यालय स्तरावर कर्मचारीवर्ग खात्यात ठेवण्यात यावी. परिविक्षा कालावधीच्या नोंदी अद्ययावत ठेवण्यात [illegible] किंवा कसे, याची पडताळणी करण्यासाठी विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी / आस्थापना पर्यवेक्षक यांनी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात नोंदवहीची तपासणी करुन विशेष गोपनीय अहवाल विहीत कालावधीत पाठविले जातील, याची व्यक्तिशः दक्षता घ्यावी.

३. उपरोक्त सुचनांनुसार विहीत वेळेत कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात यावी, अन्यथा कसुरदार अधिका-यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.

सोबत :- वरीलप्रमाणे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :-**
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/वित्तिय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक(भां.व ख.)/ महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(यं.अ.)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन)/[illegible] सल्लागार/ महाव्यवस्थापक(स्था.अं.)/ उप महाव्यवस्थापक(मा.व तं.)/उप महाव्यवस्थापक (नियंत्रण समिती क्र. १, २ व ३)/मुख्य कामगार अधिकारी/सचिव, म.रा.मा.प.महामंडळ/मुख्य सांख्यिकी अधिकारी/सहा. जनसंपर्क अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परिक्षक/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव.



Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ७ /२०१८

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ 9009
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४०० ००८.
दिनांक : 9७ फेब्रुवारी, २०१८

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय : - परिपत्रक ९/८७ अंतर्गत नामंजूर झालेल्या वैद्यकीय देयकांच्या पूर्ततेबाबत...**

रा.प. महामंडळामध्ये वैद्यकीय प्रतिपूर्ती योजने अंतर्गत कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक ९/८७ नुसार रा.प. अधिकारी व कर्मचारी यांनी सादर केलेली वैद्यकीय देयके रा.प. नाि (पॅनल) वर नसलेल्या रुग्णालयामध्ये वैद्यकीय उपचार करुन घेतल्यास अशी देयके पुर्णतः अथवा अंशतः नामंजूर केली जातात अशी देयके पुर्नविचार समितीसमोर सा करण्यांत येवून देयकाच्या प्रतिपूर्ती विषयी समितीची शिफार घेण्यात येते व तसे निदेश संबंधित विभाग / घटक कार्यालयास देण्यात येतात.

कर्करोगावरील वैद्यकीय उपचाराची देयके टाटा हॉस्पिटलच्या 'बी' क्लासच्या दराने तसेच हृदयविकारावरील वैद्यकीय उपचाराची देयके बॉम्बे हॉस्पिटलच्या 'जनरल वार्ड' दराने प्रतिपूर्ती करण्याविषयी यापूर्वी पुर्नविचार समितीच्या शिफारशीनुसार कळविण्यात आलेले आहे. तथापि काही विभागामार्फत टाटा रुग्णालयाचे दरपत्रकाविषयी विचारणा करण्यात आली होती. त्यानुसार टाटा रुग्णालयाशी संपर्क साधला असता सदर दरपत्रक टाटा रुग्णालयाच्या www.tmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असल्याबाबत सांगण्यात आले. तरी कॅन्सरवरील उपचारांसाठी टाटा रुग्णालयाचे दरपत्रक www.tmc.gov.in या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेण्यात यावे.

**टाटा हॉस्पिटल, मुंबई**
**वेबसाईड : www.tmc.gov.in**

महाव्यवस्थापक (क. व औ. सं.) करिता

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ८/२०१८.

क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./ ११०४
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक : १७ फेब्रुवारी, २०१८.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उप महाव्यवस्थापक(समिती क्र.१ मुंबई व पुणे )/(समिती क्र.२नाशिक व औरंगाबाद)/ (समिती क्र.३नागपूर व अमरावती).
- कार्यकारी अभियंता, रा.प.मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ.

विषय :- एकात्मिक सुविधा व्यवस्थापन सेवा (FMS) पुरविण्याबाबत राज्यस्तरावर बाहय संस्थेची निवड झाल्याने सध्या कार्यरत असलेल्या सफाईगार व स्वच्छक या पदावरील कर्मचा-यांना द्यावयाच्या पर्यायी कामगिरीबाबत.

***

रा.प.महामंडळामध्ये एकात्मिक सुविधा व्यवस्थापन सेवा (FMS) पुरविण्याबाबत राज्यस्तरावर मे.ब्रिस्क इंडिया प्रा.लि.पुणे यांची निवड करण्यात आली आहे. दिनांक २०.११.२०१७ पासुन मुंबई, नाशिक व अमरावती या प्रदेशांतर्गत तसेच दिनांक १.१२.२०१७ पासुन पुणे, नागपूर व औरंगाबाद प्रदेशांतर्गत एकात्मिक सुविधा व्यवस्थापन सेवेचे कामकाज सुरु झाले आहे.

२. त्याअनुषंगाने रा.प.महामंडळात सद्यःस्थितीत कार्यरत असलेल्या स्वच्छक व सफाईगार या पदातील कर्मचा-यांना खालीलप्रमाणे पर्यायी कामगिरी देण्यात यावी:-

१) स्वच्छक पदाची मंजुरी सध्याच्या वेतनश्रेणीत कोणताही बदल न करता सहाय्यक पदांच्या मंजुरीमध्ये समर्पित करुन स्वच्छक पदाचे नवीन पदनाम सहाय्यक (अतांत्रिक) असे करण्यात येत आहे.

२) सध्या विभागातील भांडार शाखेच्या मंजुरीप्रती कार्यरत असलेल्या आय.टी.आय प्रमाणपत्रधारक सहाय्यकांना आगार कार्यशाळा/विभागीय कार्यशाळेत नेमणूका देऊन त्यांचे जागी पुरुष सहाय्यक (अतांत्रिक) कर्मचा-यांचा वापर करण्यात यावा.

३) सहाय्यक (अतांत्रिक) महिला कर्मचा-यांचा वापर विभागीय कार्यशाळेत स्पेअर पार्टची स्वच्छता व त्यासंबंधीच्या कामांची निकड विचारात घेऊन करण्यात यावा.

४) एकात्मिक सुविधा व्यवस्थापन सेवा (FMS) मध्ये आगार कार्यशाळा, विभागीय भांडार व विभागीय कार्यशाळा यांचा समावेश नाही, त्यामुळे या ठिकाणी स्वच्छतेसाठी तसेंच आर.टी.ओ पासिंग, आर.सी. अपघात, इंजिन बदली, एच.बी.आर इत्यादी कामासाठी विभागीय कार्यशाळेत येणा-या गाडयांचे काम करण्याअगोदर व नंतर बसगाडया स्वच्छ करण्यासाठी उपलब्ध सहाय्यक (अतांत्रिक) कर्मचा-यांचा वापर करण्यात यावा.

५) इयत्ता१० वी पास शैक्षणिक पात्रता धारण करणा-या स्वच्छक प्रवर्गातील कर्मचा-यांना त्यांची काम करण्याची तयारी व इच्छूकता असल्यास वाहक पदाचे काम देण्याकरीता त्यांनी प्रादेशिक परिवहन खात्याचा परवाना व बिल्ला मिळविल्यास तसेच वाहक पदाची इतर अर्हता ते पूर्ण करीत असल्यास त्या इच्छूक कर्मचा-यांना वाहक पदाचे आवश्यक ते प्रशिक्षण देऊन वाहक पदी नेमणूक देण्याबाबत कार्यवाही करता येईल.



Scanned by CamScanner

६) शैक्षणिक पात्रता कमी असलेल्या महिला स्वच्छक /सहाय्यक (अतांत्रिक) व सफाईगार पदातील कर्मचा-यांचा, मानव विकास योजनेअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतूकीसाठी चालविण्यात येणा-या बसगाडयांमध्ये जेथे वाहकांची आवश्यकता नसेल तेथे वाहकाऐवजी परिचारक (अटेन्डट) म्हणून आवश्यकतेप्रमाणे कामाचे नियोजन करुन विभागीय स्तरावर वापर करण्यात यावा.

७) सहाय्यक(अतांत्रिक)/सफाईगार पदातील कर्मचा-यांचा विभागातील अतिथ्यालयाकरीता परिचारक (अटेंन्डट)/ खानसामा म्हणून वापर करण्यात यावा.

८) सहाय्यक (अतांत्रिक)/सफाईगार या प्रवर्गातील कर्मचा-यांना आगार व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी चालक/वाहक विश्रांतीगृहाकरीता परिचारक (अटेंन्डट) म्हणून वापर करण्यात यावा.

९) ज्या विभागात सफाईगार पदातील कर्मचारी अतिरिक्त होत असतील त्या विभागात कमी संख्येने कार्यरत असलेल्या समकक्ष पदाचे काम करण्यासाठी त्यांचा वापर करण्यात यावा.

१०) सहाय्यक (अतांत्रिक) या प्रवर्गातील कर्मचा-यांचा वापर जिल्हास्तावर विभागीय कार्यालयात रेकॉर्ड रुम स्वच्छ व सुसज्ज ठेवण्यासाठी कामाचे नियोजन करुन वापर करण्यात यावा.

३. तसेच भविष्यात सदर धोरणात्मक निर्णयात बदल झाल्यास स्वच्छक [सहाय्यक (अतांत्रिक)] व सफाईगार या प्रवर्गातील कर्मचा-यांना पूर्ववत काम करावे लागेल.

४. स्वच्छक [सहाय्यक (अतांत्रिक)] व सफाईगार या प्रवर्गातील कर्मचा-यांकडून विभागीय कार्यशाळा, आगार कार्यशाळा व विभागीय भांडार येथील स्वच्छता व साफसफाईबाबतची सर्व कामे करुन घ्यावीत. तसेच प्रशासकीय कामाच्या निकडीनुसार स्वच्छक [सहाय्यक (अतांत्रिक)] व सफाईगार या प्रवर्गातील कर्मचा-यांच्या कामाचे वरीलप्रमाणे नियोजन विभागीय स्तरावर करावे. तसेच सदर प्रवर्गातील कर्मचारी हे कामाविना राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

५. कामाच्या स्वरुपात बदल झाल्यानंतरही संबंधित कर्मचा-यांचे वेतन कायम राहील.

६. स्वच्छक पदावर अनुकंपा तत्वावर नेमणूक करण्यासंबंधी दिनांक ७.१.२०१८ पर्यंत प्राप्त झालेल्या / मंजुर झालेल्या प्रकरणांवर कार्यवाही करण्यात यावी.

७. सदरचे परिपत्रक मा.संचालक मंडळाच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधिन राहून प्रसारीत करण्यात येत आहे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक(वाहतूक)/ महाव्यवस्थापक(भांवख)/महाव्यवस्थापक(यं.अ.)/महाव्यवस्थापक(निवप)/उपमहाव्यवस्थापक(मावतं)/मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामागर अधिकारी/ मुख्य लेखा परीक्षण अधिकारी/ विधि सल्लागार / जनसंपर्क अधिकारी/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ.

२) मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक/मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव.

३) कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय/राज्यसंवर्ग/ सा.प्रशासन/प्रशासन)/ कर्मचारीवर्ग अधिकारी (म.ब./समन्वय)/घटकसंवर्ग/मागासवर्ग कक्ष) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

४) सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ (राज्यसंवर्ग) / (मागासवर्गकक्ष)/ (घटकसंवर्ग)(प्रशासन/ सामान्य प्रशासन)(म.ब./समन्वय) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

Scanned by CamScanner

परिपत्रक क्र. ०५/२०१८
०९ ०८/२०१८

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ ११६८
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८.
दिनांक २९ फेब्रुवारी, २०१८.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/(समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र. ३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषयः खाजगी रुग्णालयांना रा.प.महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्याबाबत.**

**संदर्भः परिपत्रक क्र. ९/८७ जावक क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/२२५८ दिनांक २३.०४.१९८७.**

---------

उपरोक्त संदर्भित परिपत्रकानुसार भाग-२, अंतर्गत येणा-या गंभीर आजारांवरील उपचाराकरिता येणा-या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत रा.प.महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्यात आलेल्या रुग्णालयांची नावे नमुद करण्यात आलेली आहेत. सदर यादीमध्ये खाली नमुद केलेल्या खाजगी रुग्णालयांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या आजाराकरिता C.G.H.S. च्या दराने उपचार करण्यासाठी दिनांक २०.०१.२०१८ पासून सदर मान्यता पुढे सुरु ठेवण्यास सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिली आहे. सदर दर C.G.H.S. च्या (cghs.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

| क्र. | रुग्णालयाचे नांव व पत्ता | आजाराचे स्वरुप | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | रोपळेकर हेल्थ केअर सेंटर प्रा.लि.<br>(रुबी हार्ट केअर सेंटर - पूर्वीचे नाव)<br>१६०/१६१, टिळक नगर, वीर सावरकर चौक<br>औरंगाबाद-४३१ ००५. | ह्दय शस्त्रक्रियेची प्रकरणे, ह्दय उपमार्ग शस्त्रक्रिया व ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया | ०२४०-<br>२३३५००२/२३२१९४१/<br>२३३०४२९/२३४२१७४ |
| २ | केअर हॉस्पीटल,<br>३ फार्मलॅण्ड, पंचशील स्क्वेअर,<br>रामदासपेठ, वर्धा रोड, नागपूर-४२० ०१२.<br>Email :<br>nilamjaiswal@gmail.com | ह्दय शस्त्रक्रियेची प्रकरणे, ह्दय उपमार्ग शस्त्रक्रिया व ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया | ०७१२-३९८२२२२ |
| ३ | आनंद ऋषीजी हॉस्पीटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर,<br>१२४ आनंद ऋषीजी मार्ग,<br>बुरुडगाव रोड, अहमदनगर-४१४ ००१.<br>web site :<br>www.anandrishijihospital.com | ह्दय शस्त्रक्रियेची प्रकरणे, ह्दय उपमार्ग शस्त्रक्रिया ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया | ०२४१-<br>२३२०४७३/७४/७५/७६ |
| ४ | आश्विनी सहकारी रुग्णालय,<br>नॉर्थ सदर बाझार,<br>सोलापूर-४१३ ००३.<br>Email :<br>ashwinihosp@yahoo.com | ह्दय शस्त्रक्रियेची प्रकरणे, ह्दय उपमार्ग शस्त्रक्रिया, ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया | ०२१७- २३१९९००/०५ |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | एशियन नोबल हॉस्पीटल प्रा.लि.<br>(नोबल हॉस्पीटल अँण्ड रिसर्च सेंटर -पूर्वीचे नाव)<br>मनमाड रोड,प्रेमदान चौक,सावेडी,<br>अहमदनगार-४१४ ००३. | हृदय शस्त्रक्रियेची प्रकरणे, हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया व अँन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया | ०२४१-२४२१२९१/९२ |
| ६ | बिस्ने हार्ट क्लिनीक अँण्ड हॉस्पीटल,<br>१०७/१ फार्मलॅण्ड, लोकमत स्क्वेअर,<br>रामदासपेठ,नागपूर-४४० ०१०.<br>Email -vikasbisne@gmail.com | कॉरोनरी अँन्जीओप्लास्टी व बलून मिट्रल व्होल्व्होटोमी (Balloon Mitral Volvotomy & similar procedures) | ०७१२- २४३०३१३ |
| ७ | संजीवन रिसर्च सेंटर अँण्ड हार्ट हॉस्पीटल प्रा.लि.,<br>४३,प्रताप नगर,जळगाव-४२५ ००१ | अँन्जीओप्लास्टी हृदयावरील शस्त्रक्रिया | ०२५७-२२३३६४२/ २२३६९४७ |
| ८ | लाईफ लाईन हॉस्पीटल,<br>एस.टी.स्टॅण्ड समोर,<br>राष्ट्रीय महामार्ग क्र.४<br>पनवेल,जि.रायगड-४१०२०६ | हृदय शस्त्रक्रियेची प्रकरणे, हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया व अँन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया | ०२२-६१५६७०००/०१/ ०२/०३ |
| ९ | जहांगिर हॉस्पीटल,<br>३२, ससून रोड,<br>पुणे-४११ ००१. | हृदय शस्त्रक्रियेची प्रकरणे, हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया व अँन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया | ०२०-६६८१९९९९ / ६६८१९९२७<br>मो.९८८१४७५००३ |

उपरोक्त रुग्णालयात रा.प.कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियानी उपचार करुन घेतल्यास त्यांना C.G.H.S (Central Government Health Scheme) च्या प्रचलित दराप्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करावी.

सदर परिपत्रक सर्व अधिकारी / कर्मचारी व मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे. सदर परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे सहमतीने प्रसारीत करण्यात येत आहे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

Scanned by CamScanner

९०.

परिपत्रक क्र. ०६/२०१८
क्र. १०/२०१८

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ ११६५
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८.
दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय,पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषयः के.ई.एम.हॉस्पीटल,पुणे,व चिमोटे हॉस्पीटल ॲण्ड डायग्नोस्टीक सेंटर, अमरावती या रुग्णालयाची मान्यता रद्द करण्याबाबत.**

**संदर्भः**
१) क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/रु.मा./२०६६ दि.१२.०६.२००७
२) क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/रु.मा./ ४२६९ दि.०८.११.२००७
३) क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य /रु.मा./ २१९ दि.०९.०१.२०१८

---------

संदर्भाधिन पत्रानुसार **के.ई.एम.हॉस्पीटल,पुणे** या रुग्णालयांस ह्दयावरील शस्त्रक्रिया व उपचारासाठी रा.प.महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्यात आले होते. सदर रुग्णालयांस उपरोक्त पत्राव्दारे कळविण्यांत आलेल्या आजारांकरीता CGHS च्या दरानुसार उपचार करण्यांस तयार असल्याबाबत विचारणा करण्यात आली होती. तथापि सदर रुग्णालयाने CGHS च्या दरानुसार उपचार करण्यास असमर्थता दर्शविल्याने तसेच **चिमोटे हॉस्पीटल ॲण्ड डायग्नोस्टिक** सेंटर, अमरावती हे रुग्णालय बंद झाले असल्याने या रुग्णालयांची मान्यता रद्द करुन या परिपत्रकाच्या दिनांकापासून सदर रुग्णालये रा.प.महामंडळाच्या नामीकेवरुन (Panel) कमी करण्यात येत आहेत.

२. येथे असे स्पष्ट करण्यात येते की, ज्या कर्मचारी अथवा अधिका-यांनी या परिपत्रकाच्या दिनांकापर्यंत सदर रुग्णालयात ह्दय विकारावरील शस्त्रक्रिया व उपचारासाठी उपचार सुरु केले असतील किंवा अग्रिम घेतला असेल तर अशी वैद्यकिय देयके नियमानुसार मंजूर करण्यात यावीत.

३. सदर परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे सहमतीने प्रसारीत करण्यात येत आहे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ०९/२०१८
११

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ १६८३
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४०० ००८.
दिनांक :१६ मार्च, २०१८.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२- औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय: रा.प.कर्मचारी विशेषतः चालक पदातील कर्मचा-यांसाठी समुपदेशक नेमणेबाबत.

संदर्भ: या कार्यालयाचे परिपत्रक क्र.४८/२०१७ क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/६९७३ दिनांक २८.१२.२०१७.

-------

संदर्भित परिपत्रकान्वये समुपदेशकाच्या नेमणूकीबाबत सविस्तर सूचना प्रसारीत करण्यात आल्या आहेत. सदर सूचनांनुसार देण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये समुपदेशक पदाकरिता खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता नमुद केली आहे.

**शैक्षणिक अर्हता:-** मान्यताप्राप्त विद्यापीठाची/ संस्थेची समाजकार्य या विषयांकीत पदव्युत्तर पदवी (M.S.W.) किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची / संस्थेची मानसशास्त्र या प्रमुख विषयातील कला शाखेची पदव्युत्तर पदवी (M.A.Psychology) अधिक समुपदेशन मानसशास्त्र विषयातील पदवीका (Advance Diploma in Psychology)

२ उपरोक्त अर्हतेनुसार समुपदेशन मानसशास्त्र विषयातील पदवीका (Advance Diploma in Psychology) असलेले उमेदवार उपलब्ध होत नसल्याचे विभागांनी कळविले होते. या संदर्भात सक्षम प्राधिकारी यांनी समुपदेशक पदाच्या अर्हतेमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यास मान्यता दिली आहे.

**शैक्षणिक अर्हता:-** मान्यताप्राप्त विद्यापीठाची/ संस्थेची समाजकार्य या विषयांकीत पदव्युत्तर पदवी (M.S.W.) किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची / संस्थेची मानसशास्त्र या प्रमुख विषयातील कला शाखेची पदव्युत्तर पदवी (M.A.Psychology). M.S.W. अर्हताधारक उमेदवारांना प्राधान्य.

३ ज्या विभागामध्ये उपरोक्त परिपत्रकानुसार दिलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या अर्जानुसार आवश्यक प्रमाणात समुपदेशक उपलब्ध झाले असतील तर त्या विभागांनी, केलेल्या कार्यवाहीमध्ये बदल करु नये. अन्यथा जाहिरातीनुसार प्राप्त झालेले अर्ज विचारात घेऊन उपरोक्त सुधारीत शैक्षणिक अर्हता व संदर्भित परिपत्रकामधील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)
कृ.मा.प.

...२...

Scanned by CamScanner

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/ (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग)/ (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. १६ /२०१८
महत्त्वाचे / तातडीचे :

क्र.राप/ कर्मवर्ग/आस्था/युआर/ ९८८४
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : .०३.२०१८.
०३।०३।१८

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/ धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

...

विषय : शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत.

संदर्भ : कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २४/२०१७, संदर्भ क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/३४५६, दिनांक २३.०६.२०१७.

***

शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ नुसार दरवर्षी फेब्रुवारी व ऑगस्ट सत्रामध्ये तांत्रिक व्यवसायिक व आय.टी.आय.उत्तीर्ण, कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांची नेमणूक केली जाते व त्यांना शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार विद्यावेतन अदा करण्यात येते.

विद्यावेतनवाढ ही संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा अधिसूचित अर्धकुशल कर्मचा-यासाठी निश्चित केलेल्या किमान वेतनावर आधारित आहे. कामगार आयुक्त यांनी त्यांचे दि.२८.०१.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार किमान वेतन हे मुळ वेतन अधिक विशेष भत्ता एकत्रित करुन परिगणित करण्यात येते. मूळ वेतनावर दिला जाणारा विशेष भत्ता प्रत्येक सहा महिन्यानंतर बदलत असतो.

सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणार्थी संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांचे पत्र क्र.२१/एटीएस/२०१५/प्र.क्र.१४/१७५ दिनांक १०.०९.२०१५ अन्वये किमान वेतनाच्या (Minimum Wages) दरामध्ये वेळोवेळी होणारे बदल सुधारण्यासाठी www.paycheck.in/India या संकेतस्थळावरुन अधिक माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

या कार्यालयाचे कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३६/२०१७ पत्र क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/५४७४ दिनांक १०.१२.२०१७ नुसार दि.०१.०१.२०१७ ते ३०.०६.२०१७ या कालावधीकरिता जे सुधारीत दर आपणांस कळविण्यात आले आहेत, त्या दराच्या विशेष भत्त्यामध्ये दिनांक ०१.०७.२०१७ ते दि ३१.१२.२०१७ या कालावधीकरीता बदल करण्यात आलेला नसल्यामुळे पूर्वीच्या दरानुसार दिनांक ०१.०७.२०१७ ते दिनांक ३१.१२.२०१७ या कालावधीकरीता वेतन अदा करण्यात यावे.

--२--

F:\२०१८\UR\UR - Circular २०१८.docx

Scanned by CamScanner

तथापि, संकेतस्थळावरुन माहिती घेतली असता, दि.०१.०१.२०१८ ते ३०.०६.२०१८ या कालावधीकरीता खालीलप्रमाणे किमान वेतनाचे (Minimum Wages) दर दर्शविण्यात आले आहेत.

| अनु.क्र. | तपशिल | किमान वेतनाचे दर | |
|---|---|---|---|
| | | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ |
| १. | मुळवेतन | ४६००.०० | ४४००.०० |
| २. | विशेष भत्ता | ४२२६.०० | ४२२६.०० |
| ३. | एकुण | ८८२६.०० | ८६२६.०० |

उपरोक्त दर्शविलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, श्रम व रोजगार मंत्रालय अधिसूचना भाग - II, खंड - ३, उपखंड (i) दि.२२.०९.२०१४ नुसार सुधारित दर खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहेत.

| क्र. | वर्ष | **पूर्वीचा दर (परिपत्रक क्र.३६/२०१७ संदर्भ क्र. राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/५४७४ दि.१०.१०.२०१७ )** | | **सुधारित दर** | |
|---|---|---|---|---|---|
| | | (www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार)<br>किमान वेतन = मुळ वेतन + विशेष भत्ता<br>**परिमंडळ-१ =**<br>मुळ वेतन रु. ४६०० +<br>विशेष भत्ता रु. ३९२७.००<br>= रु.८५२७.०० व<br>**परिमंडळ-२ =**<br>मुळ वेतन रु. ४४०० +<br>विशेष भत्ता रु. ३९२७.००<br>=रु. ८३२७.००<br>(विशेष भत्ता दि.०१.०१.२०१७ ते ३०.०६.२०१७ कालावधीकरीता www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार)<br>यप्रमाणे निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार<br>**सुधारित दर (रुपयामध्ये)** | | (www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार)<br>किमान वेतन = मुळ वेतन + विशेष भत्ता<br>**परिमंडळ-१ =**<br>मुळ वेतन रु. ४६०० +<br>विशेष भत्ता रु. ४२२६..००<br>= रु.८८२६.०० व<br>**परिमंडळ-२ =**<br>मुळ वेतन रु. ४४०० +<br>विशेष भत्ता रु. ४२२६.००<br>=रु. ८६२६.००<br>(विशेष भत्ता दि.०१.०१.२०१८ ते ३०.०६.२०१८ कालावधीकरीता www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार)<br>यप्रमाणे निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार<br>**सुधारित दर (रुपयामध्ये)** | |
| | | **परिमंडळ - १** | **परिमंडळ - २** | **परिमंडळ - १** | **परिमंडळ - २** |
| १ | **पहिले वर्ष** | किमानवेतन रु. ८५२७.०० च्या ७०% = रु.५९६८.९० | किमानवेतन रु.८३२७.०० च्या ७०% = रु.५८२८.९० | किमानवेतन रु. ८८२६.०० च्या ७०% = रु.६१७८.२० | किमानवेतन रु.८६२६.०० च्या ७०% = रु.६०३८.२० |





Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | दुसरे वर्ष | किमानवेतन रु. ८५२७.०० च्या ८०% = रु.६८२१.६० | किमानवेतन रु.८३२७.०० च्या ८०% = रु.६६६१.६० | [illegible] रु. ८८२६.०० च्या ८०% = रु.७०६०.८० | किमानवेतन रु.८६२६.०० च्या ८०% = रु.६९००.८० |
| ३ | तिसरे वर्ष | किमानवेतन रु. ८५२७.०० च्या ९०% = रु.७६७४.३० | किमानवेतन रु.८३२७.०० च्या ९०% = रु.७४९४.३० | किमानवेतन रु. ८८२६.०० च्या ९०% = रु.७९४३.४० | किमानवेतन रु.८६२६.०० च्या ९०% = रु.७७६३.४० |
| ४ | चौथे वर्ष | | | | |

** परिमंडळ १ - महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगर पालिका व 'अ' वर्ग नगरपालिका क्षेत्रांचे मिळून होईल.
** परिमंडळ २ - परिमंडळ एक वगळून राज्याच्या उर्वरित क्षेत्राचे मिळून होईल.

सदर अधिसुचनेमध्ये असे नमुद केले आहे की, जर एखाद्या संबंधीत राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा एखाद्या व्यवसायासाठी किमान वेतनाचा दर ठरवून दिला नसेल तर अशावेळी या व्यवसायातील विद्यावेतन अदा करताना त्या संबंधीत राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा अर्धकुशल कर्मचा-यांसाठी अधिसूचीत केलेल्या अनुसूचीत रोजगारातील जास्तीत जास्त किमान वेतन विचारात घेण्यात यावे. तसेच, सदर अधिसुचनेमध्ये अधिनियम धारा -६ मधील खंड -क मध्ये नमुद केलेल्या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारांनी जर राष्ट्रीय परिषदेने मान्य केलेल्या कोणत्याही विद्यालय किंवा अन्य संस्थामध्ये घेतलेल्या प्रशिक्षणार्थींचा कालावधी विद्यावेतन अदा करताना विचारात घेण्यात यावा असे नमुद केले आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे, सुधारित दराने विद्यावेतन अदा करताना अदा केलेले विद्यावेतन व सुधारीत दराने देय होणारे विद्यावेतन यातील फरकाची रक्कम शिकाऊ उमेदवारांना अदा करावी. विद्यावेतन अदा करताना याची पूर्णपणे पडताळणी करुन व लेखा परिक्षण करुनच शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतन अदा करावे. अतिरिक्त विद्यावेतन अदा केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी संबंधित विभाग/घटकाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

तरी, वर दर्शविलेल्या तारखेपासून सुधारीत दराने विद्यावेतन अदा करण्यात यावे.

सदर परिपत्रक वित्त व लेखा खात्याच्या सहमतीने प्रसृत करण्यात येत आहे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ. सं.)

प्रत माहितीसाठी अग्रेषितः-

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्य विधी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ - मुंबई-पुणे, नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

F:\२०१८-UR\UR - Circular २०१८.docx

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ९५/२०१८

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/ २०५० (अ)
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४०००००८
दिनांक :०५ एप्रिल, २०१८

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प. प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/नांदेड/
  अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/
  उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय: वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरलेल्या कर्मचारी यांना स्वेच्छानिवृत्ती लागू करणेबाबत.**

संदर्भ: १. परिपत्रक क्र.३३/२०१७ क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/५३११ दि.२९.९.१७
२. महामंडळ ठराव क्र.२०१८:०१:११ दिनांक १२.०१.२०१८

...

शारिरीक विकलांगतेमुळे रा.प.महामंडळाचे कामकाज करण्यास असमर्थ असलेल्या कर्मचा-यांना/कामगारांना स्वेच्छानिवृत्ती अनुज्ञेय आहे. सदर स्वेच्छानिवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी रा.प.विभाग / घटक कार्यालय यांना संदर्भ क्र.१ नुसार सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या योजनेस रा.प.संचालक मंडळाने महामंडळ ठराव क्र.२०१८:०१:११ दिनांक १२.०१.२०१८ नुसार कार्योत्तर मंजूरी दिली आहे. त्यानुसार संदर्भित परिपत्रक क्र.१मधील सुचना कायम ठेऊन, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत:-

२. रा.प. कर्मचा-यांनी स्वेच्छानिवृत्ती बाबत किमान ३ महिन्यांची आगाऊ नोटीस देणे आवश्यक राहील.

३. यापुर्वी अपंग व्यक्ती (समान संधी, संपुर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम, १९९५ अन्वये व प्रचलित तरतुदींनुसार अपात्र ठरलेल्या व सद्य स्थितीत पर्यायी नोकरीवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना, सदर योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास, त्यांनी सध्या कार्यरत असलेल्या पदावरुन शारिरीक विकलांगतेमुळे स्वेच्छानिवृत्ती घ्यावयाची असल्यास, त्यांनी किमान ३ महिन्याची आगाऊ नोटीस देऊन शासकीय/स्थायी वैद्यकीय मंडळ किंवा यथास्थिती जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारिरीकदृष्टया विकलांगतेमुळे कामकाज करण्यास असमर्थ असल्याबाबतचा वैद्यकीय दाखला सादर केल्यास, सदर योजनेचा लाभ संबंधित कर्मचा-यास अनुज्ञेय राहील.

४. सदर सुचनांच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यपध्दतीचा तपशील सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद करण्यात आला आहे. त्याप्रमाणे संबंधितांनी कार्यवाही करावी.

५. सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी/विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी यांनी सदर कर्मचा-यास वैद्यकीय तपासणीसाठी पाठवावयाच्या दयावयाच्या पत्रामध्ये शासकीय स्थायी वैद्यकीय मंडळ किंवा यथास्थिती जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून अपात्रतेचा दाखला एक महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक असेल. अन्यथा विहित वयोमर्यादा उलटल्याने अपात्र ठरल्यास त्याची जबाबदारी संबंधित कर्मचा-याची राहील. याबाबत स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक असेल.

६. सदर परिपत्रकीय सुचना वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

७. सदर परिपत्रकास विभागाच्या /आगाराच्या सुचना फलकावर ठळकपणे प्रसिध्दी देण्यात यावी तसेच सदर परिपत्रक प्रत्येक कर्मचा-याच्या निदर्शनास आणून त्याची पोच कार्यालयीन दप्तरी ठेवण्याची दक्षता घेण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

..२..

D:\...\Circular-२०१७.docx

Scanned by CamScanner

परिशिष्ट 'अ'

| कार्यवाही क्रमांक | कार्यवाहीचा तपशिल | कार्यवाही करणा-या अधिका-याचे पद |
|---|---|---|
| | | विभाग नियंत्रक |
| १ | उपरोक्त परिपत्रकास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. | कामगार अधिकारी |
| २ | आलेले अर्ज स्विकारणे, सदर अर्जाची स्वतंत्र नोंदवहीत नोंद करणे. | कामगार अधिकारी |
| ३ | वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरलेल्या कर्मचारी यांना स्वेच्छानिवृत्ती योजना लागू करणेबाबत कर्मचा-याकडून भरुन घ्यावयाचा अर्ज... प्रसारीत परिपत्रक क्र... नुसार मला वैद्यकीयदृष्टया स्वेच्छानिवृत्ती स्विकारल्याने मिळणारी रक्कम व केलेल्या सेवेनुसार मिळणारी रक्कम मला मान्य आहे. त्याबाबत व इतर कोणत्याही कारणास्तव रा.प. महामंडळाच्या विरोधात न्यायालयात जाणार नाही, कोणतेही आवेदन (अपिल) करणार नाही व वैद्यकीय कारणास्तव अपात्र असल्याने पुन्हा पर्यायी नोकरी मागणार नाही किंवा अवलंबिताला नोकरी देणेबाबत मागणी करणार नाही असे कर्मचा-याकडून प्रतिज्ञापत्र भरुन घेणे. | |
| ४ | प्राप्त अर्जांची पात्र ठरत असल्याची खातरजमा (अपराध प्रकरणे प्रलंबित नसणे, वय व इतर तद्अनुषंगिक बाबी) करण्याची कार्यवाही ०७ दिवसांच्या आत उपलब्ध कागदपत्रे सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी /विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी यांचेकडे पाठविणे. | कामगार अधिकारी |
| ५ | सदर कर्मचा-यास पात्र ठरत असल्यास जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे वैद्यकीय तपासणीस पाठविणेबाबत दोन दिवसात पत्र देणे. | सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी / विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी |
| ६ | जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून वैद्यकीय अपात्रतेचा दाखला प्राप्त झालेनंतर वैद्यकीय मंडळाकडे दोन दिवसांच्या आत वैद्यकीय तपासणीसाठी पत्र देणे. | सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी / विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी |
| ६ | वैद्यकीय मंडळ यांचेकडून प्राप्त झालेल्या दाखल्याच्या अनुषंगाने किमान तीन महिने नोटीस कालावधी पूर्ण होत असलेबाबत खातरजमा करुन कार्यवाही करुन कर्मचा-याचे संख्याबळावरुन नाव कमी केल्याबाबतचा आदेश प्रसारित करणे व अंतिम देयकाचा प्रस्ताव लेखा शाखेकडे पाठविणे. कालावधी तीन दिवस. | सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी / विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी |
| ७ | अंतिम देयकासोबतच देय असणारी लाभाची रक्कम लेखा शाखा यांनी अदा करणे. | सहाय्यक लेखा अधिकारी / विभागीय लेखा अधिकारी |



Scanned by CamScanner

परिपत्रक क्र. १६/२०१८

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ 2909
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई- ४००००८
दिनांक 06 एप्रिल, २०१८

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/ (समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र. ३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/ सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/ चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय : सण अग्रिम मंजूरी- डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा समावेश करणेबाबत.
संदर्भ: उपसचिव,महाराष्ट्र शासन वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक:अग्रिम-२०१७/प्र.क्र.१२/२०१७ दि.१८ मे,२०१७

----

शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक:अग्रिम-२०१७/प्र.क्र.१२/२०१७ दि.१८ मे,२०१७ मधील तरतुदीनुसार सण अग्रिम - डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीसाठी अनुज्ञेय ठरविण्यात आला आहे. संदर्भाधिन शासन निर्णयाची छायांकित प्रत या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे. त्याप्रमाणे आपले स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

२. परिपत्रक क्रमांक:राप/आस्था/७०२-जीई/५४१८ दिनांक ३१.१०.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या सुचना कायम ठेवण्यात येत आहेत.

सोबत - १.सहपत्र
२. परिपत्रक

(माधव काळे) ६.४.१८
महाव्यवस्थापक (क.व औ.स.)

PTO....2
↳शासन निर्णय

Scanned by CamScanner

सण अग्रिम मंजूरी -
डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा समावेश करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः अग्रिम-२०१७/प्र.क्र.१२/२०१७/ विनियम
मादाम कामा रोड, राजगुरु हुतात्मा चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: १८ मे, २०१७

वाचा :

१) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्र.एफएनडी-१०६२-बी, दि.०६.१२.१९६२.
२) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग संकीर्ण-१०.०१/१४७०/प्र.क्र.१३/२००२/२९, दि.२९.०१.२००२.
३) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.अग्रिम-२०१५/प्र.क्र.५७/१५/विनियम, दि.२६.१०.२०१५

प्रस्तावना :

संदर्भाधीन अ.क्र.१ येथील दिनांक ०६.१२.१९६२ च्या परिपत्रकान्वये सामान्य प्रशासन विभागाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना ०९ महत्वाच्या सणांना अग्रिम मंजूर करण्याचे आदेश दिले आहेत. संदर्भाधीन अ. क्र.२ येथील दिनांक २९.०१.२००२ च्या शासन परिपत्रकान्वये महत्वाच्या सणांच्या यादीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा समावेश करण्यात आलेला आहे. संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक २६.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये वित्त विभागाने अराजपत्रित राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना संदर्भाधीन क्र.१ च्या शासन परिपत्रकान्वये घोषित करण्यात आलेल्या ९ महत्वाच्या सणांकरीता मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम क्र.१४२(जे) अनुसार देण्यात येणाऱ्या सण अग्रिमाची रक्कम रु.१०,०००/- केली आहे. सण अग्रिम डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीसाठी अनुज्ञेय करण्याकरीता शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

शासन निर्णय

शासन आता असे आदेश देत आहे की, वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक २६.१०.२०१५ अन्वये अनुज्ञेय करण्यात आलेले रु.१०,०००/- सण अग्रिम डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीसाठी अनुज्ञेय राहील.

२. सण अग्रिम मंजूरी आणि वसूलीच्या अटी व शर्ती पूर्वी विहित केल्याप्रमाणेच राहतील.

३. मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम क्रमांक १४२(जे) मध्ये योग्य ती सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०१७०५१८१५०३५०६३०५ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anudeep Shrinivas Dighe

Digitally signed by Anudeep Shrinivas Dighe
Date: 2017.05.18 15:08:12 +05'30'

(अ. श्री. दिघे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. * प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-(१), महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
२. * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता-(१), महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. १८/२०१८.

क्र.रापु/कर्मवर्ग/म.ब./ 2223
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक : ~~मार्च, २०१८.~~ ११/४/१८

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उप महाव्यवस्थापक(समिती क्र.१ मुंबई व पुणे )/(समिती क्र.२नाशिक व औरंगाबाद)/ (समिती क्र.३नागपूर व अमरावती).
- कार्यकारी अभियंता, रा.प.मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ.

विषय :- खात्यांतर्गत बढतीकरीता घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या कर्मचा-यांस अपिलाची संधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

***

राज्य परिवहन महामंडळामध्ये वर्ग-३ (घटकसंवर्ग) व वर्ग-३ (राज्यसंवर्ग) या प्रवर्गातील कर्मचा-यांना खात्यांतर्गत पदोन्नती देताना सामान्य स्थायी आदेश क्र.५०३ मध्ये विहित करण्यात आलेल्या तरतूदीनुसार लेखी परीक्षा / व्यवसाय चाचणी घेऊन उत्तीर्ण कर्मचा-यांना बढती देण्याबाबत कार्यवाही करण्यात येते. परंतु बढतीसाठी आयोजित करण्यात आलेल्या लेखी परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या कर्मचा-यांना त्याविषयी आवेदन करण्याची तरतूद सदर सामान्य स्थायी आदेशात नाही. सदरबाब विचाराधीन होती. त्याअनुषंगाने संचालक मंडळाने ठराव क्र.२०१७:११:२० दिनांक ०८.११.२०१७ पारीत केला आहे. सदर ठरावानुसार खालील सूचना देण्यात येत आहेत.

१. खात्यांतर्गत बढतीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या कर्मचा-याने निकाल जाहीर झालेल्या तारखेपासुन १ महिन्याच्या आत संबंधित विभाग / घटकाकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर आवेदनासोबत उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे, असे प्राप्त झालेले आवेदन घटक प्रमुख / विभाग नियंत्रक यांनी सदर कर्मचा-याच्या मूळ उत्तरपत्रिकेसह रा.प.मध्यवर्ती कार्यालयास त्वरीत पाठवावे.

२. अशाप्रकारच्या प्राप्त आवेदनानुसार मूळ उत्तरपत्रिकेतील गुणांची फेर तपासणी करण्यात येईल. अशाप्रकारे आवेदन केलेल्या कर्मचा-याच्या उत्तरपत्रिका तपासणीमध्ये, परीक्षेत आवश्यक असलेले प्रश्न कर्मचा-याने सोडविले असतील परंतु एखाद्या उत्तरास तपासणीसांकडून गुण देण्यात आले नसतील, असे आढळले तर सदर उत्तराचे मुल्यांकन करुन गुण देण्यात येतील.

३. रा.प.कर्मचा-याच्या उत्तरपत्रिकेतील सोडविण्यात आलेल्या प्रश्नांच्या उत्तरांना तपासणी अधिकारी यांनी पूर्वी दिलेले गुण हे फेर तपासणी अधिकारी यांना कमी किंवा जास्त करता येणार नाहीत.

४. आवेदनकार यांच्याकडून सादर करण्यात आलेल्या आवेदनाच्या अनुषंगाने सदर कर्मचारी ज्या खात्याशी संबधित असेल त्या खात्यामधील वर्ग-१ दर्जाचे १ वरिष्ठ अधिकारी व कर्मचारीवर्ग खात्यातील वर्ग-१ दर्जाचे १ वरिष्ठ अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येऊन उत्तरपत्रिकेतील गुणांची फेर मोजणी करण्यात येईल. अशा अधिका-यांच्या नियुक्ती करण्याबाबतचे अधिकार मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यात आले आहेत.

...२..

| १९ | ९ | अ.जा.-२ व अ.ज.-४, इ.मा.व-१ ,वि.जा.-अ)-१, भ.ज.(ब)-१{ भ.ज.(क), भ.ज.(ड) }तद्नंतर ,वि.मा.प्र.या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| २० | १० | अ.जा.-२ व अ.ज.-५, इ.मा.व-१ ,वि.जा.-अ)-१, भ.ज.(ब) -१, { भ.ज.(क), भ.ज.(ड) }तद्नंतर,वि.मा.प्र.या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| २१ | १० | अ.जा.-२ व अ.ज.-५, इ.मा.व-१ ,वि.जा.-अ)-१, भ.ज.(ब) -१, { भ.ज.(क), भ.ज.(ड) } तदनंतर,वि.मा.प्र.या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| २२ | ११ | अ.जा.-३ व अ.ज.-५,इ.मा.व-१ ,वि.जा.-अ)-१, भ.ज.(ब) -१, { भ.ज.(क), भ.ज.(ड) } तदनंतर,वि.मा.प्र.या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| २३ | ११ | अ.जा.-३ व अ.ज.-५,इ.मा.व-१ ,वि.जा.-अ)-१, भ.ज.(ब) -१, { भ.ज.(क), भ.ज.(ड) } तदनंतर ,वि.मा.प्र.या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| २४ | १२ | अ.जा.-३ व अ.ज.-६, इ.मा.व-१,वि.जा.-अ)-१, भ.ज.(ब) -१, { भ.ज.(क), भ.ज.(ड) } तदनंतर ,वि.मा.प्र.या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| २५ | १२ | अ.जा.-३ व अ.ज.-६, इ.मा.व-१ ,वि.जा.-अ)-१, भ.ज.(ब) -१, { भ.ज.(क), भ.ज.(ड) } तदनंतर ,वि.मा.प्र.या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| २६ | १३ | अ.जा.-३ व अ.ज.-६,इ.मा.व-१ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१ { भ.ज.(ड) } तदनंतर ,वि.मा.प्र.या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| २७ | १३ | अ.जा.-३ व अ.ज.-६, इ.मा.व-१ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१ { भ.ज.(ड) } तदनंतर ,वि.मा.प्र आळीपाळीने , या क्रमाने आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २८ | १४ | अ.जा.-३ व अ.ज.-६, इ.मा.व-२ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१ { भ.ज.(ड) } तदनंतर ,वि.मा.प्र.या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| २९ | १४ | अ.जा.-३ व अ.ज.-६, इ.मा.व-२, वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१ { , भ.ज.(ड) } तदनंतर ,वि.मा.प्र.या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ३० | १५ | अ.जा.-३ व अ.ज.-७, इ.मा.व-२, वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१ { भ.ज.(ड) } , तदनंतर ,वि.मा.प्र.या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ३१ | १५ | अ.जा.-३ व अ.ज.-७,इ.मा.व-२ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१, { भ.ज.(ड) } ,तदनंतर ,वि.मा.प्र.आळीपाळीने ,या क्रमाने आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ३२ | १६ | अ.जा.-४ व अ.ज.-७, इ.मा.व-२ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१ { भ.ज.(ड) } ,तदनंतर ,वि.मा.प्र.या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ३३ | १६ | अ.जा.-४ व अ.ज.-७, इ.मा.व-२ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१ { भ.ज.(ड) } ,तदनंतर ,वि.मा.प्र.या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ३४ | १७ | अ.जा.-४ व अ.ज.-८ ,इ.मा.व-२ वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१ { भ.ज.(ड) } ,तदनंतर ,वि.मा.प्र.आळीपाळीने , या क्रमाने आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ३५ | १७ | अ.जा.-४ व अ.ज.-८, इ.मा.व-२ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१ { भ.ज.(ड) } ,तदनंतर ,वि.मा.प्र.या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ३६ | १८ | अ.जा.-४ व अ.ज.-८, इ.मा.व-२ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१, { भ.ज.(ड) } , वि.मा.प्र.-१ या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ३७ | १८ | अ.जा.-४ व अ.ज.-८, इ.मा.व-२ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१, { भ.ज.(ड) } , वि.मा.प्र.-१ या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ३८ | १९ | अ.जा.-४ व अ.ज.-९, इ.मा.व-२ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१, { भ.ज.(ड) } , वि.मा.प्र.-१ या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ३९ | १९ | अ.जा.-४ व अ.ज.-९, इ.मा.व-२ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१, { भ.ज.(ड) } , वि.मा.प्र.-१ या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ४० | २० | अ.जा.-५ व अ.ज.-९, इ.मा.व-२ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१, { भ.ज.(ड) } , वि.मा.प्र.-१ या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ४१ | २० | अ.जा.-५ व अ.ज.-९, इ.मा.व-२ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१, { भ.ज.(ड) } , वि.मा.प्र.-१ या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ४२ | २१ | अ.जा.-५ व अ.ज.-१०, इ.मा.व-२ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१, { भ.ज.(ड) } , वि.मा.प्र.-१ या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ४३ | २१ | अ.जा.-५ व अ.ज.-१०, इ.मा.व-२ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१, { भ.ज.(ड) } , वि.मा.प्र.-१ या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ४४ | २२ | अ.जा.-५ व अ.ज.-१०, इ.मा.व-२ , वि.जा.-(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१, भ.ज.(ड)-१ वि.मा.प्र.-१. या क्रमाने आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |

..१५..

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. २१ /२०१८

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/लैं.छ/ ३०८५
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई-४०००0८.
दिनांक: 23 मे,.२०१८.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय,पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
सनियंत्रण समिती (क्र.१, २ व ३)
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय: कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी प्रत्येक कार्यालयात " अंतर्गत तक्रार समिती " गठीत करण्याबाबत.

संदर्भ: १) कर्मचारीवर्ग परिपत्रक क्र.१२/२०१६ दि.०५/०४/२०१६.

------

कामाच्या ठिकाणी महिलांवर होणा-या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वाची अंमलबजावणी करण्यासाठी उपरोक्त संदर्भित परिपत्रकाद्वारे विभाग व घटकनिहाय अंर्तगत तक्रार निवारण समिती गठित करण्याबाबत सविस्तर सूचना प्रसारीत करण्यांत आल्या आहेत.

सदर परिपत्रकान्वये प्रादेशिक कार्यालयातील वर्ग-३ किंवा वर्ग-४ सेवेतील कर्मचा-यांची चौकशी प्रदेश मुख्यालय विभाग समिती करेल व अहवाल प्रादेशिक व्यवस्थापक यांना सादर करतील. तसेच विभागीय / प्रादेशिक कार्यालयातील किंवा मध्यवर्ती कार्यशाळेतील वर्ग-१ आणि वर्ग-२ सेवेतील अधिका-यांच्या विरुध्द उदभवलेल्या तक्रारी मध्यवर्ती कार्यालयातील समितीकडे पाठविण्यांत येतील, अशा सूचना देण्यांत आल्या होत्या.

तथापी प्रादेशिक स्तर कमी झाल्याने उपरोक्त सूचनांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यांत येत आहे:

" सनियंत्रण समिती क्र.१,२ व ३ मधील कार्यालयातील वर्ग-३ किंवा वर्ग-४ सेवेतील कर्मचा-यांच्या तक्रारीची चौकशी मध्यवर्ती कार्यालयातील महिला लैंगिक अत्याचार तक्रार निवारण समिती करेल व अहवाल संबंधित उप महाव्यवस्थापक (सनियंत्रण समिती) यांना सादर करतील. तसेच विभागीय / सनियंत्रण समिती कार्यालयातील किंवा मध्यवर्ती कार्यशाळेतील वर्ग-१ आणि वर्ग-२ सेवेतील अधिका-यांच्या विरुध्द उदभवलेल्या तक्रारी मध्यवर्ती कार्यालयातील समितीकडे पाठविण्यांत येतील. "

संदर्भित परिपत्रकामध्ये इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

**प्रत माहितीसाठी सादर रवाना :**
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक /मुख्य कामगार अधिकारी/उप महाव्यवस्थापक (विधी) / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / सहा.जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन )/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/(मावक)

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. २२ /२०१८

क्र.राप/कर्मवर्ग/मावक/ ३२५३
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई - ४०० ००८.
दिनांक : ७ जून, २०१८.

प्रति,

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे
- उपमहाव्यवस्थापक,
  नियंत्रण समिती क्र.१ (मुंबई/पुणे)
  नियंत्रण समिती क्र.२ (नाशिक/औरंगाबाद)
  नियंत्रण समिती क.३ (अमरावती/नागपूर)
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
- विभाग नियंत्रक,
  म.रा.मा.प.महामंडळ, मुंबई/ ठाणे/ रत्नागिरी/ रायगड/ सिंधुदूर्ग/ पालघर/ पुणे/ सातारा/ सांगली/ सोलापूर/ कोल्हापूर/ नाशिक/ धुळे/ जळगांव/ अहमदनगर /औरंगाबाद/ बीड/ जालना/ नांदेड/ उस्मानाबाद/ लातूर/ परभणी/ नागपूर/ चंद्रपूर/ भंडारा/ वर्धा/ गडचिरोली/ अमरावती/ बुलडाणा/ अकोला/ यवतमाळ.

**विषयः** शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवण्याबाबत.

**संदर्भः** कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २५/२०००,
जा.क्र.राप/आस्था/माजा-२/४६६२ दि. ७ सप्टेंबर,२०००

****

उपरोक्त विषयाबाबतच्या शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्र. ८२/२००१ / मसेआ-२०००/ प्र.क्र. ४१५ /का-२, दिनांक २०.५.२००१ ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत पाठविण्यात येत आहे. उक्त शासन निर्णयातील मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदावर नियुक्ती झाल्यास त्याबाबतची प्रमाणपत्रे व त्यांची तपासणी याबाबत सूचना दिल्या आहेत. सदर सूचना तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट,२०१४ अन्वये प्रसारित करण्यात आलेल्या "शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण कार्यान्वित करण्याबाबतच्या कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शनार्थ स्पष्टीकरणाच्या सूचना विचारात घेऊन सरळसेवा भरतीच्या वेळी लिपिक-टंकलेखक प्रवर्गासाठी ज्या महिला उमेदवारांचा (मागासवर्गीय तसेच खुल्या प्रवर्गातील) खुल्या प्रवर्गाच्या निवड यादीमध्ये गुणवत्तेनुसार समावेश आहे त्या महिला उमेदवारांकडून उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर) घेण्यात येवू नये," या सूचनांसह विचारात घेऊन कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२. शासनाच्या उपरोक्त आदेशांनुसार जाहिरात क्रमांक ०२/२०१७ अनुषंगाने कार्यवाही करताना लिपिक-टंकलेखक प्रवर्गाच्या जाहिर झालेल्या निवडयादीतील आपल्या विभागातील/घटकातील लिपिक-टंकलेखक पदासाठी ज्या महिला उमेदवारांचा (मागासवर्गीय तसेच खुल्या प्रवर्गातील) खुल्या प्रवर्गाच्या निवड यादीमध्ये गुणवत्तेनुसार निवड झालेल्या महिला उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी पुन्हा करण्यात यावी, या छाननीच्या वेळी उक्त जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे असल्यास, त्यांच्याकडून उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राची (नॉन क्रिमीलेअर) मागणी करण्यात येवू नये. शासनाच्या आदेशांचे तंतोतंत अनुपालन करुन पुढील कार्यवाही करण्याची काटेकोरपणे दक्षता घेण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची पोच द्यावी.

**सोबतः** वरीलप्रमाणे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

Scanned by CamScanner

**प्रतः-** माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य विधि अधिकारी/ सचिव, म. रा. मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सहायक / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव यांचे माहितीसाठी.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ सहायक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/ (घटकसंवर्ग)/ (मनुष्यबळ/समन्वय)/(सामान्य प्रशासन)/ (प्रशासन)/(मुख्यालय) यांचे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

सोबत :वरीलप्रमाणे

Scanned by CamScanner

शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानीत संस्थांमधील [illegible] आरक्षण [illegible]

[illegible]...

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग

शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक- २५.५.२००१

निर्णय :- शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानीत संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा दि.१ एप्रिल,१९९४ पासून राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सदर ३०% आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयाद्वारे वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत असून महिलांच्या ३०% आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे एकत्रित आदेश देण्यात येत आहेत. हा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी महिलांच्या ३०% आरक्षणासंदर्भात करण्यात आलेली कार्यवाही ही परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार करण्यात आली असे असे समजण्यात यावे.

## (एक) आरक्षणाची व्याप्ती, अटी व शर्ती

(१) शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानीत संस्था यांच्या सेवेत नियुक्तीसाठी महिलांकरिता ३०% पदे आरक्षित ठेवण्यात येत आहेत.

(२) महिलांच्या सदर आरक्षणाची अंमलबजावणी करताना अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांच्यासाठी जी पदे उपलब्ध होतील त्या पदांपैकी त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठी ३०% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

(३) महिलांचे आरक्षण हे समांतर आरक्षण राहिल व ते कार्यान्वित करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्रक्र.३१/९८/१६-अ दि.१६.३.९९ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी.( प्रत सोबत जोडली आहे) सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये सामान्य प्रशासन विभागाकडून काही बदल केल्यास सदर बदल आपोआप लागू होतील.

(४) महिलांसाठी विहीत करण्यात आलेले सदर ३०% आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय राहिल.

(५) महिला आरक्षण हे समांतर आरक्षण/विशेष आरक्षण असल्यामुळे ते आडवे आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्यामुळे पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत महिला आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या, सामाजिक आरक्षण/उभे आरक्षण यांच्या (जसे अ.जा., अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), (क) (ड), वि.मा.प्र., इमाव, आणि खुला प्रवर्ग ) प्रत्येक वर्गामध्ये निर्देशित करावी.

(६) महिलांसाठीचे सदर आरक्षण हे मागासवर्गीयांचे आरक्षण ज्या ज्या ठिकाणी लागू आहे त्या सर्व ठिकाणी लागू राहील.

(७) भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारामार्फत भरण्यात यावे.

(८) महिलांच्या आरक्षणाचा अनुशेष पुढे ओढण्यात येऊ नये.

(९) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३० % आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

(१०) खुल्या प्रवर्गातील ज्या व्यक्तीचे /कुटुंबाचे सर्व मार्गांनी येणारे एकूण वार्षिक उत्पन्न लगतच्या मागील तीन वर्षांमध्ये प्रत्येक वर्षी रु.दोन लाख किंवा त्यापेक्षा अधिक असेल ती व्यक्ती/कुटुंब उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट म्हणून समजण्यात येईल. या संदर्भातील कुटुंबाच्या व्याख्येमध्ये [illegible] पत्नी व मुले यांचा समावेश राहील. आणि अविवाहीत मुलीच्या संदर्भात आई, वडील व अविवाहीत [illegible] राहील.

(११) इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या वर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गट (क्रिमीलेअर) बाबत सामाजिक न्याय विभागाने वेळोवेळी निश्चित केलेले निकष व अटी लागू राहतील.

(१२) सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागामार्फत इतर मागासवर्गांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) बाबतची उत्पन्न मर्यादा वाढविल्यास सदर वाढीव उत्पन्न मर्यादा खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आपोआप लागू राहील.

Scanned by CamScanner

(१३) मागासवर्गीयांचे आरक्षित प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांना देय भरतीसाठी [illegible] रती लागू राहील. [illegible] राहील.
शेष सेवाभरती नियम, भरती व रती त्या त्या प्रवर्गातील महिला [illegible] करण्यात यावे.

(१४) महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण महिला व बाल विकास [illegible] करण्याची जबाबदारी असावी.

(१५) महिलांच्या आरक्षित पदाच्या लाभाकरिता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा [illegible] रहिवासी असावा.

## दोन) प्रमाणपत्रे

### (अ) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र व त्याची तपासणी

(१) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी तहसिलदार व त्यावरील अधिकारी यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. [illegible] अर्जाचा नमुना व प्रमाणपत्राचा नमुना सोबतच्या परिशिष्ट २ व ३ म्हणून सोबत जोडला आहे.

(२) वरील प्रमाणपत्राच्या आधारे ज्या महिलांना [illegible] देण्यात येईल त्यांची प्रमाणपत्रे तपासण्यास आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा इतर सक्षम प्राधिकरणाकडून महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरिता ज्या महिलांची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे व त्यांनी आरक्षित पदाकरिता केलेल्या अर्ज संबंधित विभागांनी [illegible] कार्यालयांनी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांच्याकडे तपासणीसाठी पाठवावा.

(४) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी सदर प्रमाणपत्र या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार आहे किंवा नाही हे तपासावे. तसेच, सदर प्रमाणपत्राच्या पृष्ठयर्थ संबंधित उमेदवाराने या शासन निर्णयातील परिशिष्ट-२ मधील अर्जाने [illegible] जी माहिती सादर केली असेल ती माहिती मूळ कागदपत्रावरुन तसेच आवश्यकता वाटल्यास चौकशी करून तपासून घ्यावी. व सर्व माहिती योग्य असल्याचे आढळून आल्यास प्रमाणपत्र [illegible] संबंधित कार्यालयाला परत पाठवावे.

(५) जर एखाद्या प्रमाणपत्राबाबत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना शंका असल्यास त्यांनी शंकाबाबतचा सविस्तर तपशील आपल्या अहवालात नमूद करावा.

(६) ज्या उमेदवारांची प्रमाणपत्रे आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी तपासून प्रमाणित केली असतील त्या उमेदवारांची महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूक करण्यास हरकत नाही.

(७) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी प्रमाणपत्र तपासणीचा अहवाल एक महिन्यात संबंधित कार्यालयाला पाठवावा.

(८) आयुक्तांचा अहवाल एक महिन्यात प्राप्त झाला नाही तर संबंधित कार्यालयांनी प्रमाणपत्र प्रस्तावाच्या अधिनतेने संबंधित उमेदवारास तात्पुरती नेमणूक द्यावी.

(९) ज्या उमेदवारांच्या प्रमाणपत्राबाबत शंका उपस्थित झाली असेल अशा उमेदवारांच्याबाबतीत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी [illegible] आपल्या शंका संबंधित जिल्हा दंडाधिकारी यांना अ.शा. गोपनीय पत्राद्वारे कळविण्यात व त्यांचा अहवाल वाजवी कालमर्यादेत मागवावा.

(१०) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी उपस्थित केलेल्या शंका संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांना मान्य असल्यास त्यांनी संबंधित प्रमाणपत्र रद्द करावे.

### (ब) मागासवर्गीय उमेदवारांची प्रमाणपत्रे व त्यांची तपासणी

(१) अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती (अ) [illegible] जमाती(ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग यामधील महिलांनी त्यांच्या प्रवर्गातील महिला आरक्षणाच्या लाभाकरिता त्या त्या प्रवर्गात मोडत असल्याचे प्रमाणपत्र आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार सादर करणे आवश्यक राहील व सदर प्रमाणपत्रे तपासण्याबाबत आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय, [illegible] विभाग यांनी जी कार्यपध्दती विहीत केली आहे तीच कार्यपध्दती अंमलात राहील.

### (क) मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील महिलांक [illegible] आल्यास त्याबाबतची प्रमाणपत्रे व त्याची तपासणी

(१) मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवार खुल्या प्रवर्गातील जागांकरीता विकल्प देतील किंवा विकल्प न देताही मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवारांची निवड खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदावर झाल्यास, अशा महिला उमेदवारांना प्रमाणपत्र सादर करण्याबाबत खालील दोन विकल्प राहतील.

(अ) अशा महिला उमेदवारांनी सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी विहीत केल्याप्रमाणे त्यांच्या

संबंधीत जातीची प्रमाणपत्रे सादर करावीत व ती त्या [illegible] कार्यपद्धतीनुसार तपासून घेण्यात यावीत. अशा महिला उमेदवारांकडून [illegible] विहित केलेली क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

(आ) मात्र ज्यांच्या संबंधित जातीचे प्रमाणपत्र सादर [illegible] मध्ये प्रसिध्द [illegible] परिशिष्ट १ नुसार विहित [illegible] अशा महिला उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गातील [illegible] या शासन निर्णयाच्या [illegible] सादर करणे आवश्यक केलेले उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्यासाठी कार्यक्रमाप्रमाणे कार्यवाही करावी.

(१) या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-२ नुसार संबंधित [illegible] तहसिलदार यांचेकडे क्रिमीलेअरच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा.

(२) वर नमूद केलेल्या उमेदवारांनी उन्नत [illegible] (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यास, तहसिलदार व नायब तहसिलदार [illegible] अशा उमेदवारांना [illegible] प्रमाणपत्राप्रमाणेच उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र द्यावे.

(३) हे प्रमाणपत्र देण्यासाठी तहसिलदार व नायब तहसिलदार यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतच्या अर्जाचा नमूना व प्रमाणपत्राचा नमुना या शासन निर्णयाच्या परिशिष्ट २ व ३ प्रमाणे राहील.

(४) वरील प्रमाणपत्र तपासण्यासाठी या शासन निर्णयाच्या परिच्छेद (दोन) (आ) मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती [illegible] यात यावी.

(तीन) हे आदेश तात्काळ अमलात येतील.

(चार) हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २९/१६-अ, दि. ३.४.२००१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भास्कर [illegible])
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
- प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
- प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
- सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
सर्व विभागीय महिला व बाल विकास अधिकारी,
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व महानगरपालिका
सर्व जिल्हाधिकारी
सर्व उपविभागीय अधिकारी/तहसिलदार
सर्व जिल्हा [illegible] अधिकारी
सर्व [illegible]
निवड नस्ती-कार्या-२
- [illegible]

[illegible] (9020-4-09)-2

Scanned by CamScanner

## परिशिष्ट-१

शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.८२/२००१/[illegible]/का-१, दि. १५.५.२००१

### चे परिशिष्ट-१.

वाचा :- १) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९०/प्र.क्र.२८५/का-२, दि. २२ जून, १९९४

२) शासन परिपत्रक, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९५/प्र.क्र.२९३/का-२, दि. १३.१०.१९९५

३) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९३/प्र.क्र.३९५/का-२, दि. १६.२.[illegible]

४) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-२, दि. २७.५.१९९७

५) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-२, दि. १.८.१९९७

६) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-१०, दि. १८.२.१९९८

७) शासन परिपत्रक, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-१०, दि. १२.५.१९९८

८) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९८/प्र.क्र.८०/का-१०, दि. २.११.१९९८

९) शासन परिपत्रक, महिला व बाल विकास विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-१, दि. २९.६.२०००

---

( शासन निर्णय क्र.८२/२००१मसेआ-२०००/प्रक्र. [illegible] दि. [illegible].२००१ चे परिशिष्ट-२ )

[illegible]

खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी असलेल्या ३०% आरक्षणाच्या सवलतीसाठी उन्नत व प्रगत गट (क्रिमीलेयर) मध्ये मोडत नसल्याबाबत प्रमाणपत्र मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना :-

प्रति,
तहसिलदार / नायब तहसिलदार,

महोदय,

मी आपणांस विनंती करते की, खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी असलेल्या ३०% आरक्षणाच्या सवलतीसाठी मला कृपया उन्नत व प्रगत गट (क्रिमीलेयर) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे, अशी विनंती आहे.

मी माझी माहिती खालीलप्रमाणे नमूद करीत आहे :-

१) अर्जदाराचे पूर्ण नाव :-
२) जन्म दिनांक :-
३) निवासाचा पूर्ण पत्ता
   अ) सध्याचा :-
   ब) कायमचा :-
४) धर्म :-
५) जात :-
६) वडीलांचे नाव :-
७) आईचे नाव :-
८) पतीचे नाव :-
९) पालकांचा / पतीचा व्यवसाय :-
१०) पालकांच्या / पतीच्या उत्पन्नाचा तपशील :-

११) अ) पालक/पती नोकरी करीत असल्यास
   १) वडीलांच्या/पतीच्या नोकरीचे ठिकाण (कंपनी/कार्यालयाचे नांव) :-
   २) पदनाम :-
   ३) मागील तीन वर्षांचे वर्ष निहाय एकूण वार्षिक वेतन (सर्व भत्त्यांसह) :-
   ४) आईचे नोकरीचे ठिकाण (कंपनी/कार्यालयाचे नाव) :-
   ५) पदनाम :-

[illegible] - २२३ ( [illegible] ) ९००-५-०९)-२०० [illegible]

६) मागील तीन वर्षांचे वर्ष निहाय एकूण वार्षिक वेतन (सर्व भत्त्यांसह) :-

७) कुटुंबाचे एकूण उत्पन्न (तीन वर्षांचे वर्षनिहाय) अ.क्र. ३ + ७ :-

ब) पालक/पती व्यवसाय करीत असल्यास :-

१) व्यवसायाचे नाव :-

२) व्यवसायाचे ठिकाण :-

३) व्यवसायापासून मिळालेले मागील तीन वर्षांचे वर्ष निहाय एकूण उत्पन्न :-

मी असे प्रमाणित करतो की, वर नमूद केलेली माहिती माझ्या व्यक्तिगत माहितीप्रमाणे व विश्वासाने खरी असे आणि म्हणून मी उन्नत व प्रगत गट (क्रिमिलेअर) मध्ये मोडत नाही. त्यामुळे मुलगा/मागासवर्गीय महिला साठीच्या आरक्षणाच्या लाभासाठी मी पात्र आहे. पण मी वर नमूद केलेली माहिती खोटी अथवा दिशाभूल करणारी आहे असे निवड होण्यापूर्वी किंवा नंतर आढळून आल्यास माझी निवड/नियुक्ती रद्द होण्यास पात्र असेल. तसेच कायदा किंवा नियमांद्वारे विहित असणाऱ्या कारवाईस मी पात्र असेल.

आपली,

(अर्जदाराची सही)

ठिकाण :-

दिनांक :-

Scanned by CamScanner

(शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्रक्र.४२१/..., दिनांक २५.५.२००१ चे परिशिष्ट )

## परिशिष्ट - १

खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमध्ये ठेवण्यात आलेल्या ३०% आरक्षणाच्या सवलतीकरिता उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना:-

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.संकीर्ण-२०००/प्रक्र.४१५/का-२, दि.२२.५.२००१ अन्वये विहित केलेल्या खुल्या प्रवर्गातील महिलांकरिताच्या उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) प्रवर्गामध्ये कुमारी/श्रीमती ------------------------------------------------ यांच्या कुटुंबियांचे लगतच्या मागील ३ वर्षाचे सर्व मार्गांनी मिळून एकूण उत्पन्न वार्षिक सरासरी रुपये २ लाखाच्या आत असल्याने त्या खुल्या प्रवर्गातील उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नाहीत.

सही

( सक्षम अधिकारी )

दिनांक :-

शिक्का :-

एच-2773 (3A) (9000-5-09)-

कर्मचारीवर्ग खाते

परिपत्रक क्र. २३/२०१८

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ ३२६२

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालयं,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८
दिनांक ०२ जून, २०१८

म.रा.मा.प. महामंडळ
आ.क्र. 9203
दिनांक: १८/६/२०१८

- महाव्यवस्थापक (आवेदन),रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण),रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प.दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय : शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर करण्याबाबत.

संदर्भ : १. परिपत्रक क्र.१०/२०१७ जाक्रं. राप/आस्था/४०८-ई(१)/५५४१ दिनांक २० मार्च २०१७

२. शासन परिपत्रक मराठी भाषा विभाग,क्र.मभावा-२०१८/प्र.क्र.४७/भाषा-२ दिनांक ७ मे २०१८

----

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम,१९६४ अन्वये, दिनांक २६ जानेवारी १९६५ पासून महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून देवनागरी लिपीतील मराठी भाषेचा अंगिकार करण्यात आला. तसेच सदर अधिनियमांतर्गत महाराष्ट्र राजभाषा (वर्जित प्रयोजने )नियम १९६६, दिनांक ३० एप्रिल,१९६६ च्या अधिसुचनेन्वये अंमलात आले आहेत. सदर नियमात नमुद केलेली वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय प्रयोजनांकरीता मराठी भाषा वापरणे दिनांक ०१ मे १९६६ पासून अनिवार्य करण्यात आले आहे.त्यानुसार वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करण्यासाठी यापुर्वी शासन व्यवहारात मराठी राजभाषेचा वापर करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रके,शासन निर्णय,आदेश काढून शासनाच्या भाषाविषयक धोरणाबावत निदेश देण्यात आलेले आहेत.

२. अ. क्र.२ येथील संदर्भाधिन परिपत्रकानुसार शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर करण्याबावत सविस्तर सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. <u>सोबत शासन परिपत्रकाची प्रत सुलभ संदर्भासाठी जोडण्यात येत आहे.</u>

३. सदर परिपत्रकातील सुचनांनुसार प्रत्येक विभागाने एक **"मराठी भाषा दक्षता अधिकारी"** नेमावा. हा अधिकारी आपल्या कार्यालयात मराठी भाषेचा वापर होतो किंवा कसे याची तपासणी करील. (सदर मराठी भाषा अधिका-याची नेमणूक विभागांतर्गत कार्यरत अधिका-यांमधून करुन त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपवावी.) त्यानुसार सर्व विभाग / घटक तसेच मध्यवर्ती कार्यालयातील खाते / शाखा यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यरत अधिका-यांपैकी एका अधिका-याची सदर कामासाठी नियुक्ती करावी.

४. आपल्या कार्यालयातील तसेच आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वर्जित प्रयोजने खेरीज करुन उर्वरित सर्व कामकाजात त्यातही विशेषत्वाने खालील बाबींमध्ये मराठीचा वापर केला जाईल याची **मराठी भाषा दक्षता अधिकारी** यांनी व्यक्तिश: खात्री करुन घ्यावी. त्यानुसार संदर्भाधिन क्र.१ येथील परिपत्रकामधील सुचना कायम ठेऊन, सदर शासन परिपत्रकाच्या अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

- महामंडळाकडून वेगवेगळया योजना राबविल्या जातात. संदर योजनांची माहिती जनसामान्यांना देताना व त्यांसदर्भात चर्चा करताना तसेच दुरध्वनीवरुन / भ्रमणध्वनीवरुन बोलताना सर्व कर्मचारी /अधिकारी यांनी मराठी भाषेचा वापर करणे <u>बंधनकारक</u> आहे.
- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन माहिती व तंत्रज्ञान विभागाने जनसामान्यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचा अधिकार, आपले सरकार, ई-निविदा इत्यादी ऑन लाईन सेवा/पोर्टल मराठी भाषेत उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

सर्व संबंधीतांस परिपत्रकाची प्रत देणे व सुचना फलकावर प्रदर्शित करणे.

..२..

D:\GAD\Circular\Gen Circular-२०१८.docx

Scanned by CamScanner

- रा.प.महामंडळाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द केली जाणारी माहिती मराठी भाषेतून असावी. तसेच राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावर विभागाची माहिती सर्वांच्या निदर्शनास आणणे आवश्यक वाटत असल्यास संकेतस्थळावर ती केवळ इंग्रजी भाषेत न ठेवता मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषेत माहिती प्रसिध्द करावी.
- वर्जित प्रयोजन वगळता, अन्य सर्व प्रकरणी महामंडळातर्फे जिल्हास्तरीय व इतर दुय्यम न्यायालयात दाखल करण्याचे दावे मराठी भाषेतून दाखल करण्यात यावेत.

५. या कार्यालयाकडून सुचना देऊनही वर्जित प्रयोजनात न मोडणा-या कामकाजातही राजभाषा मराठीचा वापर करण्यासंदर्भात जे अधिकारी/कर्मचारी टाळाटाळ करतील त्यांचेविरुध्द शिस्त भंगाची कारवाई करण्याबाबत या पुर्वीच या कार्यालयाचे परिपत्रक क्र.१०/२०१७ क्राप/आस्था/४०८-ई(१)/१५४१ दिनांक २० मार्च २०१७ नुसार सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधित नियंत्रक अधिका-यांची वैयक्तिक जबाबदारी असेल.

६. या परिपत्रकातील सुचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी विभाग / घटक प्रमुखांची आहे. सदर परिपत्रक कार्यालयाच्या सुचना फलकावर ठळकपणे प्रदर्शित करावे तसेच आपल्या अधीनस्त सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून त्याबाबत संबंधितांच्या स्वाक्ष-या घेऊन त्याची नोंद आपल्या दप्तरी ठेवण्यात यावी.

परिपत्रकाची पोच आठ दिवसात निश्चितपणे देण्यात यावी.

सोबत - संदर्भित शासन परिपत्रक

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

जा. क्र. रा. प. / विनिज / आस्था /३२२८
राज्य परिवहन, विभागीय कार्यालय,
जळगांव. दिनांक : १९/०६/२०१८.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव रवाना.**

- म. महाव्यवस्थापक (क.व औ.सं.), रा. प. मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव रवाना.
- यंअ [चालन] / विवाअ / उयंअ / उयंअ [धाव] / विभांअ / सयंअ / विअ / सुवदअ / विवाअ [अप.] / विकअ / विलेअ / काअ / विसां, रा. प. जळगांव.
- आगार प्रमुख, रा. प. जळगांव [ वरिष्ठ ] / यावल / चाळीसगांव / अमळनेर / चोपडा / जामनेर / रावेर /मुक्ताईनगर/ पाचोरा / भुसावळ / एरंडोल.

विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन, जळगांव.

Scanned by CamScanner

शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः मभावा-२०१८/प्र.क्र.४७/भाषा-२
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०७ मे,२०१८

वाचा :-

१) सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. मभावा - १०७९ /२८, दि. २२.०१.१९७९
२) सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. मभावा-१०८०/प्र.क्र.५४/२०, दि. १८.०५.१९८२
३) सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. मभावा-१०८५/प्र.क्र.९५/२०, दि. ०४.०६.१९८५
४) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मभावा-१०८६/४३२/प्र.क्र.१६१/८६/वीस-ब, दि. १८.०७.१९८६
५) सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. मभावा-२०१०/प्र.क्र.७५/वीस-ब, दि. १४.०७.२०१०
६) मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र. मभावा-१०११/प्र.क्र ७८/२०११/भाषा-२, दि. १०.०५.२०१२.
७) मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र. मभावा-१०१३/५७/८२/प्र.क्र. ९/२०१३/भाषा-२, दि. २९.०१.२०१३
८) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. मभावा-२०१५/प्र.क्र३६/भाषा-२, दि. २८.०४.२०१५ .

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये दि. २६, जानेवारी, १९६५ पासून महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून देवनागरी लिपीतील मराठी भाषेचा अंगीकार करण्यात आला. तसेच सदर अधिनियमांतर्गत महाराष्ट्र राजभाषा (वर्जित प्रयोजने) नियम १९६६, दि. ३० एप्रिल, १९६६ च्या अधिसूचनेन्वये अंमलात आले आहेत. सदर नियमात नमूद केलेली वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय प्रयोजनांकरिता मराठी भाषा वापरणे दि. ०१ मे, १९६६ पासून अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार मंत्रालयीन विभाग/राज्य शासकीय कार्यालये / शासन अंगीकृत व्यवसाय ( मंडळे/ महामंडळे/प्राधिकरणे) / शासकीय उपक्रम यांमधील व त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयांतील अधिकारी/कर्मचारी यांनी वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय कामकाजासाठी मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे. त्यानुसार शासन व्यवहारात मराठीचा वापर करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रके, शासन निर्णय, आदेश काढून शासनाच्या भाषाविषयक धोरणाबाबत निदेश देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षापर्यंत म्हणजेच दि. ०१ मे, १९८५ पर्यंत वर्जित प्रयोजने वगळता संपूर्ण शासकीय कामकाज मराठी भाषेतून करावे, असे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. तथापि, अजूनही राज्य शासनाच्या

Scanned by CamScanner

सर्व कार्यालयात मराठी भाषेचा वापर १०० % केला जात नसल्याने, राज्य मंत्रिमंडळामध्ये याबाबत झालेल्या चर्चेमध्ये शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यासंदर्भात शासनस्तरावरुन वेळोवेळी दिलेल्या सूचना सर्व विभागांना पुनःश्च देण्याबाबत निदेश दिले आहेत.शासकीय कामकाजातील मराठीच्या वापराबाबत विधानमंडळाच्या अधिवेशनामध्ये वारंवार प्रश्न, सूचना, चर्चा उपस्थित केल्या जातात. तसेच या संदर्भात वारंवार तक्रार अर्ज आपले सरकार, माहितीचे अधिकार इत्यादि माध्यमातून मोठया प्रमाणावर प्राप्त होत आहेत. त्यामुळे शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यासंदर्भात आजतागायत शासन स्तरावरुन निर्गमित केलेले आदेश, परिपत्रके, शासन निर्णय इत्यादिंतील तरतुदी सर्व विभागांच्या पुनःश्च निदर्शनास आणण्याच्या अनुषंगाने सदर तरतुदी एकत्रितरित्या सर्व विभागांच्या निदर्शनास आणण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन परिपत्रक :-**

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार मंत्रालयीन विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभागीय व राज्यशासनाची सर्व कार्यालये यांच्यामार्फत वर्जित प्रयोजने वगळता सर्वसामान्य जनतेशी करण्यात येणारा सर्व पत्रव्यवहार व इतर कार्यालयीन कामकाज मराठी भाषेतून करणे अनिवार्य आहे.याबाबत शासनाने वेळोवेळी शासन निर्णय,परिपत्रके याव्दारे यापूर्वीच सूचना दिल्या आहेत. तसेच आता राजभाषा मराठीतून कामकाज सक्षमपणे व अधिकाधिक परिणामकारकरित्या करण्याकरिता राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सन्माननीय सदस्यांचा समावेश असलेल्या “मराठी भाषा समिती” ची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या कामकाजाला प्रारंभ झाला असून, शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये राजभाषा मराठीच्या वापराचा आढावा घेऊन राज्य शासनाला सूचना देणे आणि उपाययोजना सुचविणे हा समितीचा मुख्य उद्देश आहे. यापुढे सदर समितीच्या कार्यकक्षेनुसार समितीकडून राज्यशासनाच्या कार्यालयांची पाहणी करण्यात येईल व समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने यथायोग्य कार्यवाही करण्यात येईल. समितीने विभागांतर्गत केलेल्या प्राथमिक तपासणीनंतर पुढील सूचना केल्या आहेत :-

अ) प्रत्येक विभागात एक “मराठी भाषा दक्षता अधिकारी” नेमावा. हा अधिकारी आपल्या कार्यालयात मराठी भाषेचा वापर होतो किंवा कसे याची तपासणी करील. (सदर मराठी भाषा अधिकाऱ्याची नेमणूक विभागांतर्गत कार्यरत अधिकाऱ्यांमधून करुन त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपवावी.)

ब) प्रत्येक विभागाने आपल्या विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांची नावे मराठी भाषेत असल्याची दक्षता घ्यावी.

२. राज्य शासनांतर्गत सर्व कार्यालयांनी प्रशासनातील मराठी वापराच्या कामास गती देण्याच्या दृष्टीने विधानमंडळातील मराठी भाषा समितीच्या उपरोक्त सूचनांची तात्काळ अंमलबजावणी करावी. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ नुसार राजभाषा मराठीचा प्रशासन स्तरावरील वापर वृद्धिंगत व्हावा याकरिता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने राज्यशासनांतर्गत सर्व कार्यालये/महामंडळे यांना प्रशासनिक व्यवहारात मराठीचा सक्षमपणे वापर करण्याकरिता पुढील सूचना पुनःश्च देण्यात येत आहेत.



Scanned by CamScanner

## सर्वसाधारण सूचना

१) शासनाकडून वेगवेगळया योजना राबविल्या जातात. सदर शासकीय योजनांची माहिती जनसामान्यांना देताना वा त्यासंदर्भात चर्चा करतांना तसेच दूरध्वनीवर बोलतांना सर्व संबंधित शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी मराठी भाषेचा वापर करणे बंधनकारक आहे.

२) वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सभेत भाषण करतांना अथवा बैठकीत बोलतांना मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे.

३) मंत्रिमंडळ बैठक व वरिष्ठ स्तरावर होणाऱ्या तत्सम बैठकीत सादरीकरण (Presentation ) करतांना दर्शविण्यात येणारी माहिती प्रामुख्याने मराठीतून असावी.

४) मंत्रालयीन विभागांनी व त्यांच्या नियंत्रणाखालील विभागीय व इतर कार्यालयांनी सर्वसामान्य जनतेशी होणारा सर्व पत्रव्यवहार व इतर कार्यालयीन कामकाज मराठीतून करण्याची खबरदारी घ्यावी. प्रत्येक विभागातून सर्व सामान्यांपर्यत जाणारे सर्व नमुने, पत्रके, परवाने, इत्यादि तसेच, कार्यालयांतर्गत वापरल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या नोंदवह्या, प्रमाण नमुने, प्रपत्रे, विभागीय नियमपुस्तिका, सर्व प्रकारच्या टिप्पण्या, नस्त्या व पत्रव्यवहार यांवरील शेरे/अभिप्राय, शासनाची धोरणे, आदेश, अधिसूचना, प्रारुप नियम, शासन निर्णय, परिपत्रके, अहवाल, बैठकांची कार्यवृत्ते तसेच संकेतस्थळे, इत्यादि मराठी भाषेत असणे आवश्यक आहे. राजभाषा मराठीचा शासन व्यवहारात संपूर्णपणे वापर होण्यासाठी मंत्रालयातील निरनिराळया विभागातील सचिव/मंत्री अशा वरिष्ठ स्तरावर दिले जाणारे शेरे, टिप्पण्या व आदेश जाणीवपूर्वक मराठी भाषेतून असावेत. मा. मंत्री/राज्यमंत्री यांनी आपल्याकडे येणारी सर्व प्रकरणे मराठीतून असावीत असा आग्रह धरावा.

५) कार्यालयातील नामफलकावर अथवा पत्रव्यवहारावर एखादी व्यक्ती/अधिकारी/कर्मचारी यांचे नाव मराठी भाषेत लिहिताना इंग्रजी आद्याक्षरांचे मराठीत भाषांतर न करता ती मराठीतूनच लिहावीत. (उदा :- एच.एन.आपटे असे न लिहिता ह.ना. आपटे असे लिहावे.) पदनामाचा उल्लेखही मराठी भाषेत असावा. तसेच, अधिकारी/कर्मचारी यांनी मराठी भाषेतील टिप्पणी, आदेश, शासन निर्णय, परिपत्रके, अधिसूचना व इतर पत्रव्यवहार यांवर रोमन लिपीत इंग्रजीमध्ये सह्या न करता देवनागरी लिपीत मराठीत सह्या कराव्यात.

६) शासकीय कार्यालयातून लावलेल्या पाट्या, फलक मराठीतून असावेत, तसेच शासकीय कामकाजात पत्रव्यवहारामध्ये/निमंत्रणपत्रिकेमध्ये आणि इतर बाबींसंदर्भात रेल्वे स्थानके, गावांची नावे यांच्या नावाचा उल्लेख करताना मराठी भाषेत देवनागरी लिपीत नावे लिहावीत. (उदा : - बांद्रा असे नाव न वापरता वांद्रे हे मूळ मराठी नाव वापरावे. सायन असे नाव न वापरता शीव हें मूळ मराठी नाव वापरावे.)

७) राज्य शासनाचे सर्व विभाग व त्याअंतर्गत असलेली संचालनालये, महामंडळे, शासकीय उपक्रम यांच्यामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या समारंभांची निमंत्रणे मराठी भाषेत असणे आवश्यक आहे. क्वचित प्रसंगी आवश्यक असल्यास, मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषेतून निमंत्रण पत्रिका असावी.



Scanned by CamScanner

८) राज्य शासकीय कार्यालयातून दिल्या जाणाऱ्या जाहिराती व निविदा किमान दोन मराठी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तसेच, मराठी वृत्तपत्रात दिल्या जाणाऱ्या शासकीय व निमशासकीय कार्यालयांच्या आणि मंडळांच्या व महामंडळांच्या जाहिराती व निविदा मराठी भाषेत प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

९) राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या विभागीय परीक्षा तसेच पदभरतीसाठी शासकीय व निमशासकीय कार्यालयांमार्फत आणि मंडळांमार्फत व महामंडळामार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षा मराठीतून घेणे आवश्यक आहे. जर काही परीक्षार्थ्यांनी इंग्रजीतून उत्तर देण्याची परवानगी मागीतली असेल तर अशी परवानगी प्रत्येक बाबतीत गुणावगुणांचा विचार करुन विभागप्रमुखांना देता येईल.

१०) राज्य शासनाच्या वतीने नेमण्यात आलेल्या शासकीय समित्या व अभ्यासगट (वर्जित प्रयोजनांतर्गत येणाऱ्या समित्या व अभ्यासगट वगळून) यांनी त्यांचे कामकाज काटेकोरपणे मराठी भाषेतून करावे व आपला अहवाल मराठी भाषेत शासनास सादर करावा.

११) शासनाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध केली जाणारी माहिती मराठी भाषेतून असावी. तसेच राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर विभागाची माहिती सर्वांच्या निदर्शनास आणणे आवश्यक वाटत असल्यास संकेतस्थळावर ती केवळ इंग्रजी भाषेत न ठेवता मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषेत माहिती प्रसिद्ध करावी.

१२) वर्जित प्रयोजने वगळता, अन्य सर्व प्रकरणी शासनातर्फे जिल्हास्तरीय व इतर दुय्यम न्यायालयात दाखल करण्यात येणारे दावे मराठी भाषेतून दाखल करण्यात यावेत.

१३) प्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत वाहतुक पोलीस यांच्याकडून वाहतुकीचे नियम तोडल्यानंतर देण्यात येणाऱ्या दंड वसूलीच्या पावत्या, विविध परवाने तसेच शासकीय उद्याने /पर्यटन स्थळे इत्यादी ठिकाणी आकरण्यात येणाऱ्या प्रवेश शुल्काच्या पावत्या प्राथम्याने मराठी भाषेतून देण्याबाबत संबंधित विभागाने दक्षता घ्यावी.

**अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबत सूचना :-**

१) टिप्पणी/पत्रलेखन याकरिता प्रमाणभाषेचा योग्य वापर करण्याच्या दृष्टीने, राज्य प्रशिक्षण धोरणानुसार अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या सेवाप्रवेशोत्तर पायाभूत/उजळणी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत भाषेबाबतच्या प्रशिक्षणाचा स्वतंत्रपणे समावेश करण्यात यावा.

२) प्रस्तुत कार्यालयीन प्रशिक्षणानंतर घेण्यात येणाऱ्या परीक्षांमधील प्रश्न मराठीतून असावेत. तसेच उत्तरेही मराठीतूनच लिहिली जातील यादृष्टीने प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाची आखणी करावी.

**माहिती आणि तंत्रज्ञान विभागाशी संबंधित सूचना :-**

१) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन माहिती आणि तंत्रज्ञान विभागाने जनसामान्यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहिती अधिकार, आपले सरकार, ई-निविदा इत्यादि ऑनलाईन सेवा/पोर्टल मराठी भाषेत उपलब्ध असणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

२) शासकीय कर्मचाऱ्यांसाठी ई-ऑफिस अंतर्गत रजा (ई-लिव्ह), हजेरीपत्रक (बायोमॅट्रीक) इत्यादि संदर्भात उपलब्ध केलेल्या सुविधा मराठीतून उपलब्ध असाव्यात.

३) धारिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये (फाईल मॅनेजमेंट सिस्टिम) धारिका अपलोड करताना तिचा विषय व क्रमांक इंग्रजीमध्ये करावा लागतो. सदर सुविधा मराठी भाषेत उपलब्ध असणे आवश्यक आहे.

३. शासन अधिक लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने दैनंदिन शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करणे सोपे जावे व मराठी भाषा शासन व्यवहाराची भाषा म्हणून प्रशासनात वापरण्याकरिता मराठी भाषा विभागांतर्गत कार्यालयांकडून प्रकाशित केलेल्या विविध शब्दकोश/परिभाषा कोश यासारख्या साधनसामुग्रीची सविस्तर माहिती व त्याच्या उपलब्धते बाबतचा तपशील सोबतच्या प्रपत्र १ ते २ मध्ये नमूद केला आहे. अभ्यासकांनी तसेच अधिकारी/कर्मचारी यांनी याचा यथायोग्य वापर करावा.

४. शासन व्यवहारात मराठी भाषेचा वापर सुरु होऊन ५० वर्षांहून अधिक कालावधी झाला असला तरी, अद्यापही काही विभागांकडून टिप्पण्या, शासन निर्णय, परिपत्रके इंग्रजीतून तयार केली जातात, अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रशिक्षण काळातील व सेवाप्रवेशोत्तर परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांमध्येही इंग्रजीचा वापर करण्यात येतो असे निदर्शनास येत आहे. प्रत्येक विभागामार्फत १०० % कामकाज मराठीतच केले जाणे अपेक्षित आहे. भाषा संचालनालयाकडून वारंवार सूचना देऊनही वर्जित प्रयोजनात न मोडणाऱ्या कामकाजातही संयुक्तिक कारण नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्यासंदर्भात जे अधिकारी / कर्मचारी टाळाटाळ करतील त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत यापूर्वीच दि. १८ जुलै, १९८६ च्या (प्रपत्र-३) शासन निर्णयान्वये सविस्तर आदेश देण्यात आले आहेत. (सुलभ संदर्भासाठी सोबत शासन निर्णयाची प्रत जोडण्यात येत आहे.) तरी सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांनी सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०५०७१७३५०८६०३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(भूषण गगराणी)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव



Scanned by CamScanner

शासन परिपत्रक क्र. मभावा-२०१८/प्र.क्र.४७/भाषा-२, दि. ०७ मे,२०१८ सोबतचे सहपत्र

## प्रपत्र १

मराठी भाषा विभागांतर्गत कार्यालयांनी मराठीच्या प्रशासनिक वापरासाठी प्रकाशित केलेले विविध शब्दकोश व परिभाषा कोश व अन्य प्रकाशने यांची यादी :-

### अ) भाषा संचालनालय, मुंबई

| अ.क्र. | प्रकाशनाचे नाव | वैशिष्ट्ये |
|---|---|---|
| १. | शासन व्यवहार शब्दावली (मराठी x इंग्रजी) | सोबतची सर्व प्रकाशने शासकीय मुद्रणालयात उपलब्ध आहेत. तसेच भाषा संचालनालयाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.<br>तसेच अ.क्र. १ ते ४ येथील प्रकाशने ही दैनंदिन प्रशासनात वारंवार लागणारी प्रकाशने आता भ्रमणध्वनी उपयोजक (मोबाईल ॲप) च्या स्वरुपात उपलब्ध असून, हे उपयोजक https://play.google.stre/apps/details,id-gov.maharashtra.shabadkoshapp या दुव्यावर मोफत उपलब्ध आहे. हे उपयोजक आपल्या भ्रमणध्वनीवर स्थापित करुन आपल्याला प्रशासनिक वापरातील मराठी - इंग्रजी किंवा इंग्रजी - मराठी असे शब्द तात्काळ मिळू शकतात.<br>विविध विषय/तांत्रिक संकल्पना याकरिता विविध विषयांच्या परिभाषा कोशाची मदत घेता येऊ शकते. सदर सर्व पुस्तके/कोश शासकीय मुद्रणालयांमध्ये उपलब्ध आहेत. |
| २. | प्रशासन वाक्प्रयोग | |
| ३. | कार्यदर्शिका | |
| ४. | न्याय व्यवहार कोश | |
| ५. | प्रशासनिक लेखन | |
| ६. | प्रमाणलेखन नियमावली | |
| ७. | वित्तीय शब्दावली | |
| ८. | पदनाम कोश | |
| ९. | राजभाषा परिचय | |
| १०. | राजभाषा परिचय (कार्यरुप व्याकरण) | |
| ११. | भारताचे संविधान (इंगजी/मराठीसह एकत्रित) | |
| १२. | मराठी लघुलेखन मार्गदर्शिका | |
| | **विविध विषयांचे परिभाषाकोश** | |
| १३. | ग्रंथालय परिभाषा कोश | |
| १४. | गणितशास्त्र परिभाषा कोश | |
| १५. | समाजशास्त्र परिभाषा कोश | |
| १६. | तत्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश | |
| १७. | वाणिज्यशास्त्र परिभाषा कोश | |
| १८. | रसायनशास्त्र परिभाषा कोश | |
| १९. | भूशास्त्र परिभाषा कोश | |
| २०. | शारीर परिभाषा कोश | |
| २१. | शिक्षणशास्त्र परिभाषा कोश | |
| २२. | यंत्र अभियांत्रिकी परिभाषा कोश | |
| २३. | स्थापत्य अभियांत्रिकी परिभाषा कोश | |
| २४. | भौतिकशास्त्र परिभाषा कोश | |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| २५. | विद्युत अभियांत्रिकी परिभाषा कोश | |
| २६. | कृषिशास्त्र परिभाषा कोश | |
| २७. | जीवशास्त्र परिभाषा कोश | |
| २८. | शरीरक्रीया शास्त्र परिभाषा कोश | |
| २९. | राज्यशास्त्र परिभाषा कोश | |
| ३०. | साहित्य समीक्षा परिभाषा कोश | |
| ३१. | लोकप्रशासन परिभाषा कोश | |
| ३२. | अर्थशास्त्र परिभाषा कोश | |
| ३३. | धातुशास्त्र परिभाषा कोश | |
| ३४. | मानसशास्त्र परिभाषा कोश | |
| ३५. | व्यवसाय व्यवस्थापन परिभाषा कोश | |
| ३६. | संख्याशास्त्र परिभाषा कोश | |
| ३७. | औषधशास्त्र परिभाषा कोश | |
| ३८. | भाषा विज्ञान व वाङ्मयविद्या परिभाषा कोश | |
| ३९. | भूगोलशास्त्र परिभाषा कोश | |
| ४०. | विकृतिशास्त्र पारिभाषिक शब्दावली | |
| ४१. | वृत्तपत्रविद्या परिभाषा कोश | |
| ४२. | न्यायवैद्यक व विषशास्त्र परिभाषा कोश | |
| ४३. | भौतिकशास्त्र पारिभाषिक शब्दावली (मराठी x इंग्रजी) | |
| ४४. | कृषिशास्त्र पारिभाषिक शब्दावली (मराठी x इंग्रजी) | |

**ब) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ :-**

| अ.क्र. | प्रकाशनाचे नाव | वैशिष्ट्ये |
|---|---|---|
| १. | शासन शब्दकोश:- पहिला खंड (अ ते औ) | या कार्यालयाकडून प्रामुख्याने विविध विषयांचे वाङ्मयीन प्रकल्प हाती घेण्यात येतात. मंडळाने भाषाप्रेमी/ अभ्यासक यांच्या दैनंदिन वापरासाठी मराठी शब्दकोशाचे १ ते ६ खंड प्रसिध्द केले आहेत. हे खंड शासकीय मुद्रणालयात उपलब्ध आहेत. |
| २. | शासन शब्दकोश:- दुसरा खंड (क ते ङ) | |
| ३. | शासन शब्दकोश:- तिसरा खंड (च ते ञ आणि ट ते ण) | |
| ४. | शासन शब्दकोश:-चौथा खंड (त ते न) | |
| ५. | शासन शब्दकोश:- पाचवा खंड (प ते म) | |
| ६. | शासन शब्दकोश:- सहावा खंड (य ते ज्ञ) | |



Scanned by CamScanner

क) महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ :-

| अ.क्र. | प्रकाशनाचे नाव | वैशिष्ट्ये |
|---|---|---|
| | मराठी विश्वकोश<br>( मराठी वर्णमालेनूसार "अ ते ज्ञ" पर्यंत एकुण २० खंड) | एनसायक्लोपिडीया ब्रिटानिकाप्रमाणे सर्व विषयातील ज्ञान मराठीत आणण्यासाठी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली दि. २ जानेवारी, १९६२ पासून विश्वकोशाचे काम सुरु करण्यात आले. वाचकांसाठी हा उपयुक्त संदर्भग्रंथ असून याचे एकूण २० खंड प्रसिध्द करण्यात आले आहेत. लिखीत खंडाची विक्री शासकिय मुद्रणालयाव्दारे होत आहे. तसेच आता हे सर्व खंड संकेतस्थळ व भ्रमणध्वनी उपयोजकाच्या (मोबाईल ॲप) स्वरुपात मोफत उपलब्ध आहेत. हे उपयोजक गुगल प्ले स्टोअर वरुन विनामुल्य स्थापित (डाऊनलोड) करता येईल. हे उपयोजक ॲन्ड्रॉइड, आय फोन या मोबाईल प्रणालीमध्ये वापरता येते. हे उपयोजक (ॲप) सर्वसामान्य वाचक / प्रशासनातील अधिकारी / कर्मचारी यांच्याकरीता उपयुक्त आहे. |

ड) राज्य मराठी विकास संस्था:-

राज्य मराठी विकास संस्था या कार्यालयाकडुन सर्व राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय स्तरावरील भाषा विज्ञान विषयक उपक्रम हाताळण्यात येतात. या कार्यालयाने मराठी भाषेतून अनेक संशोधनात्मक लेखन प्रकल्प पूर्ण केले. भाषा विषयक पुढील पुस्तके संस्थेने प्रकाशित केली आहेत.

| अ.क्र. | प्रकाशनाचे नाव | संपादन | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| १. | शासन शब्दकोश | श्री. वसंत आबाजी डहाके व श्री. गिरीश पतके | भाषा लेखनासाठी संस्थेची प्रस्तुत प्रकाशने अतिशय उपयुक्त असल्याने याचा लाभ सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी घ्यावा. सदर पुस्तके संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.<br>**संस्थेचा पत्ता**<br>राज्य मराठी विकास संस्था, एलफिन्स्टन तांत्रिक विद्यालय इमारत, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-४००००१ |
| २. | मराठी लेखन मार्गदर्शिका | श्री. यास्मिन शेख | |



Scanned by CamScanner

शासन परिपत्रक क्र. समांकी २०१८/प्र.क्र.४८/आभा.२, दि. ०५/०४/२०१८ चे सहपत्र

प्रपत्र-३

शासन व्यवहारात संयुक्तिक कारण
नसताना मराठीचा वापर करण्यास
टाळाटाळ करणा-या विरुद्ध कारवाई
करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: ममांवा-१०८६/१२२/प्र. १६१/८६/पांत-व.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १८ जुलै, १९८६.

पहा :- १] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक ममावा-१०८५/प्र-४६-२०, दिनांक १८ मे, १९८५.
२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक ममांवा-१०८३/१२५८/२०, दिनांक २८.१२.१९८३.

<u>नि र्ण य</u>

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ व त्याखाली करण्यात आलेल्या नियमानुसार काही वर्जित प्रयोजने वगळता, सर्व शासकीय कामकाज मराठीतून करावे असे आदेश शासनाने वेळोवेळी दिलेले आहेत. एवढेच नव्हे तर वर्जित प्रयोजनात न मोडणा-या कामकाजातही संयुक्तिक कारण नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्याच्या संदर्भात जे अधिकारी/कर्मचारी टाळाटाळ करतील त्यांच्या गोपनीय अभिलेखात नोंद घेण्यात यावी व वारंवार समज देऊनही जे अधिकारी वा कर्मचारी नियमानुसार राजभाषेचा वापर करणार नाहीत, त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करावी असेही आदेश दिलेले आहेत. तसेच राजभाषा मराठीचा वापर करण्या संदर्भातील शासन आदेशाचे, शासकीय कार्यालये व विभाग यांनी, काटेकोरपणे पालन न केल्यास विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल असेही आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. राजभाषा मराठीचा शासन व्यवहारात संपूर्ण वापर होण्यासाठी खंबीर धोरण स्विकारून खालील उपाययोजना करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. सूचना देऊनही मराठीचा वापर करण्याबाबत ज्या शासकीय अधिका-यांकडून, कर्मचा-यांकडून सुधारणा होत नाही, अशा शासकीय अधिका-यांच्या/कर्मचाऱ्यांच्या बाबतीत निम्नलिखित कारवाई केली जाईल.

<u>प्रशासनीय कारवाई</u>

१] लेखी ताकिद
२] गोपनीय अभिलेखात नोंद

<u>शिस्तभंगविषयक कारवाई</u>

३] ठपका ठेवणे

४] एक वर्षाकरिता बढती रोखणे किंवा एक वर्षाकरिता पुढील वेतनवाढ रोखणे.

उपरोक्त कारवाया क्रमशः वापरण्यात याव्यात म्हणजे अनुक्रमांक १ ची ताकिद देवूनही सुधारणा न आढळल्यास अनुक्रमांक २ चा अवलंब करावा. त्याचाही उपयोग न झाल्यास अनुक्रमांक ३ मधील ठपका ठेवणे, या क्रमाने कारवाया कराव्यात. तसेच ठपका ठेवणे, वेतनवाढ रोखणे किंवा बढती रोखणे या शिक्षा महाराष्ट्र नागरी सेवा [शिस्त व अपील] नियम, १९७९ नुसार वादयाच्या असल्यामुळे त्या गौण शिक्षा त्या नियमांच्या नियम १० प्रमाणे कार्यपध्दती अनुसरून म्हणजे प्रथम नोटीस देऊन त्याचे उत्तर ध्यानात घेऊन नंतर शिक्षा देणे ही कार्यपध्दती अवलंबवावी.

३. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी मराठीचा वापर पूर्णतया होतो की नाही हे पाहण्यात, काही शैथिल्य दाखविल्यास त्यांना जबाबदार धरले जाईल असे उपरोक्त दिनांक २८.१२.१९८३ च्या शासन परिपत्रकामध्ये पूर्वीच नमूद केले आहे. शासनाने आता असे ठरविले आहे की, विभाग प्रमुखांनी/कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी/कर्मचारी शासन व्यवहारात मराठीचा वापर करतात की नाही हे पहाणे व ते करत नसतील त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्याबद्दलची योग्य ती कार्यवाही करणे या दोन्ही बाबतीत त्यांच्याकडून काही कसूर दिसून आल्यास "पर्यवेक्षिय शैथिल्य" [सुपरवायझरी स्लॅकनेस] म्हणून त्यांचे विरुध्द शिस्तभंग कारवाई केली जावी.

४. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी परिच्छेद ३ मधील आदेशांची स्वतः नोंद घ्यावी व परिच्छेद २ मधील आदेश त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या विविक्षिपणे निदर्शनास आणून द्यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[स्वाक्षरी]

[ श्री. श्री. चारी ]
शासनाचे अपर मुख्य सचिव.

प्रति,
राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मुख्य मंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई.
सर्वमंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई, [पत्राने].
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई [पत्राने].
प्रबंधक, लोकायुक्त/उप लोकायुक्त, मुंबई [पत्राने].

Scanned by CamScanner

शासन परिपत्रक क्र. मभावा-२०१८/प्र.क्र.४७/भाषा-२, दि. ०७ मे, २०१८ सोबतचे सहपत्र प्रपत्र-२

## संक्षिप्त शेऱ्यांची लघुपुस्तिका

प्रशासनात वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून धारिकांवर सहजपणे व वारंवार इंग्रजीमध्ये लिहिल्या जाणाऱ्या शेऱ्यांना मराठी पर्याय उपलब्ध करण्याच्या हेतूने भाषा संचालनालयाने संक्षिप्त शेऱ्यांची लघुपुस्तिका तयार केली आहे. सदर शेरे पुढीलप्रमाणे उपलब्ध करण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| Action as at 'A' above | वरील 'अ' प्रमाणे कार्यवाही करावी |
| action may be taken as proposed | प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करावी |
| action taken on | -- वर कार्यवाही केली |
| additional charge | अतिरिक्त कार्यभार |
| adjustment by transfer | खातेबदलाने समायोजन |
| administrative approval | प्रशासकीय मान्यता (प्र. मा.) |
| administrative approval may be obtained | प्रशासकीय मान्यता मिळवण्यात यावी |
| administrative improvement, composition and procedure | प्रशासकीय सुधारणा, रचना व कार्यपद्धती |
| administrative information | प्रशासकीय माहिती |
| admissible under rule | नियमानुसार अनुज्ञेय |
| admit an appeal | अपील दाखल करून घेणे |
| after hearing the person concerned | संबंधित व्यक्तीचे म्हणणे ऐकल्यानंतर |
| annual industrial survey | वार्षिक उद्योग पाहणी |
| annual property return | वार्षिक मालमत्ता विवरण |
| annual scheme | वार्षिक योजना (नियोजन विभाग) |
| appear in person | जातीने हजर रहाणे |
| appointment by nomination | नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती |
| appointment by promotion | बढतीद्वारे नियुक्ती |
| appointment by selection | निवडीद्वारे नियुक्ती |
| appropriation accounts | विनियोजन लेखे |
| Before due date | नियत तारखेपूर्वी |
| boundary rectification | हद्द दुरूस्ती |
| budget estimates | कार्यक्रम अंदाजपत्रक |
| Calculation register number | मोजणी नोंदवही क्रमांक |
| call information & resubmitted | माहिती मागवून फेरसादर करावे |
| calling attention notice | लक्षवेधी सूचना |
| case file | प्रकरण फाईल |
| case number | प्रकरण क्रमांक |
| certification sought | स्पष्टीकरण मागितले आहे |
| Chief Minister Charitable Fund (C.M.C.F.)) | मुख्यमंत्री सहायता निधी (मु.स.नि.) |

| | |
|---|---|
| approved as per remarks in the margin | समासातील शेऱ्यांनुसार मान्य |
| approved as proposed | प्रस्तावित केल्याप्रमाणे मान्य |
| approved sample (A.S.) | मान्य नमुना |
| arbitrary action | स्वेच्छानुसारी कारवाई |
| area rectification | क्षेत्र दुरूस्ती |
| as a matter of fact | वस्तुत: |
| as a special case | खास बाब म्हणून |
| as a temporary measure | तात्पुरता उपाय म्हणून |
| as early as possible | शक्यतो लवकर |
| as for as possible & convenient | शक्य आणि सोयीस्कर असेल त्याप्रमाणे |
| as for as practicable | व्यवहार्य असेल तितपत |
| as proposed | प्रस्तावित केल्याप्रमाणे |
| as revised | सुधारल्याप्रमाणे |
| as soon as | लवकरात लवकर |
| at any rate | कसेही करून |
| at the earliest | लवकरात लवकर |
| at the latest | उशिरात उशिरा |
| at your earliest convenience | आपल्या सोयीप्रमाणे लवकरात लवकर |
| audit objection | लेखापरीक्षा आक्षेप |
| await cases/ papers | प्रतिक्षाधीन प्रकरणे/ कागदपत्रे |
| budget estimation allocation & monitoring system | अर्थसंकल्प अंदाज नियतवाटप व संनियंत्रण यंत्रणा |
| budget speech cell (B.S.C.) | अर्थसंकल्प भाषण कक्ष (अ.भा.क.) |
| conciliation | खर्च मेळ |
| confidential remarks | गोपनीय शेरे/ अभिप्राय |
| confidential report | गोपनीय अहवाल |
| conservative estimate | नेमस्त अंदाज |
| consider on merit | गुणवत्तेवरून विचार करणे |
| contention is untenable | म्हणणे असमर्थनीय आहे |
| copy forwarded for information & guidance | प्रत माहितीकरिता व मार्गदर्शनासाठी पाठविण्यात येत आहे |

Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| Chief Minister Secretariat (C.M.S.) | मुख्यमंत्री सचिवालय |
| circumstantial evidence | परिस्थितीजन्य पुरावा |
| compliance report (C.R.) | अनुपालनाचे प्रतिवेदन |
| compulsory retirement | सक्तीची सेवानिवृत्ति |
| Date of joining | रुजू झाल्याचा दिनांक |
| demi official letter | अर्ध शासकीय पत्र |
| Democratic Day | लोकशाही दिन |
| Departmental enquiry | विभागीय चौकशी |
| Deposit Link Insurance Scheme | ठेव संलग्न विमा योजना |
| derogatory statement | कमीपणा आणणारे विधान |
| detailed contingent bill | तपशीलवार आकस्मिकता देयक |
| discuss by required documents | आवश्यक त्या कागदपत्रांसह चर्चा करावी |
| discuss immediately | तात्काळ चर्चा करावी |
| dispatch | रवाना करणे,निर्गमित करणे |
| Electronic Statistical Processing Centre | इलेक्ट्रॉनिक आकडेवारी संस्करण केंद्र |
| elucidate the reasons | कारणे विशद करणे |
| entertain an application | अर्ज स्वीकारणे |
| ephemeral roll | कच्चे टिपण |
| exercise due discretion | तारतम्यबुद्धीचा वापर करणे |
| exercise jurisdiction | क्षेत्राधिकाराचा वापर करणे |
| Fair and equitable treatment | रास्त आणि न्याय्य वागणूक |
| faulty action | सदोष कार्यवाही |
| file closed | नस्ती बंद करण्यात यावी |
| file in play | चालू नस्ती |
| file not traceable | फाईल सापडत नाही |
| filed | दफ्तरी दाखल |
| fit and proper | योग्य व उचित |
| floor space index (F.S.I.) | चटईक्षेत्र निर्देशांक |
| follow-up action | पाठपुरावा कार्यवाही , पाठपुराव्याची कार्यवाही |
| for approval | मान्यतेकरिता |
| for comments | टीकाटिप्पणीसाठी |
| for consideration | विचारार्थ |
| for disposal | निकालात काढणे |
| for early compliance | शीघ्र अनुपालनार्थ |
| for expression of opinion | मत व्यक्त करण्यासाठी , मत प्रदर्शनासाठी |
| corrected copy | सुधारलेली प्रत |
| count and survey | गणना व पाहणी |
| counter foil | स्थळ प्रत |
| dispense with services | सेवेतून कमी करणे |
| dispense with the provision | तरतूद आवश्यक नाही असे ठरवणे |
| dispose of | निकालात काढणे |
| documentary evidence should be called for | कागदोपत्री पुरावा मागवावा |
| done | पूर्ण झाले |
| draft for approval | मान्यतेसाठी मसुदा |
| draft may issue subject to approval | मान्य झाल्यास मसुदा पाठवावा |
| draft notification is in order | अधिसूचनेचा मसुदा नियमानुसार आहे |
| draft put up for approval | मसुदा मान्यतेसाठी प्रस्तुत |
| explanation be called for | खुलासा मागविण्यात यावा |
| explanatory note | स्पष्टीकरणात्मक टिप्पणी / टीप |
| ex-post facto approval/sanction | कार्योत्तर मान्यता / मंजुरी |
| expressly made know | स्पष्टपणे सांगितलेले |
| extension of service | सेवावधी वाढविणे |
| extra work | अतिरिक्त काम / कार्य |
| for further action | पुढील कार्यवाहीसाठी |
| for immediate effect | तात्काळ परिणामक करण्यासाठी |
| for information and necessary action | माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी |
| for necessary action | आवश्यक कार्यवाहीसाठी |
| for onword transmission | पुढे पाठविण्यासाठी |
| for prompt action | सत्वर कार्यवाहीसाठी |
| for proper action | उचित कार्यवाहीसाठी |
| for ready reference | तात्काळ संदर्भासाठी |
| for record | अभिलेखासाठी, नोंदीसाठी |
| for remarks | अभिप्रायासाठी |
| for service and return | (नोटीस) बजावून परत पाठविण्यासाठी |
| for signature | सहीसाठी, स्वाक्षरीसाठी |
| for spot enquiry | घटनास्थळ चौकशीसाठी |
| for such action as may be necessary | आवश्यक त्या कार्यवाहीसाठी |
| for sufficient reasons | पुरेशा कारणास्तव |

Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| for favour of due consideration | योग्य विचारासाठी सादर |
| for favour of orders | आदेशासाठी सादर |
| for favour of remarks | अभिप्रायासाठी सादर |
| General work clerk | सर्वसाधारण कार्य लिपीक |
| glaring mistake | ढळढळीत चूक |
| good and sufficient reason | उचित आणि पुरेसे कारण |
| Governement are pleased to order | शासनाचा आदेश आहे की |
| having regard to the merits of the case | प्रकरणाचे गुणदोष लक्षात घेता |
| High level Monitoring Committee | उच्चस्तरीय संनियंत्रण समिती |
| highly irregular | अत्यंत अनियमित |
| I agree | माझी संमती आहे, मी सहमत आहे |
| I am directed to state that | आपणास असे कळविण्याचा मला आदेश आहे की |
| I am to state that | मला असे सांगावयाचे आहे की |
| I have satisfied myself | माझे स्वत:चे समाधान झाले आहे |
| I reiterate my former comments | मी आपले पूर्वीचेच मत पुन्हा मांडू इच्छितो |
| immediate action | तात्काळ कार्यवाही |
| immediate slip | तात्काळ पताका |
| Implementation Officer | अंमलबजावणी अधिकारी |
| in a summary manner | संक्षिप्त रीतीने |
| in amplification of the orders contained in the Government Resolution | शासन निर्णयातील आदेश जास्त स्पष्ट करण्याच्या उद्देशाने |
| in detail | खुलासेवार; सविस्तर; विस्ताराने; तपशीलवार |
| in person | जातीने, जातीनिशी |
| in private | खाजगी, खाजगीरीत्या |
| in the absence of information | माहितीच्या अभावी |
| in the absence of proof | पुराव्याच्या अभावी |
| in the due course of law | रीतसर विधिक्रमानुसार |
| in the first instance | सुरुवातीला, प्रथमत:, पहिल्याप्रथम |
| Joining date | रुजू होण्याची तारीख |
| joining report | रुजू झाल्याचे प्रतिवेदन |

| | |
|---|---|
| for suggestions | सूचना करण्यासाठी |
| for sympathetic consideration | सहानुभूतीपूर्वक विचारासाठी |
| forwarded for immediate compliance | तात्काळ अनुपालनाकरता रवाना |
| Government Circular No. (G.C.N.) | शासन परिपत्रक क्रमांक (शा.प.क्र.) |
| Government Resolution (G.R.) | शासन निर्णय (शा.नि.) |
| Government Resolution No. (G.R.N.) | शासन निर्णय क्रमांक (शा.नि.क्र.) |
| hold in abeyance | आस्थगित ठेवणे |
| how the matter stands | प्रकरण कोठपर्यंत आले आहे |
| in the near future | नजीकच्या भविष्यकाळात |
| in view of the above | वरील गोष्टी लक्षात घेता |
| inconsistent statement | विसंगत कथन / निवेदन |
| inconsistent with the facts | वस्तुस्थितीशी विसंगत |
| increment stopped | वेतनवाढ रोखून ठेवली |
| in the interest of administrative convenience | प्रशासनाच्या सोयीच्या दृष्टीने |
| information and public relation (I.P.R.) | माहिती व जनसंपर्क (मा. व ज.) |
| initial enquiry | प्रारंभिक चौकशी |
| inordinate delay | अमर्याद विलंब |
| inpartial modification | अंशत: फेरफार करुन |
| inspection note | निरीक्षण टिपणी |
| interim reply is put up | अंतरिम उत्तर प्रस्तुत केले आहे |
| issue as amended | दुरुस्त स्वरूपात / दुरूस्ती केल्याप्रमाणे पाठवा |
| issue as modified | फेरबदल केलेल्या स्वरूपात पाठवा |
| issue as redrafted | पुन्हा लिहिलेल्या मसुद्यानुसार पाठवा |
| issue today | आज पाठवा |
| it is quite evident | हे अगदी स्पष्ट/ उघड आहे |
| judicial enquiry | न्यायिक चौकशी |
| just and reasonable | न्याय्य आणि वाजवी |

Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| judgment in this case has been reserved | या प्रकरणावरील न्यायनिर्णय राखून ठेवला आहे |
| Keep in abeyance | आस्थगित ठेवणे |
| keep in await | थांबवून ठेवणे, प्रतिक्षाधीन ठेवणे |
| keep in record | संग्रही ठेवावे |
| keep letter draft | पत्र मसुदा ठेवा |
| keep pending | प्रलंबित ठेवणे; अनिर्णित ठेवणे; थांबवून ठेवणे |
| Law & order (L & O) | कायदा व सुव्यवस्था (का. व सु.) |
| lay on the table of the house | सभागृहासमोर ठेवणे |
| legislature secretariate | विधानमंडळ सचिवालय |
| Maharashtra Civil Service Rules (M.C.S.R.) | महाराष्ट्र नागरी सेवा नियम |
| Maharashtra Plan Scheme System (M.P.S.S.) | महाराष्ट्र योजनांतर्गत योजना |
| mark a file to | नस्तीच्या नावाने अंकित करणे |
| matter is under active consideration | प्रकरणावर लक्षपूर्वक विचार चालू आहे |
| matter is under consideration | प्रकरणावर विचार चालू आहे |
| may be considered | विचार करण्यात यावा |
| may be filed | नस्ती करण्यात यावे; दप्तरदाखल करण्यात यावे |
| may be informed accordingly | त्याप्रमाणे कळवण्यात यावे |
| National Sample Survey | राष्ट्रीय नमुना पाहणी |
| necessary action | आवश्यक कार्यवाही |
| no action is necessary | कोणतीच कार्यवाही आवश्यक नाही |
| no comments to make | कोणतीही टीकाटिप्पणी करावयाची नाही |
| no departmental enquiry | ना विभागीय चौकशी |
| no exact precedent is available | नेमके पूर्वोदाहरण उपलब्ध नाही |
| no further action is necessary, file | यापुढे आणखी कार्यवाही आवश्यक नाही, दप्तरी दाखल करावे |
| Obtain signature | सही घ्यावी |
| office copy (O.C.) | कार्यालयीन प्रत (का.प्र.) |
| Office of Chief Secretariat | मुख्य सचिव कार्यालय (मु.स.का.) |
| office to examine | कार्यालयाने तपासावे |
| office to take action | कार्यालयाने कार्यवाही करावी |
| Paper under consideration (P.U.C.) | विचाराधीन कागद (वि.का.) |
| personal file | वैयक्तिक धारिका (वै.धा.) |
| justification for the proposal | प्रस्तावाचे समर्थन, प्रस्तावाचे औचित्य |
| keep with the file | नस्तीस जोडावे |
| kindly acknowledge receipt | कृपया पोच द्यावी |
| kindly confirm | कृपया पुष्टी द्यावी |
| kindly let me know. | कृपा करुन मला कळवावे |
| kindly permit | कृपा करून परवानगी द्यावी |
| less & more card | कमी जास्त पत्रक |
| letter section | पत्र विभाग |
| literal translation | शब्दश: अनुवाद |
| may be recorded | नोंद करण्यात यावी |
| may be rejected | फेटाळण्यात यावे |
| may please see | कृपया पहावे |
| message from department | विभागाचा संदेश |
| misleading statement | दिशाभूल करणारे कथन / निवेदन |
| mistake is regretted | चुकीबद्दल खेद |
| model code of conduct (M.C.C.) | आदर्श आचारसंहिता |
| no objection certificate (N.O.C.) | ना हरकत प्रमाणपत्र |
| not sufficient funds | अपुरी जमा |
| not traceable | शोध लागत नाही, सापडत नाही |
| notice of cut motion | कपात सूचना |
| notice of discharge (N.O.D.) | सेवामुक्ती सूचना (से.सू.) |
| notice of termination (N.O.T.) | समाप्तीची सूचना (स.सू.) |
| noting section | टिप्पणी विभाग |
| on public grounds | सार्वजनिक हिताच्या दृष्टीने |
| open the case | खटला / प्रकरण सुरू करणे |
| organisation and method | रचना व कार्यपद्धती |
| original file | मूळ नस्ती (मू.न.) |
| out today | आजच्या आज पाठवा |
| please put up case file | प्रकरणाची नस्ती प्रस्तुत करावी |
| please quote the authority | कृपया प्राधिकार उद्धृत करा |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| place under suspension | निलंबनाधीन ठेवणे | please see | भेटावे |
| plan information system | योजना माहिती प्रणाली (यो.मा.प्र.) | please send reply | कृपा करुन उत्तर पाठवावे |
| please acknowledge receipt | पोच द्यावी | please speak | समक्ष बोलावे, कृपया बोला |
| please check | कृपया तपासावे | please take action | कृपया कार्यवाही करावी |
| please consider & put up | कृपया विचार करा आणि सादर करा | preliminary enquiry | प्रारंभिक चौकशी |
| please diaries | दैनिकीत नोंद घ्या | Principal Secretary & Chief Protocol Officer | प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी |
| please discuss | चर्चा करावी | Public Account Committee (P.A.C.) | लोकलेखा समिती (लो.ले.स.) |
| please examine & put up | कृपया तपासावे व सादर करावे | public participation | जनतेचा सहभाग |
| please expedite compliance | त्वरेने अनुपालन करावे | put up for signature | सहीसाठी प्रस्तुत |
| please put up | कृपया सादर करावे (कृ.सा.क.) | put up new draft | नवीन मसुदा प्रस्तुत करावा |
| please put up alternative proposals | पर्यायी प्रस्ताव प्रस्तुत करावे | put up requisition | मागणी प्रस्तुत करावी |
| Rehabilitation & relief work | मदत व पुर्नवसन कार्य (म.पु.का.) | return of file may be awaited | फाईल परत येण्याची वाट पहावी |
| relevant papers be put up | संबंधित कागदपत्र प्रस्तुत करावे | return of file may kindly be expedited | कृपया फाईल परत पाठवण्याची त्वरा करावी |
| reliable evidence | विश्वसनीय पुरावा | returned after doing the needful | आवश्यक कार्यवाहीनंतर परत |
| reminder may be sent | स्मरणपत्र पाठवण्यात यावे | returned for further consideration | अधिक विचारासाठी परत |
| reply may be sent as per draft | मसुद्याप्रमाणे उत्तर पाठवावे | revised estimates | सुधारित अंदाज |
| reply not yet received | अद्याप उत्तर आले नाही | revised memo is put up desired | आदेशानुसार सुधारलेला ज्ञाप प्रस्तुत |
| return in original | मूळ प्रत परत पाठवणे | right to information Act (R.T.I.) | माहितीचा अधिकार अधिनियम (मा.अ.अ.) |
| Sample Registration Survey | नमुना नोंदणी पाहणी | starred question | तारांकित प्रश्न |
| security measures | सुरक्षा उपाय | state finance report | राज्य वित्त व्यवस्था अहवाल |
| seen ; file | पाहिले ; फाईल करावे | state income | राज्य उत्पन्न |
| seen ; file with previous papers | पाहिले ; आधीच्या कागदपत्रांसह फाईल करावी | stop gap arrangement | अंतरिम व्यवस्था |
| seen and passeed on to department | पाहून विभागाकडे पाठवले | subject matter of motion | प्रस्तावाचा विषय |
| seen and returned | पाहून परत | subject to approval | मान्यतेच्या अधीन, मान्य झाल्यास |
| self listed file | स्वयंसूची धारिका | submit file | नस्ती सादर करा |
| set aside | रद्द करणे, बाजूस काढून ठेवणे (रक्कम) | submit integrated proposal | एकत्रित प्रस्ताव सादर करावा |
| should be ignored | दुर्लक्ष करावे | submit report | अहवाल सादर करावा |
| sitting over the papers | कागदपत्र कार्यवाहीवाचून ठेवून देणे | submit with action taken report (ATR) | कृति अहवालासह सादर करावे |
| Slum Area Rehabilitation Authority (S.R.A.) | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (झो.पु.प्रा.) | submitted according to discussion | चर्चेनुसार सादर करावे |
| so far as practicable | व्यवहार्य असेल तेथवर | submitted after checking | तपासून सादर करावे |
| Special Backward Class (S.B.C.) | विशेष मागास वर्ग (वि.मा.व.) | submitted for consideration | विचारार्थ सादर |
| special desk | विशेष कार्यकक्ष | submitted for perusal | अवलोकनासाठी सादर |
| Special Economic Zone | विशेष आर्थिक क्षेत्र (वि.आ.क्षे.) | submitted to | - ला सादर करावे |

Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| Special Factor Scheme | विशेष घटक योजना |
| Take appropriate action | योग्य ती कार्यवाही करावी |
| take congnizance | दखल घेणे |
| take due action | उचित कार्यवाही करावी |
| take opinion of finance department | वित्त विभागाचे अभिप्राय घ्यावेत |
| take opinion of General Administration Department | सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घ्यावेत |
| take the chair | अध्यक्षपद स्वीकारणे |
| target | लक्ष्य |
| terms of reference | विचारार्थ विषय |
| Under consideration | विचाराधीन |
| under the hand | सहीने, सहीनिशी |
| Union Territory | संघ राज्यक्षेत्र |
| unofficial letter | अनौपचारिक पत्र (अ.नौ.प.) |
| unofficial reference (U.O.R.) | अनौपचारिक संदर्भ (अ.नौ.सं.) |
| Verified and found correct | पडताळले व बरोबर आढळले |
| very urgent | अत्यंत तातडीचे |
| Whichever is earlier | अगोदर असेल, घडेल ते |
| with due regard to | लक्षात घेऊन |
| with respect to | -- च्या संदर्भात |
| without fail | न चूकता |
| work in progress | चालू ( असलेले ) काम |
| working majority | कार्यकारी बहुमत |
| Your assumption is correct | आपली धारणा बरोबर आहे |
| your presumption is correct | आपली धारणा बरोबर आहे |
| your reply is awaited | आपल्या उत्तराची वाट पाहण्यात येत आहे |
| sympathetic consideration | सहानुभूतीपूर्वक विचार करावा |
| the application may be rejected | अर्ज नाकारावा/ आवेदनपत्र फेटाळावे |
| there is no case | काहीही तथ्य नाही |
| this may kindly be condoned | हे कृपया क्षमापित करावे, याबाबत कृपया सूट द्यावी |
| this may please be clarified | कृपया याचे स्पष्टीकरण करावे |
| this may please be given top priority | या प्रकरणाचा सर्वप्राथम्य देण्यात यावे |
| thoroughly satisfied | पूर्ण समाधान झाले |
| timely completion | वेळीच समाप्ती, परिपूर्ती |
| tribal sub-plan | आदिवासी उपयोजना |
| unstarred question | अतारांकित प्रश्न |
| until further orders | पुढील आदेश मिळेपर्यंत |
| urgently required | तातडीने हवे असलेले |
| Utilisation Certificate | उपयोगिता प्रमाणपत्र |
| voluntary grant | स्वेच्छा अनुदान |
| working plan | कार्ययोजना, कामाचा आराखडा |
| worksheet | कार्यविवरण |
| workshop | कार्यशाळा, कृतिसत्र |
| write off | निर्लेखन करणे, निर्लेखित करणे |
| written order | लेखी आदेश |
| yours faithfully | आपला विश्वासू |
| yours truly | आपला |

Scanned by CamScanner

परिपत्रक क्र.२४/२०१८

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ ३७६६
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८.
दिनांक:१५ जून२०१८.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय,पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: खाजगी रुग्णालयांना रा.प.महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्याबाबत.**

**संदर्भ: परिपत्रक क्र.९/८७ जावक क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/२२५८ दिनांक २३.०४.१९८७.**

---------

उपरोक्त संदर्भित परिपत्रकानुसार भाग-२, अंतर्गत येणा-या गंभीर आजारांवरील उपचाराकरिता येणा-या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत रा.प.महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्यात आलेल्या खालील खाजगी रुग्णालयास त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या आजाराकरिता C.G.H.S. च्या दराने उपचार करण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिली आहे.

| क्र. | रुग्णालयाचे नांव व पत्ता | आजाराचे स्वरुप | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | सिक्स सिग्मा मेडीकेअर ॲण्ड रिसर्च लि., सत्गुरु, महात्मानगर पाण्याच्या टाकीसमोर, महात्मानगर, नाशिक -४२२००७. | हृदयरोग या आजाराकरिता उपचार व शस्त्रक्रिया | ०२५३-६६०५६६६ |

उपरोक्त रुग्णालयात रा.प.कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियानी उपचार करुन घेतल्यास त्यांना C.G.H.S (Central Goven ment Health Scheme) च्या प्रचलित दराप्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करावी.

सदर परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे सहमतीने प्रसारीत करण्यात येत असून परिपत्रक प्रसारीत केलेल्या दिनांकापासून लागू राहील. सदर परिपत्रक सर्व अधिकारी / कर्मचारी व मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांच्या निदर्शनास येईल अशा पध्दतीने आपल्या स्तरावर कार्यवाही करावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

Scanned by CamScanner

**कर्मचारीवर्ग खाते**
**परिपत्रक क्र. २५ /२०१८**

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/लैंछ/ 3620
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई-४०० ००८.
दिनांक. २९ जून, २०१८.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-नाशिक व औरंगाबाद)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय : कामाच्या ठिकाणी महिलांवर होणा-या लैंगिक अत्याचाराबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत.
संदर्भ: परिपत्रक क्र.३४/२०१७,क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/लैछ/५४०१, दि.०७.१०.२०१७

संदर्भित परिपत्रकानुसार रा.प.मध्यवर्ती कार्यालयातील महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी 'अंतर्गत तक्रार समिती' गठीत करण्यात आली होती. सदर समितीतील अध्यक्ष पदी कार्यरत श्रीमती दि.प्र.विभूते, सांख्यिकी अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांनी सादर केलेला अध्यक्ष पदाचा राजीनामा मंजूर करण्यात आल्याने सदर जागा रिक्त झाली आहे. सदर रिक्त जागी श्रीमती कां.शि.मोहिते,सहा.व्यवस्थापक (मा.व तं.),मध्यवर्ती कार्यालय, मुंबई नियुक्ती करण्यात येत असून रा.प.मध्यवर्ती कार्यालयातील महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी खालीलप्रमाणे 'अंतर्गत तक्रार समिती' गठीत करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष | श्रीमती कां.शि.मोहिते | सहा.व्यवस्थापक (मा.व तं.),मध्यवर्ती कार्यालय, मुंबई |
| २ | सदस्य सचिव | श्रीमती मं.सु.उदामले | स्वीय सहाय्यक,मध्यवर्ती कार्यालय, मुंबई |
| ३ | सदस्य | श्री.स.ल.उज्जैनकर | मुख्य कल्याण अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई |
| ४ | सदस्य | श्रीमती शिल्पा मल्होत्रा | लेखा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई |
| ५ | सदस्य | श्री.वै.वृ.वाकोडे | यंत्र अभियंता (हं) मध्यवर्ती कार्यालय,मुंबई |
| ६ | सदस्य | श्री.सु.कि.भांबळ | सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी,(हं)म.का., मुंबई. |
| ७ | सदस्य | श्रीमती दिव्या तनेजा | अशासकीय सदस्य (टाटा सामाजिक विज्ञान संस्थान, मुंबई) |

परिपत्रकाची पोहोच देण्यात यावी.

(माधव काळे)
**महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)**

प्रत: माहितीसाठी रवाना.
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(यं.अ)/ महाव्यवस्थापक(नि.व प.)/उपमहाव्यवस्थापक(माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी /उप महाव्यवस्थापक (विधी) / सचिव,म.रा.मा.प. महामंडळ /मुख्य सांख्यिकी अधिकारी/सहा.जनसंपर्क अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(सेम)/ मा.अध्यक्षांचे स्वीय सचिव/उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय)/ (मनुष्यबळ) / (घटकसंवर्ग)/ (प्रशासन)/ (सामान्य प्रशासन)/ (मावक)/ श्री.स.ल.उज्जैनकर,मुख्य कल्याण अधिकारी, रा.प.मध्यवर्ती कार्यालय,मुंबई/ श्रीमती मं.सु.उदामले, स्वीय सहाय्यक,म.का.मुंबई / श्रीमती शिल्पा मल्होत्रा, सहा.लेखाअधिकारी, म.का.मुंबई/ श्री.वै.वृ.वाकोडे, यंत्र अभियंता (हं),म.का.मुंबई / श्री.सु.कि.भांबळ,सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी (हं), म.का.मुंबई/
श्रीमती कां.शि.मोहिते,सहा.व्यवस्थापक (मा.व तं.),म.का.मुंबई/
श्रीमती दिव्या तनेजा,अशासकीय सदस्य (टाटा सामाजिक विज्ञान संस्था, व्ही.एन.परब मार्ग,देवनार,मुंबई-४०००८८.

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. २६ /२०१८

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ ३७३९
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८
दिनांक : २२ जून, २०१८

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/महाव्यवस्थापक (यं. अ)/ महाव्यवस्थापक (स्थापत्य)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य विधि अधिकारी /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प: महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी / कर्मचारी वर्ग अधिकारी(सेवा मंडळ)/ कर्मचारी वर्ग अधिकारी (राज्य संवर्ग)/ कर्मचारी वर्ग अधिकारी (घटक संवर्ग)/ अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/ (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

विषय : १.रा.प.कर्मचा-यांना सार्वजनिक सुट्टी किंवा पगारी सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिकालिक भत्ता देण्याबाबत.
२. प्रशासकीय कर्मचा-यांना अतिकालिक भत्ता पुन्हा प्रादेशिक कार्यालयाकडे देण्याबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.
१) १२/१९८७ जाक्र. राप/आस्था/७०७ जीई/३६४ दिनांक ८.६.१९८७
२) १९/१९९९ जाक्र. राप/आस्था/७०७ जीई/३२०७ दिनांक २४.०५.१९९९
३) ३३/१९९९ जाक्र. राप/आस्था/७०७ जीई/५५१७ दिनांक ०१.०९.१९९९
४) ३४/२००१ जाक्र. राप/आस्था/७१३ जीई/२६३६ दिनांक ०२.०६.२००१

उपरोक्त संदर्भित पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचना कायम आहेत. असे निदर्शनास आले आहे की, मध्यवर्ती कार्यालयातील खाते प्रमुखांच्या खाते वाहनावर कार्यरत असलेले चालक तसेच खातेप्रमुखांच्या व शाखा प्रमुखांच्या अखत्यारीत असलेले कर्मचारी यांना देण्यात येणारा अतिकालिक भत्त्याचा नाहक जास्तीचा खर्च होत असल्याचे आढळून आले आहे.

अतिकालिक भत्त्यावर नियंत्रण रहावे याकरीता खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१) प्रशासकीय कर्मचा-यांची अतिकालिक कामगिरी फक्त अर्थसंकल्पीय, हिवाळी आणि पावसाळी अधिवेशनाच्या कामाच्या व्यतिरिक्त होणार नाही याची काळजी घेणे क्रमप्राप्त आहे.

२) मुद्दा क्र.१ मध्ये उद्धृत केलेल्या कारणांकरीता अतिरिक्त कामगिरीसाठी कर्मचारी थांबविताना फक्त कामाशी निगडीत असलेले पर्यवेक्षकीय कर्मचारी व लिपीक -टंकलेखक याव्यतिरिक्त कुठलाही कर्मचारी अतिकालिक कामगिरीसाठी थांबविण्यात येऊ नये.

३) अतिकालिक कामगिरीमध्ये फक्त खात्यातील एकच शिपाई व तोसुध्दा कमीत कमी वेतन घेणारा असावा. हे मार्गदर्शक तत्व लक्षात घेऊन शिपाई अतिरिक्त कामगिरीसाठी वापरण्यात यावा.

४) अतिरिक्त कामगिरीसाठी शक्यतो थांबविण्यात येणा-या कर्मचा-यांची आठवडा सुट्टी रद्द होणार नाही याची जाणीवपुर्वक काळजी घेणे अपरिहार्य आहे.

५) अतिकालिक कामगिरीसाठी कर्मचारी थांबविताना त्याची नोंद स्वतंत्र नोंदवही ठेऊन नोंदी प्रमाणित कराव्यात. सदर नोंदवहीचा नमुना खालील प्रमाणे :-



Scanned by CamScanner

खात्याचे नाव ----------------

| अ.क्र. | कर्मचा-याचे संपुर्ण नांव | हुद्दा व बॅच क्र. | अतिकालिक कामाची वेळ | | एकुण अतिरिक्त कामाचे तास | वजा- वैयक्तिक कामगिरीकरीता व्यतित केलेला वेळ | निव्वळ देय अतिकालिक कामाचे तास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

टिप:- वैयक्तिक तास म्हणजे जेवंण, चहापाणी, नाश्ता इ.साठी व्यतीत केलेला कालावधी.

६) अतिरिक्त कामगिरीसाठी ज्या कर्मचा-यांचा कुठलाही संबंध नाही असे कर्मचारी थांबविण्यात येतात. ते तात्काळ बंद होणे बंधनकारक आहे.

७) वरील सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच वरील बदलाव्यतिरिक्त संदर्भित परिपत्रकान्वये दिलेल्या इतर सुचनांमध्ये कोणताही वदल करण्यात आलेला नाही, याची नोंद घ्यावी.

परिपत्रकाची पोच दयावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. २७ /२०१८

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/३९४२
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई- ४०००0८.
दिनांक :- ३० जून, २०१८.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३ नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय:- रा.प.का[illegible]ना दि.०१.०४.२०१६ पासून जाहिर करण्यात आलेल्या वेतनवाढीबाबत.**

**संदर्भ: क्र.राप/मुकाअ/९९६ दिनांक ०५ जून, २०१८.**

----

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना (मान्यताप्राप्त संघटना) यांच्यात झालेल्या सन २०१२-२०१६ या कालावधीच्या कामगार कराराच्या कालावधीची मुदत दिनांक ३१.०३.२०१६ रोजी संपलेली आहे. त्यापुढील दि.०१.०४.२०१६ ते दि.३१.०३.२०२० या कालावधीकरिता संदर्भाधीन परिपत्रकानुसार निर्गमित केलेल्या सूचनांनुसार वेतनवाढीबाबतच्या तपशीलवार सूचना खालीलप्रमाणे आहेत.

## १. वेतन[illegible]

### (अ) नियमित/ कनिष्ठ कर्मचा-यांसाठी वेतनश्रेणी :

दिनांक ३१.०३.२०१६ रोजी रा.प.महामंडळातील नियमित समय वेतनश्रेणीत कार्यरत असणा-या वर्ग ३ व ४ पदातील कर्मचा-यांना उपरोक्त वेतनवाढीचा लाभ म्हणून त्यांनी दिनांक ३१.०३.२०१६ रोजी धारण केलेल्या मूळ पदातील मूळ वेतनाच्या २.५७ हे गुणक वापरून सुधारीत वेतननिश्चिती करण्यात यावी. अशी येणारी रक्कम जर अपूर्णांकात येत असेल तर त्यास नजीकच्या रुपयाच्या पटीत पूर्णांकात करण्यात यावी. उदा.- १.४९ पर्यंत १ व १.५० वा त्यापुढील रक्कम २ याप्रमाणे पुर्णांकात करण्यात यावी.

कनिष्ठ वेतनश्रेणीतील कर्मचारी ज्या वेळी नियमित वेतनश्रेणीत येतील त्यावेळी त्यांना सोबतच्या **जोडपत्र-"अ"** प्रमाणे वेतनश्रेणी लागू राहील.

--२--

Scanned by CamScanner

३१.३.२०१६ रोजीचे मूळ वेतन

क्ष X २.५७ (दि.१.४.२०१६ चे सुधारीत मूळ वेतन)

.२= क्ष.१ वर येणा-या दोन नियत वेतनवाढी (२% दराने)

क्ष.३= दि.१.६.२०१८ रोजीचा सुधारीत मूळ वेतन (क्ष.१+ क्ष.२)

क्ष.४= दि.१.६.२०१८ रोजीचा महागाई भत्ता (७%)

क्ष.५= दि.१.६.२०१८ रोजीचे घरभाडे (७% / १४% / २१%)

<u>क्ष.३+क्ष.४+क्ष.५= दि.०१.०६.२०१८ रोजीचे वेतन</u>

वर नमुद केल्यानुसार सुधारीत वेतनवाढीचा (दिनांक ०१.०४.२०१६ ते दिनांक ३१.०५.२०१८) या २६ महिन्यांच्या थकबाकीचा फरक समान ४८ मासिक हप्त्यांमध्ये संबंधित कर्मचा-यांना अदा करण्याबाबतच्या सूचना स्वतंत्रपणे देण्यात येतील.

**(ब) कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये ५ वर्षे किंवा ३ वर्षे पूर्ण केलेल्या कर्मचा-यांची करावयाची वेतननिश्चिती :**

दिनांक ३१.३.२०१६ रोजी सेवेत असलेल्या व यापूर्वी कनिष्ठ वेतनश्रेणीत पाच (५) वर्षे व तीन (३) वर्षे सेवा पूर्ण केलेल्या कर्मचा-यांना दि.३१.०३.२०१६ रोजीच्या वेतनावर अनुक्रमे चार (४) व दोन (२) वेतनवाढी देऊन त्यावर २.५७ हे गुणक वापरुन सुधारीत वेतन निश्चिती करण्यात यावी. अशी येणारी रक्कम जर अपूर्णांकात येत असेल तर त्यास नजीकच्या रुपयाच्या पटीत पूर्णांकात करण्यात यावी. उदा.- १.४९ पर्यंत १ व १.५० वा त्यापुढील रक्कम २ याप्रमाणे पुर्णांकात करण्यात यावी.

तथापि, सदर वेतनवाढीची थकबाकी देण्यात येऊ नये. मात्र, अशा कर्मचा-यास दि.०१.०६.२०१८ पासून वाढीव वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय राहील. असे करताना वाढीव वेतनवाढी दिल्यानंतर कनिष्ठ कर्मचा-यांचे वेतन, त्याच्या जेष्ठ कर्मचा-यांपेक्षा अधीक होणार नाही या अटीस अधिन राहून सदर वाढीव वेतनवाढी परिगणित करण्यात याव्यात. अशा एखादी कनिष्ठ कर्मचा-याचे वेतन जेष्ठ कर्मचा-याच्या वेतनाच्या सम पातळीवर निश्चित केले जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

➢ **अ. कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये ५ वर्षे किंवा ३ वर्षे पूर्ण केलेल्या कर्मचा-यांना दि.३१.०५.२०१८ पर्यंत उपरोक्त 'अ' व 'ब' नुसार काल्पनिक वेतनवाढी न देता, करावयाची वेतननिश्चिती.**

अ. दिनांक ३१.०३.२०१६ रोजी पर्यंत कनिष्ठ वेतनश्रेणीच्या पदात काम केलेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांची वेतननिश्चिती खालीलप्रमाणे करण्यात यावी.

क्ष = दि.३१.३.२०१६ रोजीचे मूळ वेतन

क्ष.१= क्ष X २.५७ (दि.१.४.२०१६ चे सुधारीत मूळ वेतन)

क्ष.२= क्ष.१ वर येणा-या दोन नियत वेतनवाढी (२% दराने)

क्ष.३= दि.१.६.२०१८ रोजीचा सुधारीत मूळ वेतन (क्ष.१+ क्ष.२)

क्ष.४= दि.१.६.२०१८ रोजीचा महागाई भत्ता (७%)

क्ष.५= दि.१.६.२०१८ रोजीचे घरभाडे (७% / १४% / २१%)

<u>क्ष.३+क्ष.४+क्ष.५= दि.१.६.२०१८ रोजीचे वेतन</u>

--३--

Scanned by CamScanner

कनिष्ठ वेतनश्रेणीत ०३ वर्षे व ०५ वर्षे काम केलेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत दिनांक ३१.०५.२०१८ पर्यंत वरीलप्रमाणे वेतननिश्चिती करण्यात यावी. वर नमुद केल्यानुसार सुधारीत वेतनवाढीचा (दिनांक ०१.०४.२०१६ ते ३१.०५.२०१८) या २६ महिन्यांच्या थकबाकीचा फरक समान ४८ मासिक हप्त्यांमध्ये संबंधित कर्मचा-यांना अदा करण्याबाबतच्या सूचना स्वतंत्रपणे देण्यात येतील.

**ब.** दिनांक ३१.०३.२०१६ रोजी पर्यंत कनिष्ठ वेतनश्रेणीच्या पदात ५ वर्षे पूर्ण केलेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत दि.०१.०६.२०१८ रोजीची वेतननिश्चिती खालीलप्रमाणे करण्यात यावी.

क्ष = दि.३१.३.२०१६ रोजीचे मूळ वेतन

क्ष.१= क्ष.१ X २.५७ (दि.१.४.२०१६ चे सुधारीत मूळ वेतन)

क्ष.२= क्ष.१ वर येणा-या दोन नियत वेतनवाढी (२% दराने)

क्ष.३= क्ष वर (३१.०३.२०१६ चे असुधारीत मूळ वेतनावर) ३% दराने चार वेतनवाढी म्हणजेच सरसकट १२% रक्कम x २.५७

क्ष.४= दि.१.६.२०१८ रोजीचे सुधारीत मूळ वेतन (क्ष.१+ क्ष.२+क्ष.३)

क्ष.५= दि.१.६.२०१८ रोजीचा महागाई भत्ता (७%)

क्ष.६= दि.१.६.२०१८ रोजीचे घरभाडे (७% / १४% / २१%)

<u>**क्ष.४+क्ष.५+क्ष.६= दि.१.६.२०१८ रोजीचे सुधारीत वेतन**</u>

❖ **क)** दिनांक ३१.०३.२०१६ रोजी पर्यंत कनिष्ठ वेतनश्रेणीच्या पदात ३ वर्षे पूर्ण केलेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत दि.०१.०६.२०१८ रोजीची वेतननिश्चिती खालीलप्रमाणे करण्यात यावी.

क्ष = दि.३१.३.२०१६ रोजीचे मूळ वेतन

क्ष.१= क्ष.१ X २.५७ (दि.१.४.२०१६ चे सुधारीत मूळ वेतन)

क्ष.२= क्ष.१ वर येणा-या दोन नियत वेतनवाढी (२% दराने)

क्ष.३= क्ष वर (३१.०३.२०१६ चे असुधारीत मूळ वेतनावर) ३% दराने दोन वेतनवाढी म्हणजेच सरसकट ६% x 2.57

क्ष.४= दि.१.६.२०१८ रोजीचे सुधारीत मूळ वेतन (क्ष.१+ क्ष.२+क्ष.३)

क्ष.५= दि.१.६.२०१८ रोजीचा महागाई भत्ता (७%)

क्ष.६= दि.१.६.२०१८ रोजीचे घरभाडे (७% / १४% / २१%)

<u>**क्ष.४+क्ष.५+क्ष.६= दि.१.६.२०१८ रोजीचे सुधारीत वेतन**</u>

वरील (ब) मधील 'ब' व 'क' येथे नमुद केल्यानुसार सुधारीत वेतनवाढ दिनांक ०१.०६.२०१८ पासून लागू होणार असल्याने दि.०१.०४.२०१६ ते दि.३१.०५.२०१८ या कालावधीतील वेतनाचा फरक देय राहणार नाही.

दिनांक ३१.०३.२०१६ रोजी कनिष्ठ वेतन श्रेणीत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या वेतननिश्चितीबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

..४..



Scanned by CamScanner

**१) रोजंदार गट क्र.१ (कनिष्ठ वेतनश्रेणी)**

क्ष = दि.३१.३.२०१६ रोजीचे मूळ वेतन

क्ष.१= क्ष.१ X २.५७ (दि.१.४.२०१६ चे सुधारीत मूळ वेतन)

क्ष.२= दि.१.६.२०१८ रोजीचे सुधारीत मूळ वेतन (दि.०१.०६.२०१८ रोजीचा महागाई भत्ता व सुधारीत मूळ वेतन याचा दैनिक दर निश्चित करुन येणारे वेतन)

क्ष.३= दि.१.६.२०१८ रोजीचा महागाई भत्ता (७%)

**<u>क्ष.१+क्ष.२+क्ष.३= दि.१.६.२०१८ रोजीचे सुधारीत वेतन</u>**

सदरचे वेतन दैनिक दराने अदा करण्यात यावे.

**२) रोजंदार गट क्र.२ (कनिष्ठ वेतनश्रेणी)**

क्ष = दि.३१.३.२०१६ रोजीचे मूळ वेतन

क्ष.१= क्ष.१ X २.५७ (दि.१.४.२०१६ चे सुधारीत मूळ वेतन)

क्ष.२= क्ष.१ वर येणा-या दोन नियत वेतनवाढी (२% दराने)

क्ष.३= दि.१.६.२०१८ रोजीचे सुधारीत मूळ वेतन (क्ष.१+ क्ष.२)

क्ष.४= दि.१.६.२०१८ रोजीचा महागाई भत्ता (७%)

क्ष.५= दि.१.६.२०१८ रोजीचे घरभाडे (७% / १४% / २१%)

**<u>क्ष.३+ क्ष.४+क्ष.५= दि.१.६.२०१८ रोजीचे सुधारीत वेतन</u>**

रोजंदार गट क्र.२मधील कनिष्ठ वेतन श्रेणीतील कर्मचा-यांच्या बाबतीत ते ज्या वेतनश्रेणीत काम करीत असतील त्या वेतनश्रेणीत ते त्यांच्या दिनांक ३१.३.२०१६ च्या मूळ वेतन दराला २४/२६ या गुणांकाने गुणुन मासिक वेतनात रुपांतर करुन त्याच्या २.५७ % इतकी रक्कम मिळवून दिनांक १.४.२०१६ रोजी त्यांचा सुधारित वेतन दर निश्चित करण्यात यावा.

## २. <u>वार्षिक वेतनवाढ</u> :

दिनांक ०१.०४.२०१६ रोजी निश्चित होणाऱ्या सुधारीत वेतनावर, कर्मचाऱ्यांच्या नियत देय तारखेस मूळ वेतनाच्या २ टक्के संचित दराने वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहील. अशी येणारी रक्कम जर अपूर्णांकात येत असेल तर त्यास नजीकच्या [illegible] पूर्णांकात करण्यात यावी. उदा.- १.४९ पर्यंत १ व १.५० वा त्यापुढील रक्कम २ याप्रमाणे पूर्णांकित करण्यात यावी.

मात्र सक्षम प्राधिकाऱ्यांनी शिक्षेच्या परिणामी वेतनवाढ स्थगित केली असेल त्या प्रकरणी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार वेतनवाढ देय राहील.

ज्या कर्मचा-यांचे वेतन दिनांक १.४.२०१६ रोजी व तद्नंतर त्यांच्या नियमित बढतीमुळे/ तात्पुरत्या बढतीमुळे/ निवडश्रेणीमुळे/ श्रेणीकरणामुळे त्यांच्या वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्याच्या पुढे निश्चित झाले आहे अथवा कराराच्या कालावधीत वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यावर पोहोचतील अशा कर्मचा-यांना वार्षिक वेतनवाढ देय राहील.

राज्य शासनाने त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी सातवा वेतन आयोग लागू केल्यानंतर, त्यातील वार्षिक वेतनवाढीचा दर रा.प.महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येईल.

..५..

## ३. नियमीत / हंगामी (तात्पुरती)बढती पदी करावयाची वेतन निश्चिती :

### अ) नियमित बढती पदी करावयाची वेतन निश्चिती.

दि.०१.०४.२०१६ वा तद्नंतर ज्या कर्मचा-यांना तात्पुरती अथवा नियमित पदोन्नती (बढती) मिळाली आहे, त्यांना त्या दिवशीच्या मूळ वेतनाच्या २ (दोन) टक्क्यांची १ (एक) वेतनवाढ देऊन वेतननिश्चिती करण्यात यावी.

मात्र, अशा प्रकरणी कर्मचा-याचे परिगणित केलेले वेतन, पदोन्नतीच्या पदाच्या किमान टप्प्यापेक्षा कमी आल्यास, त्याची वेतननिश्चिती पदोन्नतीच्या पदाच्या किमान टप्प्यावर करण्यात यावी.

तसेच, नियमित पदोन्नती (बढती) प्रकरणी कर्मचा-याची परिगणित केलेली रक्कम पदोन्नती पदाच्या कमाल टप्प्यापेक्षा जास्त असेल, तरीही त्याचे वेतन परिगणित केलेल्या रकमेवर निश्चित करण्यात यावे. तसेच त्यांस २ टक्के संचित परिणामी वेतनवाढ देण्यात यावी.

अशी येणारी रक्कम जर अपूर्णांकात येत असेल तर त्यास नजीकच्या रुपयाच्या पटीत पूर्णांकात करण्यात यावी. उदा.- १.४९ पर्यंत १ व १.५० वा त्यापुढील रक्कम २ याप्रमाणे पुर्णांकात करण्यात यावी.

नियमित पदोन्नतीच्या प्रकरणी जर खालच्या पदावरील वेतनवाढ पुढील सहा (६) महिन्यात येत असेल तर खालच्या पदाची वेतनवाढ मिळेपर्यंत खालच्या पदात वेतन घेण्याचा विकल्प प्रचलित तरतुदीनुसार चालू राहील.

ब) जे कर्मचारी दिनांक ३१.०३.२०१६ रोजी तात्पुरती वा हंगामी बढती पदावर कार्यरत होते त्यांच्या बाबतीत दि.३१.०३.२०[illegible], रोजी [illegible] असल[illegible] हंगामी / तात्पुरत्या बढती पदाचे मूळ वेतनात २.५७ पटीने वाढ देऊन वेतन निश्चिती करण्यात येईल. मात्र सदर कर्मचारी पुढे पदावनत झाल्यास तो हंगामी / तात्पुरत्या बढतीवर नव्हता असे गृहीत धरुन त्यांची दि.३१.०३.२०१६ रोजीच्या मूळ पदातील मूळ वेतनात २.५७ पटीने वाढ देऊन सुधारीत वेतन निश्चिती करण्यात येईल. अशी येणारी रक्कम जर अपूर्णांकात येत असेल तर त्यास नजीकच्या रुपयाच्या पटीत पूर्णांकात करण्यात यावी. उदा.- १.४९ पर्यंत १ व १.५० वा त्यापुढील रक्कम २ याप्रमाणे पुर्णांकात करण्यात यावी.

क) सरळसेवा भरतीद्वारे निवड झालेल्या खात्यातील कर्मचा-यांची वेतननिश्चिती करताना सेवा विनियम ६५ (ब) (३) नुसार म्हणजेच त्याच्या निवडीपुर्वीच्या मूळ पदातील वेतन श्रेणी तो ज्या वेतन टप्प्यावर वेतन घेत असेल त्या वेतन टप्प्याच्या निकटतम वरच्या टप्प्यावर वेतन निश्चित करण्यात यावे. त्या अनुषंगिक [illegible]ज्ञेय भत्ते जसे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, स्थानिक पुरक भत्ता इ. अदा करण्यात यावेत.

..६..



Scanned by CamScanner

## ४. निवडश्रेणी व श्रेणीकरण प्रकरणी करावयाची वेतन निश्चिती:

### (अ) चालक व कार्यशाळा कर्मचा-यांच्या निवडश्रेणीच्या पदावर करावयाची वेतन निश्चिती:

दिनांक ०१.०४.२०१६ वा तद्नंतर ज्या कर्मचा-यांना निवडश्रेणी/ श्रेणीकरण मिळाली आहे, त्यांना त्या दिवशीच्या मूळ वेतनाच्या २ टक्क्यांची एक वेतनवाढ देऊन वेतन निश्चित करण्यात येईल. अशी येणारी रक्कम जर अपूर्णांकात येत असेल तर त्यास नजीकच्या रुपयाच्या पटीत पूर्णांकात करण्यात यावी. उदा.- १.४९ पर्यंत १ व १.५० वा त्यापुढील रक्कम २ याप्रमाणे पुर्णांकात करण्यात यावी.

मात्र, अशा प्रकरणी कर्मचा-यांचे परिगणित केलेले वेतन निवडश्रेणी/श्रेणीकरण पदाच्या किमान टप्प्यापेक्षा कमी आल्यास, त्यांची वेतननिश्चिती निवडश्रेणी/श्रेणीकरण पदाच्या वेतनश्रेणीच्या किमान टप्प्यावर करण्यात येईल.

### (ब) श्रेणीकरण अनुज्ञेय असलेल्या कर्मचा-यांच्या वेतन निश्चितीबाबत :

**दिनांक ०१.०४.२०१६ वा तद्नंतर ज्या कर्मचा-यांना निवडश्रेणी/ श्रेणीकरण ज्या प्रवर्गात मिळाली आहे, त्या प्रवर्गात तात्पुरती अथवा नियमित बढती मिळाल्यास, त्यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या २ टक्क्यांची एक वेतनवाढ देऊन वेतन निश्चिती करण्यात यावी.** अशी येणारी रक्कम जर अपूर्णांकात येत असेल तर त्यास नजीकच्या रुपयाच्या पटीत पूर्णांकात करण्यात यावी. उदा.- १.४९ पर्यंत १ व १.५० वा त्यापुढील रक्कम २ याप्रमाणे पुर्णांकात करण्यात यावी.

### (क) राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे एकाच पदात सलग २४ वर्षे पुर्ण झालेल्या कर्मचा-यांना दुसरी निवडश्रेणी मंजूर करणेबाबत :

दिनांक ०१.०४.२०१६ रोजी व तदनंतर जे कर्मचारी त्यांच्या विद्यमान वेतनश्रेणीत व पदात १२ वर्षांची अखंड सेवा पूर्ण करीत असतील, अशा कर्मचा-यांना निकट वरच्या बढती पदाच्या वेतनश्रेणीत २ टक्क्यांची १ वेतनवाढ देऊन वेतन निश्चिती करण्यात यावी. अशा कर्मचा-यांनी १२ वर्षांनंतर त्यांच्या विद्यमान वेतनश्रेणीत व पदात पुन्हा १२ वर्षांची, म्हणजेच विद्यमान वेतनश्रेणीत व पदात एकूण २४ वर्षांची अखंड सेवा पूर्ण करीत असतील, अशा कर्मचा-यांना निवडश्रेणीच्या प्रचलित विहित अटी व तरतुदीअधिन निकटतम वरच्या बढती पदाच्या वेतनश्रेणीत २ टक्क्यांची १ वेतनवाढ देऊन वेतन निश्चिती करण्यात यावी. मात्र, सदर कालावधीत बढती मिळालेल्या कर्मचा-यांना सदरची तरतूद लागू होणार नाही. दिनांक ०१.०४.२०१६ पासून श्रेणीकरणाचे लाभ देय रहातील.

(ड) रा.प. कर्मचारी निवडश्रेणीसाठी / श्रेणीकरणासाठी पात्र ठरतील अशा कर्मचा-यांची वार्षिक वेतनवाढ निवडश्रेणीच्या / श्रेणीकरणाच्या तारखेनंतर ६ महिन्यांपर्यंत येत असेल तर अशा कर्मचा-यांना देय तारखेस प्रथम वार्षिक वेतनवाढ देऊन नंतर निवडश्रेणी/ श्रेणीकरणावर वेतन निश्चिती करण्यात येईल. मात्र, त्यासाठी संबंधित कर्मचा-यांकडून लेखी पर्याय १ महिन्याचे आत घेणे अनिवार्य राहील. याबाबत प्रसारीत करण्यात येणा-या विभागीय आस्थापना आदेशात तसे नमूद करण्यात येईल.

..७..



Scanned by CamScanner

तात्पुरत्या बढतीसाठी असा पर्याय लागू होणार नाही. मात्र, तात्पुरत्या बढतीवर असतानाच सदर कर्मचा-याला नियमित बढती मिळाली तर त्यावेळी संबंधित कर्मचा-याकडून एक महिन्यात पर्याय घेणे अनिवार्य राहील.

सहाय्यक वाहतूक अधीक्षक/ सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक/ वरिष्ठ कार्यदेशक/ भांडार पर्यवेक्षक/ कार्यालय अधीक्षक / विभागीय लेखाकार/ शाखा अभियंता/ आरेखक/ वरिष्ठ संगणक चालक/ आधार सामग्री संस्करण अधीक्षक (Data Processing Superintendent)/ वरिष्ठ संग्रह पडताळक/ विधि अधीक्षक/ लघुलेखक (वरिष्ठ) या पदावर काम करणा-या कर्मचा-यांनी एकाच वेतनश्रेणीत व पदात सलग १२ वर्षे सेवा पूर्ण केलेली असेल, अशा कर्मचा-यांना श्रेणीकरण दि. ०१.०४.२०१६ पासून अनुज्ञेय राहील.

(ई) सन ११९६-२००० च्या कामगार करारातील खंड २१ (३) नुसार तात्पुरत्या बढतीचा कालावधी वरच्या पदाची निवडश्रेणी मंजूर करताना ग्राहय धरण्यात येईल, त्याकरिता कर्मचारी तात्पुरत्या बढतीवर असतानाच त्याच पदावर नियमित पदोन्नत झाला असेल तरच अशा कर्मचा-यांच्या बाबतीत तात्पुरत्या बढतीचा कालावधी वरच्या पदाची निवडश्रेणी मंजूर करताना ग्राहय धरण्यात येईल.

## ५. <u>महागाई भत्ता</u> :

दिनांक ०१.०४.२०१६ पासून तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या नियम व दरानुसार महागाई भत्ता अनुज्ञेय राहील.

## ६. <u>घरभाडे भत्ता</u> :

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.४/२०१७, क्र.राप/आस्था/प्रशा/३३२-अे/१३८६ दिनांक १०.०३.२०१७ नुसार घरभाडे भत्त्याचा दर शहर वर्ग निहाय खालीलप्रमाणे अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | शहरांची / गावांचे वर्गीकरण | घरभाडे भत्त्याचे दर (मूळ वेतनाची टक्केवारी) |
|---|---|---|
| १ | एक्स | २१ टक्के |
| २ | वाय | १४ टक्के |
| ३ | झेड | ०७ टक्के |

राज्य शासनाने त्यांच्या कर्मचा-यांसाठी सातवा वेतन आयोग लागू केल्यानंतर, त्यातील घरभाडे भत्त्याचा दर रा.प.महामंडळाच्या कर्मचा-यांना जाहिर केलेल्या तारखेपासून लागू करण्यात येईल.

## ७. <u>कामगार शिक्षण योजना</u> :

- रा.प.महामंडळातील कामगारांच्या दोन पाल्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षण अग्रिम योजना लागू करण्यात येईल.

- रा.प.महामंडळातील कामगाराच्या दोन पाल्यांना महाविद्यालयीन शिक्षणासाठी सावित्रीबाई ज्योतिबा फुले शिष्यवृत्ती योजनेनुसार दरमहा रु.७५०/- शिष्यवृत्ती देण्यात येईल.



Scanned by CamScanner

८. <u>रा.प.कर्मचा-यांना मिळणा-या विविध भत्त्यांमध्ये खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार वाढ करण्यात आली आहे</u> :

❖ **हजेरी प्रोत्साहन भत्ता**

**असुधारित व सुधारित हजेरी प्रोत्साहन भत्ता दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | असुधारित हजेरी प्रोत्साहन भत्ता | | | सुधारित हजेरी प्रोत्साहन भत्ता | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कामाचे दिवस | चालक /मुख्य कारागीर(रु) | वाहक/ स. का. (रु) | कामाचे दिवस | चालक /मुख्य कारागीर (रु) | वाहक/ स.का. (रु) |
| १. | ४२ | १८० | [illegible] | ४२ | १२०० | १००० |
| २. | ४१ | १६५ | १२० | ४१ | १००० | ८०० |
| ३. | ४० | १५० | १०५ | ४० | ८०० | ६०० |
| ४. | ३९ | १३५ | ९० | ३९ | ६०० | ४०० |
| ५. | ३८ | १२० | ७५ | ३८ | ३०० | १५० |
| ६. | ३७ | १०५ | ६० | - | - | - |
| ७. | ३६ व कमी | - | - | - | - | - |

**इतर भत्ते**

| अ.क्र. | भत्ता | विद्यमान दर (रु) | सुधारीत दर (रु) |
|---|---|---|---|
| १ | **धुलाई भत्ता** | | |
| | सुती गणवेश | ५०/- | १००/- |
| | वुलन गणवेश | १८/- | १००/- |
| | वुलन जर्सी गणवेश | १४/- | १००/- |
| २ | **रात्रपाळी भत्ता** | | |
| | २१.०० ते ०६.०० पर्यंत [illegible] | ११/- | ३५/- |
| | २१.०० ते ०६.०० पर्यंत किमान ५ तास | १३/- | ४५/- |
| ३ | **रात्रवस्ती भत्ता** | | |
| | साधारण ठिकाणी | ९/- | ७५/- |
| | जिल्हा ठिकाणी | ११/- | ८०/- |
| | विर्निदिष्ट ठिकाणी उदा.मुंबई | १५/- | १००/- |

## ९. आयकर व व्यवसाय कर:

दिनांक १.४.२०१६ पासून वेतनश्रेणी सुधारणा झाल्यामुळे आयकर व व्यवसाय कराची कपात शासन नियमानुसार करण्यात यावी.



Scanned by CamScanner

## १०. नवीन सुधारीत वेतन श्रेणीनुसार देय वेतन :

वर नमूद केलेल्या सूचनांप्रमाणे महामंडळातील तृतीय व चतुर्थवर्ग कर्मचा-यांचे वेतन निश्चितीचे तक्ते तयार करुन लेखा शाखेकडून अंकेक्षण करुन घ्यावे व त्यानुसार वेतन निश्चितीचे आदेश निर्गमित करण्यात यावेत.

वरीलप्रमाणे वेतन निश्चिती झाल्यानंतर वर्ग- ३ व वर्ग- ४ संवर्गातील कर्मचा-यांचे माहे जून २०१८ चे माहे जुलै २०१८ मध्ये देय होणारे वेतन व भत्ते सुधारित दराने अदा करण्यात यावेत.

दि.१.०४.२०१६ ते ३०.०६.२०१८ या कालावधीतील सुधारित वेतनानुसार थकबाकीची देयके तयार करण्यात यावीत. मिळणा-या थकबाकीची एकुण रक्कम वेतनचिठ्ठीत दर्शविण्यात यावी. मात्र, थकबाकीची रक्कम अदा करण्यात येऊ नये. त्याबाबत स्वतंत्रपणे सूचना देण्यात येतील.

वर नमूद केल्यानुसार सुधारीत वेतन निश्चितीच्या परिणामी वेतन अदा करताना व थकबाकी परिगणीत करताना चूकीने जास्तीची रक्कम अदा झाल्यास सदर अतिप्रदानाची वसुली कर्मचा-याच्या नियमित वेतनातून करण्यात येईल असा स्पष्ट उल्लेख वेतन निश्चितीच्या आस्थापना आदेशामध्ये निश्चितपणे नमुद करण्यात यावा.

सदर परिपत्रक लेखा खात्याच्या सहमतीने निर्गमित करण्यात आलेले आहे.

सोबत- जोडपत्र "अ"

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :-**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक ( भां. व ख.) /महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (यं.अ.)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/उपमहाव्यवस्थापक (संगणित्र) /मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य विधी अधिकारी/मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /

जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक / मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी /. कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव / मा.अध्यक्षांचे स्वीय सचिव /मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी. कर्मचारीवर्ग अधिकारी (प्रशासन/ सा.प्रशासन)/ (मनुष्यबळ नियोजन / समन्वय) सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/(घटकसंवर्ग) /(मावक)/ (राज्य संवर्ग).....

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)



Scanned by CamScanner

## जोडपत्र - : " अ "

### तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या (नियमित ) प्रवर्ग निहाय वेतनश्रेणी दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | प्रवर्ग | सध्याची वेतनश्रेणी दि.०१.०४.२०१२ पासून | दि.१.४.२०१६ पासूनची सुधारीत वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | स्वच्छक | ३६६० - ११९७७ | ९४१०-२०७७८ |
| २. | परिचर/ईशाराकार/खलाशी/सुरक्षरक्षक/चपराशी /ऑर्डली/सफाईगार/हमाल/पाणीवाला/मजदूर | ४१८० - १३६७५ | १०७४०-२२७१३ |
| ३. | नाईक/लिफ्ट चालक /सहाय्यक माळी | ४२७०-१३९६५ | १०९७०-२४२२२ |
| ४. | खानसामा/अतिथ्यालय परिचर/ द्वारपाल / हवालदार | ४३५०-१४२२५ | ११९८०-२४६८५ |
| ५. | सहाय्यक (मदतनीस) | ४३५०-१४२२५ | ११९८०-२४६८५ |
| ५-अ | वाहक | ४३५०-१४२२५ | ११९८०-२४६८५ |
| ६. | माळी/यारी चालक | ४३५०-१४२२५ | ११९८०-२४६८५ |
| ७. | तारतंत्री/तारतंत्री निपंप परिचर/ सहाय्यक बांधणीकार/ सुतार /रंगकार/गंवडी/नळ कारागीर (कारा."ब") | ४६२०-१५१०९ | ११८७०-२६२१० |
| ८. | सहा.कारागीर/ प्रमुख द्वारपाल/मुकादम | ४६२०-१५१०९ | ११८७०-२६२१० |
| ९. | चालक | ४७००-१५३६७ | १२०८०-२६६७३ |
| १०. | वाहतूक [illegible]त्रक | ४८८०-१५९५५ | १२५४०-२७६८८ |
| ११. | इमारत निरिक्षक/निरिक्षक स्थापत्य/दुरध्वनी सहाय्यक /दुरध्वनी चालक/कल्याण निर्देशका /कनिष्ठ कारकून/ सहाय्यक रोखपाल/भांडार कारकून/कारकून(समयवेतन शाखा)/ कारकून-टंकलेखक/ टंकलेखक/ संगणक/ अनुरेखक/ कारकून निम समयपाल/यंत्रगणक/यंत्रवाला (मुद्रणालय)/जुळारी/बांधणीकार/छिद्रांक टंकक/ पडताळक/ सहाय्यक चालक (यंत्र)/पत्ता यंत्रचालक (अड्रोमा)/ मिश्रक/ लघुलेखन भत्त्यासह टंकलेखक. | ४७९०-१५६६३ | १२३१०-२७१८२ |
| १२. | कारागीर "क"/ यंत्र कारागीर (कारागीर क)/विजतंत्री (स्थापत्य)/रोटरी यंत्रवाला/प्रदोप चालक/सहा.वाहतूक निरिक्षक/सहा.सुरक्षा निरिक्षक | ५०५०-१६६११ | १२९८०-२८६५९ |
| १३. | प्रमुख कारागीर/मुख्य कामगार/ रोटरीवाला /मुद्रीतशोधक/ प्रमुख जुळारी | ५७५०-१८८०४ | १४७८०-३२६३४ |
| १४. | वरिष्ठ लिपिक (कनिष्ठ सहाय्यक)/वरिष्ठ कारकून/लघुलेखक (ख)/लघुटंकलेखक/वरिष्ठ [illegible] [illegible]/कनिष्ठ संगणक चालक/ अरेखक (स्थापत्य)/उप अभियंता /समयलेखक /सहाय्यक भांडारपाल/प्रमुख समयपाल/ सहा.आगरक्षक /परिचारक/स्वच्छता निरिक्षक/ राखण व पहारा निरिक्षक. | ५७५०-१८८०४ | १४७८०-३२६३४ |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| १५. | लेखाकार/लेखा निरिक्षक/भांडारपाल/ इंधन/ आस्थापना पर्यवेक्षक/पर्यवेक्षक/कनिष्ठ संग्रह पडताळक/वाहतूक निरिक्षक/नियोजन निरिक्षक/ वाणिज्य निरिक्षक/तंत्र निरिक्षक/ खाद्यपेय व्यवस्था निरिक्षक/प्रशिक्षण निरिक्षक/प्रवाशी सुविधा [illegible]/प्रभारक /वरिष्ठ [illegible] यांत्रिकी /आगरक्षक/लघुलेखक (कनिष्ठ)/लघुलेखक (मराठी) /सुरक्षा निरिक्षक. | ६७१०-२२१११ | १७४५०-३८५३१ |
| १६. | विभागीय लेखाकार/कार्यालय अधिक्षक/विधी अधिक्षक/आधार सामुग्री/ संस्करण अधिक्षक/ भांडार पर्यवेक्षक/वरिष्ठ संग्रह पडताळक / सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक/ सहाय्यक वाहतूक अधिक्षक /डेपो व्यवस्थापक (ख)/कनिष्ठ कार्यदेशक/कनिष्ठ कार्यदेशक (यांत्रिकी)/तंत्र सहाय्यक/वाणिज्य प्रसिध्दी निरिक्षक/प्रमुख आरेखक (स्थापत्य,यंत्र)/कला कार्याअधिकारी /लघुलेखक (वरिष्ठ)/विभागीय सुरक्षा निरिक्षक | ७६६०-२५०२० | १९६९०-४३४७७ |
| १७. | वरिष्ठ कार्यदेशक/शाखा अभियंता | ७८३०-२५५८१ | २०१२०-४४४२६ |

टिप :- वार्षिक वेतन वाढीचा दर :- वार्षिक वेतन वाढीचा दर २% ने संचित परिणामी केला आहे व त्यानुस ४० वर्षाचा कालावधी विचारीत घेऊन प्रत्येक वेतनश्रेणीचा कमाल टप्पा परिगणित केला आहे.



Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २८ / २०१८

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४८६-ई/ ३०४०
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक 02.07.२०१८

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/ पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग/ ठाणे/ नाशिक/ जळगांव/ धुळे/ अहमदनगर/ पुणे/ कोल्हापूर/ सांगली/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ नांदेड/ उस्मानाबाद/ परभणी/ नागपूर/ भंडारा/ चंद्रपूर/ गडचिरोली/ वर्धा/ अमरावती/ अकोला/ बुलडाणा/ यवतमाळ.

....

**विषयः अनुकंपा तत्त्वावर एका वर्षात नोकरी स्विकारणे अथवा वारसदारांना रुपये १०,००,०००/- आर्थिक सहाय्य देण्याबाबत धोरणाच्या अंमलबजावणीबाबत.**

*****

रा.प.महामंडळात सध्या अनुकंपा तत्त्वावर नेमणूक देण्यासाठी अवलंबिण्यात येणा-या धोरणाचा विचार करता, अनुकंपा तत्त्वावर मंजुर झालेली प्रकरणे प्रतिक्षा यादीवर दीर्घ काळापासून प्रलंबित असल्याचे आढळून आले आहे. रा.प.महामंडळात अनुकंपा तत्त्वावर मंजुर झालेल्या परंतु प्रतिक्षा यादीवर प्रलंबित असलेल्या प्रकरणी मृत कर्मचा-यांच्या वारसास रुपये १०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) एवढे आर्थिक सहाय्य अथवा एका वर्षात अनुकंपा तत्त्वावर नोकरी स्विकारण्याचे धोरण ठरविणेबाबतचा प्रस्ताव रा.प.महामंडळाच्या संचालक मंडळास सादर केला असता, महामंडळ ठराव क्र.२०१८:०१:१९ दिनांक १२.०१.२०१८ नुसार, अनुकंपा तत्त्वावर मंजुर झालेली परंतु प्रतिक्षा यादीवर असलेल्या प्रकरणी वारसांना रुपये १०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) आर्थिक सहाय्य अथवा एका वर्षात अनुकंपा तत्त्वावर नोकरी स्विकारण्याच्या धोरणास संचालक मंडळाने मान्यता दिली आहे.

२. संचालक मंडळाच्या वर नमूद केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करण्याकरीता खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

अ) रा.प.महामंडळाच्या सेवेत असताना मृत झालेल्या कर्मचा-यांच्या सर्व अवलंबितानी अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसाठी विहीत केलेल्या पदांमध्ये नेमणूक स्विकारण्यास इच्छूक नसल्याबाबत, लेखी अर्ज प्रतिज्ञापत्रासह सादर केल्यास, सदर अवलंबितांना रु.१०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त ) आर्थिक सहाय्य देण्यात यावे.

आ१२४/
जा-४१
८३०२१
19.07.2018

--२--

F:\२०१८-Anukampa\A-Circular २०१८.docx

Scanned by CamScanner

ब) ज्या प्रकरणी सर्व अवलंबित आर्थिक सहाय्य घेण्यास इच्छुक नसतील अशा प्रकरणी अवलंबितांपैकी एका अवलंबितास त्याने अन्य अवलंबितांच्या ना-हरकत पत्रासह अर्ज केल्यास, अशा अवलंबितांस नोकरी देण्याच्या अनुषंगाने त्यांचेकडे असलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महामंडळाने विहीत केलेल्या पदांपैकी कोणत्याही एका पदामध्ये महामंडळाच्या आवश्यकतेनुसार व पदाची उपलब्धता विचारात घेऊन प्रकरण मंजूर करण्याची व नेमणूकीच्या अनुषंगाने आवश्यक त्या बाबींची पुर्तता करण्याबाबत कार्यवाही करुन, नेमणूकीचे आदेश प्रसारीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

क) रा.प.महामंडळाने अनुकंपा तत्त्वावर नेमणूक दिलेल्या पदी उमेदवाराने एका वर्षाच्या आत हजर होणे आवश्यक राहील. सदर कालावधीत हजर न झाल्यास, सदर पदावरील उमेदवाराचा हक्क आपोआप संपुष्टात येईल व भविष्यात अन्य कोणत्याही वारसास अनुकंपा तत्त्वावर नोकरीसाठी अर्ज करण्याचा हक्क राहणार नाही.

ड) रा.प.महामंडळामध्ये सध्या अनुकंपा तत्त्वावरील मंजुर प्रकरणांच्या प्रतिक्षा यादीवर असलेल्या तसेच मंजूरीसाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणांसह यापुढे नव्याने येणा-या अनुकंपा तत्त्वावरील प्रकरणांना उपरोक्त धोरण लागू राहील.

ई) रु.१०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त ) एवढया आर्थिक सहाय्याचा पर्याय स्विकारणा-या वारसांना विभागांनी आर्थिक सहाय्याची रक्कम अदा करुन, सदर प्रयोजनासाठी केलेला खर्च "३७३ - इ" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

३. सबब वरील सूचनांची विभागीय स्तरावर काटेकोरपणे अंमलबजावणी करुन अनुपालन अहवाल त्वरीत या कार्यालयास विनाविलंब सादर करण्यात यावा.

४. सदर परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

परिपत्रकाची पोच द्यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.सं.)

<u>प्रत माहितीसाठी अग्रेषित</u> :

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्य विधी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ - मुंबई-पुणे, नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन.

F:\२०१८-Anukampa\A-Circular २०१८.docx

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.२८/२०१८

क्रमांकःराप/आस्था/४०८-ई (१)/ ३८८७
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई- ४००००८.
दिनांक :२३ जुलै, २०१८.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती).
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषयः- रा.प.कामगारांना दि.०१.०४.२०१६ पासून जाहिर करण्यात आलेल्या वेतनवाढीबाबत.

संदर्भः- १. क्र.राप/मुकाअ/९९६ दिनांक ०५ जून, २०१८.
२. परिपत्रक क्र. २७ /२०१८क्रमांकःराप/आस्था/४०८-ई (१)/ ३९४२ दिनांक ३०जून २०१८

----

उपरोक्त संदर्भ क्र.२ नुसार, मुद्दा क्र.१० नविन वेतनश्रेणीनुसार देय वेतन मधील परिच्छेद क्र.३ मध्ये दिनांक ०१.०४.२०१६ ते ३०.०६.२०१८ ऐवजी दिनांक ०१.०४.२०१६ ते ३१.०५.२०१८ असा बदल करण्यात येत आहे.

तसेच कनिष्ठ वेतन श्रेणीतील कर्मचा-यांची वेतनश्रेणी जोडपत्र -"ब" प्रमाणे लागू राहील.या व्यतिरिक्त उर्वरित परिपत्रकातील सूचनांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सोबत - जोडपत्र -"ब"

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :-**
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी /
महाव्यवस्थापक ( भां. व ख.) /महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (यं.अ.)/
महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/उपमहाव्यवस्थापक (संगणित्र) /मुख्य स्थापत्य अभियंता /
मुख्य विधी अधिकारी/मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /
जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक / मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी /
कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांचे स्वीय सचिव /
मा.अध्यक्षांचे स्वीय सचिव /मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी.
कर्मचारीवर्ग अधिकारी (प्रशासन/ सा.प्रशासन)/ (मनुष्यबळ नियोजन / समन्वय)
सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/(घटकसंवर्ग) /(मावक)/ (राज्य संवर्ग).....

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८
आवक क्र. [illegible]
दिनांक. २१०१२०१९

**जोडपत्र -: "ब"**

तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या (कनिष्ठ श्रेणी) प्रवर्ग निहाय वेतनश्रेणी दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | प्रवर्ग | सध्याची कनिष्ठ वेतनश्रेणी दि.०१.४.२०१२ पासून | दि.१.४.२०१६ पासूनची सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | स्वच्छक | ३३००-३६०७ | ८४८०-९१७९ |
| २. | शिपाई / सुरक्षरक्षक/सफाईगार/ | ३३००-३६०७ | ८४८०-९१७९ |
| ३. | वाहक / सहाय्यक (मदतनिस) | ३९५०-४३१८ | १०१५०-१०९८६ |
| ४. | प्रमुख द्वारपाल | ३९५०-४३१८ | १०१५०-१०९८६ |
| ५. | चालक | ४०२५-४४०० | १०३४५-१११९८ |
| ६. | लिपिक-टंकलेखक | ४०५०-४४२७ | १०४१०-११२६८ |
| ७. | सहाय्यक सुरक्षा निरीक्षक | ४०५०-४४२७ | १०४१०-११२६८ |
| ८. | वरिष्ठ लिपिक / कनिष्ठ सहाय्यक | ४१००-४४८१ | १०५३७-११४०६ |
| ९. | राखण व पहारा निरीक्षक | ४१२५-४५०९ | १०६००-११४७४ |
| १०. | प्रभारक / वाहतूक निरीक्षक / सुरक्षा निरीक्षक / लेखाकार / भांडारपाल / आरेखक (यां.) / आगरक्षक / वरिंष्ठ संगणक चालक / कनिष्ठ संग्रह पडताळक / आस्थापना पर्यवेक्षक / वरिष्ठ सहाय्यक / कनिष्ठ लघुलेखक / | ४१६०-४५४७ | १०६९५-११५७७ |
| ११. | कनिष्ठ कार्यदेशक / सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक / सहाय्यक वाहतुक अधिक्षक / प्रमुख आरेखक / सहाय्यक तांत्रिक/ विभागीय लेखाकार / वरिष्ठ संग्रह पडताळक / कार्यालय अधिक्षक / वरिष्ठ लघुलेखक / कनिष्ठ अभियंता (स्था) (वि) | ४६००-५०२८ | ११८२०-१२७९४ |
| १२. | वरिष्ठ कार्यदेशक | ४७००-५१३७ | १२०८०-१३०७६ |

सहा. लेखाअधिकारी सामान्य

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.३०/२०१८

क्र.राप/कर्मवर्ग/गावतव/ ना. ९८

म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई - ४०० ००८
दिनांक : जून,२०१८.
०५/०७/१८

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे
- उपमहाव्यवस्थापक,
  नियंत्रण समिती क्र.१ (मुंबई/पुणे)
  नियंत्रण समिती क्र.२ (नाशिक/औरंगाबाद)
  नियंत्रण समिती क.३ (अमरावती/नागपूर)
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
- विभाग नियंत्रक,
  म.रा.मा.प.महामंडळ, मुंबई/ ठाणे/ रत्नागिरी/ रायगड/ सिंधुदूर्ग/ पालघर/ पुणे/ सातारा/ सांगली/ सोलापूर/ कोल्हापूर/ नाशिक/ धुळे/ जळगांव/ अहमदनगर /औरंगाबाद/ बीड/ जालना/ नांदेड/ उस्मानाबाद/ लातूर/ परभणी/ नागपूर/ चंद्रपूर/ भंडारा/ वर्धा/ गडचिरोली/ अमरावती/ बुलडाणा/ अकोला/ यवतमाळ.

**विषयः मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दि. ६ जुलै,२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना.**

....

उपरोक्त विषयावाबतचा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०१८/ प्र. क्र. ७२/ १६-ब, दिनांक ५ जून, २०१८ ची प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे. तरी, सदर शासन निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची पोच द्यावी.

सोबत :वरीलप्रमाणे

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

प्रत :

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ.)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ महाव्यवस्थापक (स्था.अ.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य विधि अधिकारी/ सचिव, म. रा. मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सहायक / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव यांचे माहितीसाठी.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ सहायक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/ (घटकसंवर्ग)/ (मनुष्यबळ समन्वय)/(सामान्य प्रशासन)/ (प्रशासन)/(मुख्यालय) यांचे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

सोबत :वरीलप्रमाणे

Scanned by CamScanner

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दि.६ जुलै,२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०१८/प्र.क्र.७२/१६-ब
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : ५ जून, २०१८.

प्रस्तावना-

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ (चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर,एफसीआय आणि इतर विरूद्ध जगदिश बलराम बहिरा व इतर) व इतर याचिकामध्ये दि.६ जुलै,२०१७ रोजी अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती , विजा-अ,भज-ब,भज-क,भज-ड,विशेष मागास प्रवर्ग अथवा इतर मागासवर्ग या जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही..असा निर्णय दिलेला आहे.

२. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यापूर्वी, या निर्णयामुळे प्रशासनावर होणारा दूरगामी परिणाम विचारात घेता, शासनाच्या विविध विभागातील अधिकारी/कर्मचारी, राज्य शासनाचे उपक्रम /कंपनी इ. तसेच शैक्षणिक संस्था व इतर माध्यमांद्वारे दिलेल्या नियुक्त्यांची सर्वकष छाननी करणे गरजेचे आहे. त्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी कशाप्रकारे करावी याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी व शासनास शिफारस करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

मा.सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ (चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर,एफसीआय आणि इतर विरुद्ध जगदिश बलराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामधील उपरोक्त आदेश विचारात घेता, सदर निर्णयाची अंमलबजावणी कशाप्रकारे व्हावी याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी व शासनास शिफारस करण्यासाठी मा.मंत्री,आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे मंत्रिमंडळ उपसमिती स्थापना करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | मा.मंत्री ,आदिवासी विकास | अध्यक्ष |
| २. | मा.मंत्री,उच्च व तंत्र शिक्षण | सदस्य |
| ३. | मा.मंत्री,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये | सदस्य |
| ४. | मा.मंत्री,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | सदस्य |
| ५. | मा.मंत्री,विजा-भज,विमाप्र व इमाव कल्याण | सदस्य |

Scanned by CamScanner

सचिव (साविस) सामान्य प्रशासन विभाग, हे सदर समितीचे सदस्य सचिव व प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग हे आमंत्रित सदस्य असतील.

३. उपरोक्त मंत्रिमंडळ उपसमितीने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.६ जुलै,२०१७ च्या निर्णयाचा परिपूर्ण अभ्यास करून, या निर्णयामुळे प्रशासनावर होणारा दूरगामी परिणाम विचारात घेता, या निर्णयाची अंमलबजावणी कशाप्रकारे व्हावी याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी शासनास तीन महिन्यात आपला अहवाल सादर करावा.

४. सदर उपसमितीच्या शिफारंशीवर अंतिम निर्णय होईपर्यंत कोणत्याही अधिकारी/ कर्मचाऱ्यांना जात प्रमाणपत्र अवैध ठरले म्हणून सेवेतून कमी करण्यात येऊ नये.

५. संबंधीत प्रशासकीय विभागाने/नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी जात प्रामाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या संख्ये इतकी अधिसंख्य पदे निर्माण करावीत.

६. वरील अधिकारी /कर्मचारी सेवामुक्त होत नाहीत तोवर खुल्या प्रवर्गात समजण्यात यावेत व ज्या राखीव जागांवर त्यांना नियुक्ती मिळाली आहे, त्या रिक्त समजण्यात याव्यात.

७. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदान प्राप्त संस्था, विद्यापीठे,सहकारी संस्था , शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत व सदर आदेशाची संबंधित प्रशासकिय विभागाने तातडीने अंमलबजावणी करावी.

८. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०६०५१३३५०५१४०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु.ए.आंधळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
१.राज्यपाल यांचे सचिव,
२.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४.मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
५.मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
६.सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य



Scanned by CamScanner

७.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)
१३.सर्व जिल्हाधिकारी,
१४.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१६.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१७.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१८.प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१९.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२०.सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२१.सचिव,राज्य माहिती आयोग,
२२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२३.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२४.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६.संचालक, समाजकल्याण, पुणे,
२७.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२८.संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२९.संचालक, सेवायोजन, मुंबई,

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.३७ /२०१८

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/ ४०४२
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र,वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई- ४०००0८.
दिनांक :-०६ जुलै, २०१८.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय:- रा.प.कामगारांना दि.०१.०४.२०१६ पासून जाहिर करण्यात आलेल्या वेतनवाढीबाबत.

संदर्भ:- १. क्र.राप/मुकाअ/९९६ दिनांक ०५ जून, २०१८.
२. परिपत्रक क्र. २७ /२०१८क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/ ३९४२ दिनांक ३०जून २०१८
३. परिपत्रक क्र. २९ /२०१८क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/ ३९९७ दिनांक ३जुलै २०१८

....

उपरोक्त संदर्भ क्र.३ नुसार, कनिष्ठ वेतन श्रेणीतील कर्मचा-यांची वेतनश्रेणी जोडपत्र - "क" प्रमाणे लागू राहील.

या व्यतिरिक्त उर्वरित परिपत्रकातील सूचनांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सोबत - जोडपत्र -"क "

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :-
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक ( भां. व ख.) /महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (यं.अ.)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/उपमहाव्यवस्थापक (संगणित्र) /मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य विधी अधिकारी/मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /

जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक / मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी / कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव / मा.अध्यक्षांचे स्वीय सचिव /मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी.
कर्मचारीवर्ग अधिकारी (प्रशासन/ सा.प्रशासन)/ (मनुष्यबळ नियोजन / समन्वय)
सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/(घटकसंवर्ग) /(मावक)/ (राज्य संवर्ग).....

C:\Users\Acer\Desktop\settlement २०१६-२०\Settlement circular.docx

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
२५९६५
५.७.१८

जोडपत्र -: "ब" "क"

तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या (कनिष्ठ श्रेणी) प्रवर्ग निहाय वेतनश्रेणी दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | प्रवर्ग | सध्याची कनिष्ठ वेतनश्रेणी दि.०१.४.२०१२ पासून | दि.१.४.२०१६ पासूनची सुधारीत कनिष्ठ वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | सहाय्यक कारागीर (कनिष्ठ) | ३९७५-४२१८ | १०२१५-११०५७ |
| २. | वाहतुक नियंत्रक (कनिष्ठ) | ४०५०-४४२७ | १०४१०-११२६८ |
| ३. | कारागीर 'क' (कनिष्ठ) | ४०७५-४४५४ | १०४७०-११३३३ |
| ४. | सहाय्यक वाहतुक निरिक्षक (कनिष्ठ) | ४०७५-४४५४ | १०४७०-११३३३ |
| ५. | प्रमुख कारागीर (कनिष्ठ)/ सहाय्यक भांडारपाल (कनिष्ठ) | ४१००-४४८१ | १०५४०-११४०१ |

सह. लेखाअधिकारी सामान्य

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.३२/२०१८

क्र.राप/कर्मवर्ग/मावक/ ३८८५
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई - ४०० ००८
दिनांक : ~~जून,२०१८.~~ ०८/०६/१८

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे
- उपमहाव्यवस्थापक,
  नियंत्रण समिती क्र.१ (मुंबई/पुणे)
  नियंत्रण समिती क्र.२ (नाशिक/औरंगाबाद)
  नियंत्रण समिती क.३ (अमरावती/नागपूर)
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
- विभाग नियंत्रक,
  म.रा.मा.प.महामंडळ, मुंबई/ ठाणे/ रत्नागिरी/ रायगड/ सिंधुदूर्ग/ पालघर/ पुणे/ सातारा/ सांगली/ सोलापूर/ कोल्हापूर/ नाशिक/ धुळे/ जळगांव/ अहमदनगर /औरंगाबाद/ बीड/ जालना/ नांदेड/ उस्मानाबाद/ लातूर/ परभणी/ नागपूर/ चंद्रपूर/ भंडारा/ वर्धा/ गडचिरोली/ अमरावती/ बुलडाणा/ अकोला/ यवतमाळ.

विषयः- मंत्रालयातील प्रशासकीय विभाग व विभाग प्रमुख यांच्या अखत्यारितील सर्व कार्यालयामधील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अखत्यारितील पदांसहीत) गट-अ ते गट-ड या संवर्गातील सरळसेवेच्या बिंदूनामावली तपासणीसाठी व आरक्षण निश्चिती करिता विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्याबाबत.

संदर्भ -१) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक २५/२००४ क्र.राप/कर्मवर्ग/ मावक/ ५४४२ दिनांक २३ डिसेंबर,२००४
२) क्र.राप/कर्मवर्ग/मावक/५००४ दिनांक २४ डिसेंबर,२००९
३) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १३/२०१३ क्र.राप/कर्मवर्ग/मावक/५४६१ दिनांक २७ नोव्हेंबर,२०१३
४) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ३३/२०१५ क्र.राप/कर्मवर्ग/मावक/५८७९ दिनांक ०२ डिसेंबर,२०१५
५) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १३/२०१६ क्र.राप/कर्मवर्ग/मावक/२००५ दिनांक २७ एप्रिल,२०१६

....

आ.जा.क्र.५९ ०८६३२९ २३.०५.२०१८

उपरोक्त विषयाबाबतचा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०१६/प्र.क्र.५-A/१६-ब, दिनांक १२ जून, २०१८ ची प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे. तरी, सदर शासन निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची पोच द्यावी.

सोबत :वरीलप्रमाणे

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत :**

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ महाव्यवस्थापक (स्था.अ.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य विधि अधिकारी/ सचिव, म. रा. मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सहायक / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव यांचे माहितीसाठी.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ सहायक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/ (घटकसंवर्ग)/ (मनुष्यबळ/समन्वय)/(सामान्य प्रशासन)/ (प्रशासन)/(मुख्यालय) यांचे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

सोबत :वरीलप्रमाणे

Scanned by CamScanner

मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व विभाग प्रमुख यांच्या अखत्यारितील सर्व कार्यालयामधील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अखत्यारितील पदांसहीत) गट-अ ते गट-ड या संवर्गातील सरळसेवेच्या बिंदुनामावली तपासणीसाठी व आरक्षण निश्चिती करिता विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी -२०१६/ प्र. क्र. ५A/१६-ब
मंत्रालय, मुंबई -४०००३२.
दिनांक - १२ जून, २०१८.

<u>वाचा</u> :- १. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय बीसीसी १०८५/२९८८/१६-ब दि. १३ ऑगस्ट १९८६.

२. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४०१/१६-ब दि. २६ आक्टोंबर, २००४.

३. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. बीसीसी २००९/प्र.क्र. २९१/०९/१६-ब दि. ५ नोव्हेंबर, २००९.

४. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही २०१० / प्र.क्र.३४७/१०/१२ दि. २४ फेब्रुवारी, २०११.

५. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी २०१५/ प्र.क्र.१२६अे /१५/१६-ब दि. ५ मे, २०१५.

६. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी २०१६/ प्र.क्र.५अे /१६/१६-ब दि. ५ मार्च, २०१६.

७. सामान्य प्रशासन विभाग शासन पत्र क्र. बीसीसी २०१६/ प्र.क्र.२९५अे /१६/१६-ब दि. २२ जुलै, २०१६.

८. वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/ प्र.क्र.२० /आपुक दि. १६ मे, २०१८.

<u>प्रस्तावना :-</u>

वित्त विभागाच्या उपरोक्त संदर्भाधिन क्र. ८ येथील दि. १६ मे,२०१८ रोजीच्या शासन निर्णयामध्ये शेतक-यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या अनुषंगाने आवश्यक पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी विविध विभागातील महत्वाच्या सेवेशी निगडीत पदभरतीस मान्यता दिलेली आहे. सदर भरतीच्या मान्यता दिलेल्या संवर्गानुसार प्रशासकीय विभाग प्रमुख यांच्या अखत्यारितील सर्व कार्यालयातील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अखत्यारितील पदांसहीत) गट-अ ते गट-ड या संवर्गातील सरळसेवेच्या बिंदुनामावली बिंदुनामावली प्रमाणिकरण आरक्षण निश्चिती प्रक्रियेचे विकेंद्रिकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व विभाग प्रमुख यांच्या अखत्यारितील सर्व कार्यालयामधील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अखत्यारितील पदांसहीत) वित्त विभागाच्या दि. १६ मे,२०१८ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या गट-अ ते गट-ड या संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्यासाठी आरक्षण निश्चितीचे व बिंदुनामावली तपासणी व प्रमाणित करण्याचे अधिकार विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांना या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात येत आहेत.

Scanned by CamScanner

२. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त सर्व राज्य स्तरीय विभाग प्रमुख व नियुक्ती प्राधिका-याने त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व गट-अ ते गट-ड या संवर्गाची सरळसेवेची बिंदुनामावली तपासताना , सेवाप्रवेश नियम, मंजूर पदांचा आकृतिबंध तसेच संबंधित कॅलेंडर वर्षानुसार दि. १ जानेवारी रोजीची रिक्त पदे व संबंधित निवडसूची वर्षातील दि. ३१ डिसेंबर अखेरची रिक्त पदे अशाप्रकारे निवडसूची वर्षातील एकत्रित रिक्त पदे यांचा तपशील संदर्भाधिन क्र. ७ येथील दि. २२.७.२०१६ च्या शासन पत्रातील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन, ऑनलाईन /ऑफलाईन बिंदूनामावलीमध्ये भरुन सदर बिंदुनामावली संबंधित विभागीय आयुक्तांकडे मान्यतेस्तव सादर करावी.

३. सर्व विभागीय आयुक्त यांनी बिंदुनामावली व आरक्षण तपासणीची कार्यवाही ही सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यपध्दतीनुसार पूर्ण करुन त्यास मान्यता द्यावी. संबंधित विभागीय आयुक्तांकडून बिंदुनामावली योग्य प्रकारे प्रमाणित केली आहे किंवा कसे ,असल्यास त्यानुसार प्रत्येक विभाग प्रमुखाने विविध संवर्गात सरळसेवेने दिलेल्या नियुक्त्या विहित आरक्षणानुसार आहेत किंवा कसे याबाबत मंत्रालयातील मागासवर्ग कक्षाकडून आवश्यकतेनुसार तपासणी करण्यात येईल. जर बिंदुनामावली बरोबर तपासली नाही किंवा विभाग प्रमुखाने बिंदुनामावली प्रमाणे सरळसेवेने नियुक्त्या दिल्या नसतील तर संबंधित विभागीय आयुक्त व विभाग प्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल.

४. या शासन निर्णयानुसार विभागीय आयुक्त यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार बिंदु नामावली तपासण्याची व आरक्षण निश्चितीची कार्यवाही तात्काळ सुरु करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०६१२११५१५५५८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(टि.वा. करपते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१.मा.सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२.मा.अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३.मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई-३२.
४.मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई-३२.
५.सर्व मा. विधानसभा सदस्य/मा.विधानपरिषद सदस्य/मा.संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
६.मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-३५.
७.मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८.सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
९.मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
१०.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
११.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा), मुंबई.



Scanned by CamScanner

१२. सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद), मुंबई.
१३.सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
१४. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१५. सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), महाराष्ट्र राज्य.
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई.
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई.
१८. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१९. प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद.
२०. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
२१.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२२.सचिव,राज्य निवडणूक आयोग,मंत्रालय, मुंबई-३२.
२३.सचिव,राज्य माहिती आयोग, मंत्रालय, मुंबई-३२.
२४. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
२५.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक.
२६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२७.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका.
२८.संचालक, समाजकल्याण, पुणे.
२९.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
३०.संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
३१.संचालक, सेवायोजन, मुंबई.
३२.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
३३.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
३४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३५.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
३६.सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३७.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई. (५ प्रती)
३८.सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य.
३९.निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

***********



Scanned by CamScanner

<u>कर्मचारीवर्ग खाते</u>
परिपत्रक क्र.३३/२०१८

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/४१६६
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४००००८.
दिनांक: २१, जुलै, २०१८.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषयः-** रा.प.कामगारांना दि.०१.०४.२०१६ पासून जाहिर करण्यात आलेल्या वेतनवाढीबाबत.

**संदर्भः-** १. क्र.राप/मुकाअ/९९६ दिनांक ०५ जून, २०१८.
२. परिपत्रक क्र. २७/२०१८ क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/ ३९४२ दिनांक ३० जून २०१८
३. परिपत्रक क्र. २९/२०१८ क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/३९९७ दिनांक ३ जुलै २०१८
४. परिपत्रक क्र. ३१/२०१८ क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/ ४०४२ दिनांक ६ जुलै २०१८

----

उपरोक्त संदर्भ क्र.१व २ नुसार, कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये ५ वर्ष व ३ वर्ष काम केलेल्या कर्मचा-यांना दिनांक ३१.०३.२०१६ च्या असुधारीत वेतनावर अनुक्रमे ४ व २ वेतनवाढ देऊन त्यावर २.५७ हा गुणक लागू राहील. तथापि, सदर वेतनवाढीची थकबाकी मिळणार नाही. दिनांक ०१.०६.२०१८ पासून वाढीव वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय राहील, अशा सुचना प्रसारित करण्यात आलेल्या आहेत.

तथापि, काही कर्मचाऱ्यांना त्यांचा कनिष्ठ वेतनश्रेणीतील कालावधी ३ वर्षापेक्षा कमी असल्यामुळे त्यांना वाढीव वेतनवाढीचा लाभ मिळत नसलेबाबत नाराजी व्यक्त केली होती. त्यांनी केलेली विनंती विचारात घेऊन मा.अध्यक्ष, म.रा.मा.प. महामंडळ यांनी राज्य परिवहन महामंडळातील ज्या कर्मचा-यांचा कनिष्ठ वेतनश्रेणीतील कालावधी ३ वर्षापेक्षा कमी झाला असेल अशा सर्व कर्मचा-यांनाही दोन वाढीव वेतनवाढी देण्याचे आदेश दिलेले आहेत.

त्यानुसार उपरोक्त नमुद केलेल्या परिपत्रकांमध्ये दिलेल्या सुचना कायम ठेऊन कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये ३ वर्षापेक्षा कमी कालावधी पुर्ण केलेल्या कर्मचा-यांनाही दोन वाढीव वेतनवाढी देण्यात याव्यात.

याव्यतिरिक्त परिपत्रकातील उर्वरित सुचनांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

..२..

Scanned by CamScanner

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :-</u>
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी /
महाव्यवस्थापक ( भां. व ख. ) /महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (य.अ.)/
महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/उपमहाव्यवस्थापक (संगणक) /मुख्य स्थापत्य अभियंता /
मुख्य विधी अधिकारी/मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /

जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक / मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी / [illegible]
अधिकारी (से.मं.) / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक याचे स्वीय सचिव /
मा.अध्यक्षांचे स्वीय सचिव /मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी.
कर्मचारीवर्ग अधिकारी (प्रशासन/ सा.प्रशासन)/ (मनुष्यबळ नियोजन / समन्वय)
सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/(घटकसंवर्ग) /(मावक)/ (राज्य संवर्ग).....

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.३४/२०१८.

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ५०७६
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०००0८.
दिनांक: ३० ऑगस्ट, २०१८.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: लाचलुचपत प्रकरणी न्यायालयीन खटल्याचा निकाल लागेपर्यंत विभागीय चौकशी संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**संदर्भ: शासन निर्णय क्र.सीडीआर१०९९/प्र.क्र.६२/९९/११-अ दिनांक ०३ एप्रिल, २०००.**

---------

शासन निर्णय क्र.सीडीआर१०९९/प्र.क्र.६२/९९/११-अ दिनांक ०३ एप्रिल, २००० अन्वये शासनामार्फत भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अंतर्गत अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्याबाबत करावयाच्या कार्यवाही संदर्भात सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयामधील पृ.क्र.५ येथील अ.क्र.७ येथे न्यायालयात अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्याबरोबरच करावयाच्या इतर कार्यवाही अंतर्गत अपचारी अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्याबाबत निर्णय देतानाच संबंधितांविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई सुरु करण्याबाबतही सक्षम प्राधिका-यांनी विचार करावा. मात्र न्यायालयीन खटल्याचा निर्णय लागेपर्यंत विभागीय चौकशी संदर्भात करावयाची अंतिम कार्यवाही (दोषमुक्त किंवा शिक्षा देणे) प्रलंबित ठेवण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

संदर्भित शासननिर्णयामधील सदर सुचनांनुसार विषयांकींत प्रलंबित अपराध प्रकरणी कार्यवाही करण्यात यावी.

माधव काळे
(महाव्यवस्थापक क.व औ.स.)

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना:

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ महाव्यवस्थापक (स्थाअ)/ मुख्य अतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार वर्ग-१ / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन )/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/ (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग)/ (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

Scanned by CamScanner

गोपनीय

**भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अंतर्गत अभियोग दाखल करण्यास मंजुरी देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शा. नि. क्रमांक :सीडीआर १०९९/ प्र.क्र.६२/९९ /११अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ०३ एप्रिल, २०००

संदर्भ :-१) शा.नि., सा.प्र.वि.क्र.सीडीआर १०९६/प्र.क्र.१००/९६/११, दि.७.११.१९९७.
२)शा.नि.,सा.प्र.वि.,क्र.सीडीआर१०९६/प्र.क्र.१००/९६/११, दि.२४.१२.१९९७.

**प्रस्तावना :-**

लाचलुचपत प्रतिबंध खात्याकडून लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम १९८८ खाली अभियोग दाखल करण्यासाठी सक्षम प्राधिका-यांच्या पूर्वमंजुरीकरिता प्राप्त होणा-या प्रस्तावांवर करावयाच्या कार्यवाहीबाबत संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि. प्रशासकीय विभागांना यासंदर्भात काही अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. यास्तव, लाचलुचपत प्रतिबंध खात्याकडून . अभियोग दाखल करण्यास मंजुरी देण्यासाठी प्राप्त होणा-या प्रकरणात अनुसरण्यात यावयाच्या कार्यपध्दतीबद्दल असणारी संदिग्धता दूर व्हावी यादृष्टीने सर्वंकष आदेश निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुसार यापूर्वीचे सर्व आदेश / परिपत्रके यांचा आढावा घेऊन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :-**

भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अंतर्गत लोकसेवकांविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यासाठी मंजुरी प्राप्त करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंध खात्याकडून प्राप्त प्रकरणी खाली विहित केलेली पध्दत अवलंबण्यात यावी :-

**(१) सक्षम प्राधिकारी**

लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम १९८८ च्या कलम १९ मध्ये खटल्यासाठी कोणाची पूर्वमंजुरी आवश्यक आहे हे नमूद केले आहे. त्यानुसार ब) राज्याच्या व्यवहाराशी संबंधित सेवेमध्ये असलेल्या व राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय सेवेतून काढून टाकता न येणा-या व्यक्तीच्या बाबतीत त्या शासनाची क) इतर कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत त्याला त्याच्या पदावरुन काढून टाकण्याबाबत सक्षम असलेल्या प्राधिकरणाची पूर्वमंजुरी असल्याशिवाय न्यायालय अपराधाची दखल घेणार नाही. हे लक्षात घेता, अभियोग दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी पुढीलप्रमाणे असतील :-

| | |
|---|---|
| (१) गट-अ व गट-ब(राजपत्रित) | : मंत्रालय स्तरावर संबंधित प्रशासकीय विभाग |
| (२) गट ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड | : विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख |
| (३) अन्य संस्था (उदा.महामंडळे/ मंडळे/स्थानिक स्वराज्य संस्था) ज्यांना शासनाचे अर्थसहाय्य देण्यात येते. | : संबंधित संस्थांचे अध्यक्ष /संचालक इ. |

एच-555(5000-7-00)-1

Scanned by CamScanner

**(२) लाचलुचपत प्रतिबंध खात्याने प्रस्ताव सादर करण्याचा अवलंबावयाची कार्यपध्दती.**

कालापव्यय टाळण्याच्या दृष्टीने अपचारी अधिकारी /कर्मचा-यांचे सक्षम प्राधिकारी निश्चित कोण आहेत याविषयी लाचलुचपत प्रतिबंध खात्यास माहिती असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे एकाच प्रकरणात एकापेक्षा जास्त प्रशासकीय विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांचा किंवा काही प्रकरणी गट अ ते ड वर्गाच्या अधिकारी/कर्मचारी यांचा एकत्रित सहभाग असतो. अशा प्रकरणी मंजुरी घेताना येणा-या अडचणी लक्षात घेता पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरण्यात यावी :-

अ) (१) एकाच विभागाचे राजपत्रित अधिकारी अपचारी असल्यास एकच प्रस्ताव व मंजुरी आदेश आवश्यक असेल.

(२) एकाच विभागाचे गट-अ ते ड मधील अपचारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंध खात्याकडून एकत्रित प्रस्ताव व संबंधित प्रशासकीय विभागाकडून एकच मंजुरी आदेश आवश्यक असेल.

(३) वेगवेगळया विभागातील राजपत्रित अधिकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंध खात्याकडून विभागवार स्वतंत्र प्रस्ताव व संबंधित विभागाकडून स्वतंत्र मंजुरी आदेश आवश्यक असतील.

(४)वेगवेगळया विभागातील फक्त गट-क व ड चे कर्मचारी असल्यास संबंधित नियुक्ती प्राधिकारीनिहाय प्रस्ताव व मंजूरी आदेश आवश्यक असतील.

ब) (१) राजपत्रित अधिका-यांचे विभागनिहाय तसेच एकाच विभागातील राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित कर्मचा-यांचे एकत्रित प्रस्ताव लाचलुचपत प्रतिबंध खाते गृह विभागाकडे सादर करेल.

(२) अन्य प्रकरणी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी निहाय प्रस्ताव लाचलुचपत प्रतिबंध खात्याकडून परस्पर सक्षम प्राधिका-यांकडे पाठविण्यात येतील.

**(३) गृह विभागातील कार्यवाही.**

परि.२ (ब) (१) संबंधातील प्रस्ताव लाचलुचपत प्रतिबंध खात्याकडून प्राप्त झाल्यानंतर गृह विभागात त्याची छाननी करण्यात येईल आणि काही त्रुटी आढळल्यास यांचे लाचलुचपत प्रतिबंध खात्याकडून निराकरण करुन घेऊन निष्कर्ष सकृतदर्शनी स्वीकारार्ह वाटल्यास अ.मु.स.(गृह) यांच्या सहमतीनंतर असे प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागांकडे पुढील कार्यवाहीसाठी तीन आठवडयाच्या आत पाठविण्यात येतील.

**(४) प्रशासकीय विभागानी करावयाची कार्यवाही**

